❖ संस्थापक : कै. वसंत काणे ❖ नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ ❖ पुणे आवृत्ती **बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६** ❖ पाने : ८ ❖ अंक : २८२ ❖ Gmail : news.sandhya@gmail.com ❖ किंमत : ७ रूपये

www.dainikesandhya.com Epaper - www.sandhyaepaper.com www.youtube.com/@sandhyalivenews

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

दैनिक **संध्या**

नि:पक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक



संविधानावरच प्रश्नचिन्ह निर्माण करण्याचे षडयंत्र!

दिल्लीतील 'लोकशाही वाचवा' मोर्चावरून मुख्यमंत्री फडणवीसांची टीका



■ मुंबई (दै. संध्या)

"देशातील जनतेमध्ये जाणीवपूर्वक संभ्रम निर्माण करण्याचे पद्धतशीर काम विरोधकांकडून सुरू आहे. संविधानाने स्थापन केलेल्या स्वायत्त संस्थांना बदनाम करायचे (डिसक्रेडिट करायचे) आणि त्याआडून थेट संविधानावरच प्रश्नचिन्ह उपस्थित करायचे, हेच विरोधकांचे मूळ षडयंत्र आहे," असा जोरदार आणि घणाघाती हल्लाबोल महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केला आहे. केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करत आणि मतदार याद्यांमधील कथित घोळाविरोधात राजधानी नवी दिल्लीत 19 विरोधी पक्षांच्या खासदारांनी काढलेल्या 'लोकशाही वाचवा' मोर्चावर मुख्यमंत्री फडणवीस यांनी ही प्रतिक्रिया दिली.

नवी दिल्लीतील नवीन संसद भवनापासून ते निवडणूक आयोगाच्या 'निर्वाचन सदन' मुख्यालयापर्यंत विरोधी पक्षांच्या खासदारांनी या मोर्चाचे आयोजन केले होते.

मात्र, मोर्चा संसद परिसराबाहेर पडताच 'ऑल इंडिया रेडिओ'च्या (आकाशवाणी भवन) इमारतीबाहेर दिल्ली पोलिसांनी प्रचंड बंदोबस्त आणि बॅरिकेड्स लावून खासदारांना रोखले. पोलिसांनी पुढे जाण्यास मज्जाव करताच हातात राष्ट्रध्वज तिरंगा घेतलेले विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि काँग्रेस सरचिटणीस प्रियांका गांधी थेट पोलिसांच्या बॅरिकेड्सवर चढले. खासदारांनी जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला.

दिल्ली पोलिसांनी तातडीने हस्तक्षेप करत राहुल गांधी, प्रियांका गांधी आणि इतर प्रमुख खासदारांना ताब्यात घेऊन पोलिसांच्या बसमध्ये बसवले. मात्र, काही वेळातच हे नेते बसमधून खाली उतरले आणि त्यांनी पुन्हा घोषणाबाजी करत आकाशवाणी इमारतीच्या दिशेने पायी चालण्यास सुरुवात केली. विरोधी पक्षांच्या या आक्रमक आंदोलनावर भाष्य करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, "दिल्ली पोलिसांच्या कारवाईवरून विरोधक देशात गैरसमज पसरवत आहेत. निवडणूक आयोग ही संविधानाने तयार केलेली स्वायत्त संस्था आहे.

या संस्थांच्या विश्वासार्हतेवर आघात करून देशाच्या लोकशाही व्यवस्थेलाच बदनाम करण्याचे षडयंत्र विरोधक रचत आहेत." "निवडणूक आयोग आपल्या नियमानुसार काम करत असताना राजकीय फायद्यासाठी संस्थांवर चिखलफेक करणे अत्यंत निंदनीय आहे," असे मुख्यमंत्र्यांनी ठणकावून सांगितले. या मोर्चात 19 विरोधी पक्षांचे खासदार एकत्र आले असले, तरी दिल्लीत सत्तेवर असलेला आम आदमी पक्ष (AAP) आणि तामिळनाडूतील सत्ताधारी द्रविड मुन्नेत्र कळघम (DMK) हे प्रमुख पक्ष या मोर्चात सहभागी झाले नाहीत. यामुळे 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांमध्ये अंतर्गत मतभेद आणि समन्वयाचा अभाव असल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगू लागली आहे.

दरम्यान, यापूर्वी 11 ऑगस्ट 2025 रोजीही 'इंडिया' आघाडीने राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे आणि शरद पवार यांच्या नेतृत्वाखाली 25 विरोधी पक्षांना सोबत घेऊन अशाच प्रकारे संसदेपासून निवडणूक आयोगापर्यंत धडक मोर्चा काढला होता. आता पुन्हा एकदा संसदेपासून रस्त्यापर्यंत विरोधक आक्रमक झाले असून, विरोधकांच्या या मोहिमेला मुख्यमंत्री फडणवीस यांनी "संविधानविरोधी षडयंत्र" ठरवून थेट प्रत्युत्तर दिले आहे.

ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्यासाठी देशभरात उद्रेक

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्याविरोधात गेल्या पाच दिवसांपासून देशभरात विरोधकांकडून तीव्र निदर्शने केली जात आहेत. 'लोकशाही वाचवा' असे फलक हाती घेऊन खासदारांनी ज्ञानेश कुमारांच्या राजीनाम्याची जोरदार मागणी लावून धरली. काँग्रेसचे राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे यांनी नुकताच आरोप केला होता की, विशेष सखोल पुनरीक्षण मोहिमेच्या नावाखाली देशभरातील मतदार याद्यांमधून तब्बल १३ कोटी वैध मतदारांची नावे संशयास्पदरीत्या वगळण्यात आली आहेत.

थोडक्यात...

हवाई दलाचे नवे प्रमुख आशुतोष दीक्षित

नवी दिल्ली : दैनिक संध्या

व्हाइस एअर चीफ मार्शल आशुतोष दीक्षित नवे एअर चीफ मार्शल झाले. एअर मार्शल आशुतोष दीक्षित हे भारतीय वायुसेनेतील (IAF) अत्यंत अनुभवी आणि प्रतिष्ठित अधिकारी आहेत. सध्या ते भारतीय वायुसेनेचे ५१ वे व्हाइस एअर चीफ ऑफ स्टाफ होते. त्यांनी १ जुलै २०२६ रोजी या पदाचा कार्यभार स्वीकारला होता. ते ३१ ऑक्टोबर रोजी पदभार स्वीकारतील. एअर मार्शल अमर प्रीत सिंग यांच्या जागी आशुतोष दीक्षित यांची नियुक्ती होईल. एअर मार्शल अमर प्रीत सिंग ३० सप्टेंबर २०२४ रोजी हवाई दल प्रमुख (चीफ ऑफ द एअर स्टाफ) बनले होते आणि ३१ ऑक्टोबर रोजी ते सेवानिवृत्त होत आहेत. त्यांनी एका ऑपरेशनल फायटर स्क्वाड्रनचे आणि एका आघाडीच्या हवाई तळाचे नेतृत्वही केले आहे. एअर मार्शल अमर प्रीत सिंग यांच्या जागी आशुतोष दीक्षित यांची नियुक्ती होईल. एअर मार्शल अमर प्रीत सिंग ३० सप्टेंबर २०२४ रोजी हवाई दल प्रमुख (चीफ ऑफ द एअर स्टाफ) बनले होते आणि ३१ ऑक्टोबर रोजी ते सेवानिवृत्त होत आहेत. त्यांनी एका ऑपरेशनल फायटर स्क्वाड्रनचे आणि एका आघाडीच्या हवाई तळाचे नेतृत्वही केले आहे.

भगवंत मान यांच्या कार्यालयात छापा

नवी दिल्ली : दैनिक संध्या

केंद्रीय तपास यंत्रणा CBI ने चंदीगडमध्ये पंजाबचे मुख्यमंत्री भगवंत मान यांच्या चंदीगडमधील सेक्टर 2 येथील कोठी क्रमांक 50 मधील कॅम्प कार्यालयावर मंगळवारी संध्याकाळी छापा टाकला. याशिवाय मोहाली आणि संगरूर येथेही केंद्रीय सुरक्षा दलांच्या कडेकोट बंदोबस्तात CBI ची पथके पोहोचली. चंदीगडच्या सेक्टर 2 मध्ये असलेल्या मुख्यमंत्र्यांच्या कॅम्प कार्यालयात सतत छापेमारी सुरू आहे. पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, CBI चा तपास सुरू आहे. ED कडून पंजाबच्या मुख्यमंत्री कार्यालयातील बदली-पदोन्नती आणि सरकारी निविदांसह अनेक प्रकरणांत भ्रष्टाचाराचे आरोप केल्यानंतर हे प्रकरण समोर आले. या प्रकरणात ED ने मुख्यमंत्र्यांचे OSD राजबीर सिंह घुम्मन यांना मुख्य आरोपी केले होते. ED ने तीन वेळा पत्र पाठवूनही पंजाब पोलिसांनी गुन्हा दाखल केला नाही. त्यामुळे ED च्या अहवालाचा हवाला देत ॲडव्होकेट निखिल सराफ यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. दरम्यान, याच प्रकरणाविरोधात सरकार सर्वोच्च न्यायालयात गेले होते. मात्र, आजच तातडीने सुनावणी घेण्याची मागणी फेटाळताना सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणाची सुनावणी उद्या किंवा परवा घेण्याचे सांगितले. छाप्यानंतर मुख्यमंत्री भगवंत मान यांनी ट्विट करून म्हटले की, भाजपला निवडणुकीमुळे माझी बदनामी करायची आहे. जनतेकडून मिळत असलेले प्रेम पाहून भाजप घाबरली आहे. सांगायचे झाले तर, पंजाब आणि हरियाणा उच्च न्यायालयाने काल (७ ऑक्टोबर) या प्रकरणाची सुनावणी करताना सीबीआय चौकशीचे आदेश दिले होते.

मच्छिमार कुटुंबांच्या हितासाठी संस्थांचे कामकाज सक्षम करा : नितेश राणे

नाशिक जिल्हा मच्छिमार व कृषी सहकारी संघाच्या कामकाजाचा आढावा



■ मुंबई (दै. संध्या)

नाशिक जिल्हा मच्छिमार व कृषी सहकारी संघ लि. नाशिक यांच्यावरील अंतरिम अवसायनास स्थगिती देऊन जिल्ह्यातील सुमारे २ हजार मच्छिमार कुटुंबांना न्याय मिळवून देण्यासाठी आवश्यक कार्यवाही करण्याचे निर्देश मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे यांनी दिले.

मंत्रालयात नाशिक जिल्हा मच्छिमार व कृषी सहकारी संघ लि., नाशिक अंतरीम अवसायनास स्थगिती देऊन २००० मच्छिमार कुटुंबांना न्याय देण्याबाबत आढावा बैठक घेण्यात आली. यावेळी अन्न व औषध प्रशासन विशेष सहाय्य मंत्री नरहरी झिरवाळ, मत्स्य आयुक्त भानुदास पालवे, मत्स्योद्योग महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालक प्रकाश खपले व संबंधित अधिकारी उपस्थित होते. मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री नितेश राणे म्हणाले, संस्थेचे कामकाज अधिक सक्षम करण्यासाठी शासनाकडून आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल. मच्छिमार संस्थांना शासनाच्या विविध योजनांचा लाभ थेट मिळावा आणि मध्यस्थांचा हस्तक्षेप होऊ नये, यासाठी आवश्यक ती कार्यवाही करण्यात यावी. संस्थेच्या दैनंदिन कामकाजासह उत्पादन, साठा, आर्थिक व्यवहार आणि इतर आवश्यक नोंदी अद्ययावत ठेवून संबंधित कागदपत्रे शासनाकडे वेळेत सादर करण्याचे निर्देशही त्यांनी दिले. संस्थेच्या कामकाजात प्रकरणांची वस्तुनिष्ठ चौकशी करून नियमानुसार आवश्यक कार्यवाही करण्यात येईल, असे मंत्री राणे यांनी स्पष्ट केले. मच्छिमार संस्थांचे उत्पन्न वाढविण्यासाठी शासनाच्या विविध योजना, निधी आणि आवश्यक सहकार्य उपलब्ध करून देण्यात येईल. संस्थांनी प्रशासकीय नोंदी व आर्थिक व्यवहार पारदर्शक आणि अद्ययावत ठेवावेत, असेही मंत्री राणे यांनी सांगितले.



पुरंदर विमानतळासाठी ७६ टक्के जमीन ताब्यात

उर्वरित शेतकऱ्यांना १० ऑक्टोबरपर्यंत मुदत; ९६ टक्के शेतकऱ्यांची जमीन देण्यास संमती

■ मुदत संपल्यानंतर सक्तीने भूसंपादनाचा प्रशासनाचा निर्णय

■ पुणे (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील प्रस्तावित छत्रपती संभाजीराजे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी भूसंपादन प्रक्रियेला वेग आला आहे. विमानतळासाठी आवश्यक १,२१६ हेक्टरपैकी ७६ टक्के (९८० हेक्टर) जमीन जिल्हा प्रशासनाच्या ताब्यात आली आहे. आतापर्यंत ९६ टक्के शेतकऱ्यांनी जमीन देण्यास संमती दर्शवली आहे. उर्वरित चार टक्के शेतकऱ्यांना संमती देण्यासाठी १० ऑक्टोबरपर्यंत अंतिम मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर सक्तीने भूसंपादन करण्याचा निर्णय प्रशासनाने घेतला आहे. वनपुरी, कुंभारवळण, एखतपूर, खानवडी, पारगाव, उदाचीवाडी आणि मुंजवडी या सात गावांमधून १,२१६ हेक्टर जमीन संपादित करण्याचे नियोजन आहे. आतापर्यंत १,१६७ हेक्टर जमिनीला शेतकऱ्यांची संमती मिळाली आहे. मात्र, त्यापैकी ४० हेक्टर जमीन देण्यास काही शेतकऱ्यांचा विरोध कायम आहे. दरम्यान, विमानतळासाठी प्रस्तावित जागा योग्य नसल्याचा दावा करत काही शेतकऱ्यांनी उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या याचिकेवर सुनावणी झाल्यानंतर विमानतळविरोधी गटाची याचिका उच्च न्यायालयाने फेटाळून लावली आहे. त्यामुळे विमानतळ प्रकल्पाच्या पुढील प्रक्रियेतील कायदेशीर अडथळा दूर झाला आहे. राज्य सरकारने भूसंपादनासाठी प्रतिएकर १ कोटी ६१ लाख रुपये मोबदला निश्चित केला आहे. याशिवाय झाडे, बागा, विहिरी आणि घरांसाठी स्वतंत्र मोबदल्याचे पॅकेज देण्यात येत आहे. आतापर्यंत जिल्हा प्रशासनाने ३,८०० कोटी रुपयांचा मोबदला शेतकऱ्यांना वितरित केला आहे.

पुरंदर विमानतळासाठी आतापर्यंत ९६ टक्के शेतकऱ्यांनी जमीन देण्यास संमती दिली आहे. त्यापैकी प्रत्यक्षात ७६ टक्के जमीन ताब्यात घेण्यात प्रशासनाला यश आले आहे. उर्वरित जमीन ताब्यात घेण्याची प्रक्रिया सुरू आहे. चार टक्के शेतकऱ्यांची संमती बाकी असून, त्यांना १० ऑक्टोबरपर्यंत मुदत देण्यात आली आहे. त्यानंतर सक्तीने भूसंपादन करण्यात येईल.

- जितेंद्र डुडी, जिल्हाधिकारी.

'पार्टिसिपेट मुंबई'तून जनसहभागाला नवी दिशा मिळणार

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते पार्टिसिपेट मुंबई उपक्रमाचे लोकार्पण

■ मुंबई (दै. संध्या)

'पार्टिसिपेट मुंबई' हा केवळ सामाजिक उत्तरदायित्व (सीएसआर) निधी उभारण्याचा मंच नसून शासन, महापालिका, कॉर्पोरेट आणि सामाजिक संस्थांनी एकत्र येऊन विकासासाठी काम करण्याचे व्यासपीठ आहे. समग्र संस्थेबरोबरच्या सामंजस्य करारामुळे महापालिकेच्या सेवा वितरण व्यवस्थेत सुधारणा, प्रशासकीय प्रक्रिया सुलभ होण्यास व कार्यक्षमता वाढण्यास मदत होणार आहे. या दोन्ही उपक्रमांमुळे मुंबईच्या विकासाला लोकसहभाग आणि गतिमान प्रशासनाची जोड मिळणार असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.

मुंबईच्या विकास प्रक्रियेत नागरिक, उद्योग-व्यवसाय क्षेत्र, स्वयंसेवी संस्था आणि तज्ज्ञांचा सहभाग वाढविण्यासाठी बृहन्मुंबई महानगरपालिकेने 'पार्टिसिपेट मुंबई' हा भागीदारीचा नवा डिजिटल मंच सुरू केला आहे. त्याचे लोकार्पण तसेच महापालिकेच्या सेवा वितरण व्यवस्थेत सुधारणा, प्रशासकीय प्रक्रिया सुलभ करणे आणि कार्यक्षमता वाढविण्यासाठी 'समग्र' या संस्थेसोबत सामंजस्य कराराचे आदानप्रदान बृहन्मुंबई महापालिकेच्या सभागृहात करण्यात आले. त्यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस बोलत होते. यावेळी कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री तथा मुंबई उपनगरे जिल्हा सहपालकमंत्री मंगल प्रभात लोढा, मुंबईच्या महापौर रितू तावडे, उपमहापौर संजय घाडी, महानगरपालिका आयुक्त अश्विनी भिडे, यांच्यासह महापालिकेचे पदाधिकारी, नगरसेवक, अधिकारी, कर्मचारी, उद्योग व स्वयंसेवी क्षेत्रातील प्रतिनिधी उपस्थित होते. मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, 'पार्टिसिपेट मुंबई' हा केवळ कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलिटी (सीएसआर) निधी उपलब्ध करून देणारा मंच नसून 'तुम्ही आणि आम्ही एकत्र येऊन समाजातील शेवटच्या घटकासाठी काय करू शकतो' यासाठीचा सहभागाचा मंच आहे. महापालिकेला ज्या क्षेत्रात भागीदारीची आवश्यकता आहे, अशा विविध प्रकल्पांची माहिती या मंचावर उपलब्ध करून दिली जाणार आहे. शिक्षण, आरोग्य, पाणी, रोजगार, पर्यावरण, उद्याने, सौंदर्यीकरण, गरिबी निर्मूलन यांसारख्या क्षेत्रांमध्ये काम करू इच्छिणाऱ्या कंपन्या, स्वयंसेवी संस्था किंवा नागरिकांना त्यांच्या आवडीच्या प्रकल्पाची निवड करता येणार आहे. एखाद्या संस्थेला विशिष्ट क्षेत्रात काम करायचे असल्यास त्यांची स्वतःची योजना देखील या मंचावर मांडता येणार आहे. त्यामुळे महापालिका आणि सामाजिक तसेच कॉर्पोरेट क्षेत्र यांच्यातील दरी कमी होऊन विकासकामांना अधिक गती मिळेल, असा विश्वास मुख्यमंत्री फडणवीस यांनी व्यक्त केला.



विधान परिषद निवडणुकीच्या प्रभारीपदी चंद्रकांत पाटील; निवडणूकप्रमुखपदी राजेश पांडे



■ पुणे (दै. संध्या)

विधान परिषदेच्या पुणे पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीची रनधुमाळी सुरू झालेली असताना महायुतीपुढे बंडखोरी रोखण्याचे आव्हान निर्माण झाले आहे. त्यातच भाजपने या निवडणुकीसाठी उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांच्याकडे निवडणुकीच्या प्रभारीपदाची धुरा सोपविली आहे. तर प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे यांची निवडणूक प्रमुख म्हणून नियुक्ती केली आहे. विधान परिषद निवडणुकीच्या पुणे पदवीधर मतदारसंघासाठी भाजपने डॉ. स्मिता जाधव यांना तर पुणे शिक्षक मतदारसंघातून कौस्तुभ गावडे यांना अधिकृत उमेदवारी जाहीर केली आहे. शिक्षक मतदारसंघात शिवसेनेकडूनही मंगेश चिवटे यांनी अर्ज भरला आहे. तर उद्योगमंत्री उदय सामंत यांचे स्वीयसहायक प्रा. सचिन सानप यांनी पदवीधर निवडणुकीसाठी अपक्ष अर्ज भरला आहे. त्यामुळे हे दोन्ही अर्ज कायम राहिल्यास भाजपची डोकेदुखी वाढणार असून, ही उमेदवारी मागे घेण्यासाठीचे आव्हान भाजपसमोर आहे. यापूर्वी झालेल्या विधान परिषदेच्या या दोन्ही निवडणुकांमध्ये भाजपचा दारूण पराभव झाला होता. याची पुनरावृत्ती टाळण्यासाठी भाजपने पक्षाची ताकद वाढवण्यासाठी आणि सर्व घटकांना एकत्र ठेवण्यासाठी निवडणूक समिती गठीत केली आहे. चंद्रकांत पाटील यांच्याकडे 'प्रभारी'पदाची जबाबदारी आहे.

संपादकीय

भ्रष्ट व्यवस्थेचे माफिया आणि विद्यार्थ्यांच्या आत्महत्या!

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांची प्रतिनियुक्ती संपुष्टात येऊन त्यांना कार्यमुक्त करण्यात आले आहे. विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळाने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेतल्यानंतर सामान्य प्रशासन विभागाने हा निर्णय घेतला २२ डिसेंबर २०२५ रोजी दोन वर्षासाठी सचिव पदावर रूजू झालेले हरपाळकर यांच्या कार्यकाळातील औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याने विद्यार्थ्यांच्या संतापाचा उद्रेक झाला होता. त्यानंतर मुख्यमंत्र्यांनी दिलेला शब्द पाळत ही कारवाई केली असली तरी एका अधिकाऱ्याची उचल बांगडी म्हणजे संपूर्ण यंत्रणेची मलमपट्टी नव्हे आज लाखो तरुणांच्या भविष्याशी खेळणाऱ्या या व्यवस्थेच्या मुळावर घाव घालण्याची वेळ आलेली आहे. पुण्यातील कर्वे रस्त्यावरील एस एम जोशी पुलाजवळ परीक्षा देणारी मुले आजही निदर्शने करत आहेत. निदर्शने करत असलेल्या या मुलांचा आक्रोश केवळ एका पदासाठी नाही तर त्यांच्या पिढ्यानपिढ्या उध्वस्त करणाऱ्या व्यवस्थेच्या विरोधात आहे. एमपीएससी परीक्षा हा महाराष्ट्रातील ग्रामीण भागातील गरिबातील गरीब.आणि कष्टाळू तरुणांसाठी शहरात येऊन अधिकारी बनण्याचे एकमेव स्वप्न असते. मात्र प्रश्नपत्रिका फुटीच्या वारंवार घडणाऱ्या घटनांमुळे हे स्वप्न एका रात्रीत मातीमोल व धुळीस मिळते. शेतकरी आईबापाने. मोठ्या भावाने शेतात राबून स्वतःचे पोट मारून किंवा सावकाराकडून नातेवाईकाकडून व्याजाने आणि कर्जावर पैसे आणून आपल्या पोराला पुण्यात अभ्यासक्रमासाठी पाठवलेले असते. खाणावळीचे पैसे. खोलीचे भाडे. आणि पुस्तकाचा खर्च.अभ्यासिकेचा खर्च. भागवताना विद्यार्थ्यांच्या डोळ्यात केवळ कुटुंबाचा उज्वल भविष्यकाळ असतो. पण... जेव्हा परीक्षा हॉलमध्ये बसण्यापूर्वी किंवा निकाल लागल्यानंतर प्रश्नपत्रिका बाजारात विकल्या गेल्याचे समजते तेव्हा त्या तरुणांच्या पायाखालची जमीन सरकते. गेल्या काही वर्षात महाराष्ट्रात एमपीएससी आणि इतर स्पर्धा परीक्षेच्या प्रश्नपत्रिका फुटण्याच्या अनेक घटना वारंवार घडत आहे. कधी महापरीक्षा पोर्टलचे घोटाळे. कधी टीसीएस आयबीपीएस प्रक्रियेतील संशयास्पद बाबी तर कधी थेट एमपीएससीच्या अंतर्गत परीक्षाबद्दलचा अनागोंदी कारभार त्यामुळे लाखो विद्यार्थ्यांचे अनेक वर्षे वाया गेलेले आहेत. पेपर फुटीची ही आकडेवारी पाहिली तर अंगावर काटा येतो.गेल्या पाच सहा वर्षात महाराष्ट्रात वेगवेगळ्या स्पर्धा परीक्षेच्या किमान१५ ते२५ वेळा प्रश्नपत्रिका लिंक झाल्याची प्रकरणे उघड झाली आहेत. एकाच परीक्षेतून हजारो बोगस अधिकारी तयार होण्याचा मार्ग मोकळा होतो. आणि प्रामाणिकपणे रात्रीचा दिवस करून अभ्यास करणारे हुशार विद्यार्थी वयाची मर्यादा संपल्यामुळे कायमचे बाद होतात. एमपीएससीच्या वयोमर्यादिचे बंधन आणि वाढत्या परीक्षा शुल्कामुळे आर्थिक ताण असह्य होतो.या नैराश्यातून महाराष्ट्राने अनेक होतकरु आणि उमद्या तरुणांना गमावलेले आहे.पुण्यात किंवा इतर शहरात रूम घेऊन अभ्यास करणारे अनेक विद्यार्थ्यांनी नैराश्यातून किंवा आत्मक्लेषाच्या भरात टोकाचे पाऊल उचलत त्यानी आत्महत्या केलेल्या आहेत.व करत आहेत.स्वप्न भंगल्यामुळे गळफास घेतलेल्या किंवा रेल्वे रुळावर आयुष्य संपवलेल्या स्वप्निल लोणकर असो वा अन्य अनेक तरुण यांच्या दुदैवी मृत्यूचे पाप कोणाच्या माथी मारणार?....एमपीएससी परीक्षा देणाऱ्या विद्यार्थ्यांच्या आत्महत्यांची ही मालिका थांबवण्याचे नाव घेत नाही कारण व्यवस्थेतील भ्रष्ट अधिकारी किंवा भ्रष्टाचार करणाऱ्याना पाठीशी घालण्याची संस्कृती अजूनही कायम आहे. तरुणाच्या मनात राज्यकर्त्यांविषयी आणि प्रशासनाविषयी प्रचंड रोष आहे. हरपाळकर यांची उचल बांगडी हा विद्यार्थ्यांच्या दबावाचा विजय असला तरी प्रश्नपत्रिका लिक करणाऱ्या माफियाच्या मुसक्या आवळल्याशिवाय हा प्रश्न सुटणार नाही. जोपर्यंत पेपर फुटी करणाऱ्या राजकीय नोकरशाहीच्या बलदंड साखळीला फाशीची किंवा जन्मठेपेची कठोर शिक्षा मिळत नाही तोपर्यंत न्याय होणार नाही हे नक्कीच आहे.

आयुष्यात पुढे जाण्यासाठी स्पोर्ट्स कल्चर फार महत्त्वाचे

सिंधुताई सपकाळ यांच्या लेकींशी कृष्णराज महाडिक यांचा फेस टू फेस संवाद"

ममता बाल सदन संस्थेला दिली सदिच्छा भेट

■ सासवड (दै. संध्या)



मुलींनो स्वतःला कधीच कमजोर समजू नका. कारण आज महिला पुरुषांच्या बरोबरीने कर्तृत्व सिद्ध करू लागल्या आहेत. जर तुमच्या "लाईफमध्ये अप-डाऊन आले तर स्पोर्ट्समधून प्रेरणा मिळते. स्पोर्ट असे क्षेत्र आहे की जे तुम्हाला कायम स्फूर्ती आणि प्रेरणा देत राहील ज्यामुळे तुमच्यामध्ये शिस्त निर्माण होईल. मी स्वतः स्पोर्ट्समधून पुढे आलेलो आहे. त्यामुळे आयुष्यात पुढे जाण्यासाठी स्पोर्ट्स कल्चर फार महत्त्वाचे ठरते, असा विश्वास भारतीय जनता युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी व्यक्त केला. पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ माईंच्या मायेने आणि संस्कारांनी उभ्या राहिलेल्या ममता बाल सदन (बालगृह), कुंभारवळण येथे भारतीय जनता युवा मोर्चाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष कृष्णराज महाडिक यांनी सदिच्छा भेट देऊन माईंच्या लेकींशी फेस-टू-फेस मनमोकळा संवाद साधला. मुलींनीही क्रीडा क्षेत्र, करिअर आणि भविष्यातील संधींबाबत उत्सुकतेने संवाद साधला. यावेळी क्रीडा क्षेत्रातील आपले अनुभव मुलींसमोर मांडले. शिक्षण, रोजगार, स्वावलंबन, सुरक्षितता, करिअर आणि जीवनातील अडचणींपासून ते मनाच्या तळातून आलेल्या प्रश्नांपर्यंत मुलींनी अनेक प्रश्न महाडिक यांच्यासमोर मोकळेपणाने मांडले. यावेळी मुलींशी संवाद साधताना कृष्णराज महाडिक म्हणाले, "काही प्रश्न शिक्षणाचे असतील... काही रोजगाराचे असतील... काही स्वावलंबनाचे असतील... काही मुलींच्या सुरक्षिततेचे असतील... तर कदाचित एखादा प्रश्न अगदी मनाच्या तळातून आलेला असेल. कुठलाही प्रश्न असो, आपण मला मनमोकळेपणाने विचारा. मी आपल्या प्रश्नांची उत्तरे देण्याचा पूर्ण प्रयत्न करेन.""तुमच्यासारख्या मुलींच्या स्वप्नांना समाजाची साथ कशी मिळेल?" या प्रश्नाचे उत्तर केवळ शब्दांत नव्हे, तर संवादातून आणि संवेदनशीलतेतून मिळायला हवे, अशी भावना व्यक्त करत त्यांनी माईंच्या सर्व लेकींना आवाहन केले, "मनातला प्रश्न मनात ठेवू नका... आज मनमोकळेपणाने विचारा! कारण माईंच्या घरात प्रश्न विचारण्यासाठी परवानगी लागत नाही; इथे प्रश्न मायेने ऐकले जातात आणि उत्तरांना आधाराची जोड दिली जाते."या आवाहनानंतर मुलींनीही मनातील अनेक प्रश्न थेट महाडिक यांच्यासमोर मांडले. महाडिक यांनी मुलींच्या प्रत्येक प्रश्नाला मनापासून आणि समर्पक उत्तरे देत त्यांच्या जिज्ञासेला प्रोत्साहन दिले. कार्यक्रमाच्या प्रारंभी पद्मश्री डॉ. सिंधुताई सपकाळ माईंच्या प्रतिमेला पुष्प अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

ममता बाल सदनचे अध्यक्ष दीपक गायकवाड यांच्या हस्ते कृष्णराज महाडिक यांचा शाल, श्रीफळ तसेच पिंपळ व तुळशीचे रोप देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमानंतर महाडिक यांनी ममता बाल सदन परिसराची पाहणी केली. त्यांनी संस्थेची गोशाळा आणि बेकरी यांना भेट देऊन तेथील कामकाजाची माहिती घेतली. माईंच्या कार्यातून उभ्या राहिलेल्या विविध उपक्रमांची त्यांनी आस्थेने पाहणी केली.

यावेळी पुणे व सासवड परिसरातील भाजपचे विविध पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमास अधीक्षिका स्मिता पानसरे, संचालक गोपाल गायकवाड, प्रसन्न गायकवाड, संजय गायकवाड, सुजाता गायकवाड, सरपंच मंजुषा गायकवाड, नाना कुंभारकर यांच्यासह ममता बाल सदनमधील मुली मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जनसंपर्क अधिकारी मुकेश चौधरी यांनी केले.

असे विचारले प्रश्न ?

"एक चांगला नेता होण्यासाठी अभ्यास, वक्तृत्व, धाडस आणि संवेदनशीलता यापैकी कोणत्या गुणाला आपण सर्वाधिक महत्त्व देता?", "अनाथ किंवा वंचित मुलांना समाजात समान संधी मिळण्यासाठी युवकांनी कोणती भूमिका बजावली पाहिजे?", "आपल्या आई-वडिलांकडून मिळालेला असा कोणता संस्कार आहे, जो आपण आयुष्यभर जपता?", "ग्रामीण भागातील मुलींना उच्च शिक्षण आणि चांगल्या करिअरच्या संधी मिळाव्यात यासाठी शासन आणि समाजाने आणखी काय करायला हवे?", तसेच "महाराष्ट्रभर प्रवास करताना युवकांच्या कोणत्या प्रश्नाने आपल्याला सर्वाधिक विचार करायला लावले?" असे विविध प्रश्न मुलींनी विचारले. मुलींच्या प्रश्नांना सुद्धा त्यांनी तितकीच दिलखुलास उत्तरे दिली.

घराघरात सौरऊर्जेचा प्रकाश; 'सूर्यघर' आणि 'स्मार्ट सोलर' योजनेची शिरूरमध्ये जनजागृती

नागरिकांना अनुदान, वीजबचत आणि अर्ज प्रक्रियेची माहिती; पंचायत समितीचा विशेष उपक्रम

■ कवठे येमाई (दै. संध्या)



वाढत्या वीजखर्चाला पर्याय देतानाच पर्यावरणपूरक आणि स्वच्छ ऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी प्रधानमंत्री सूर्यघर वीज योजना तसेच स्वयंपूर्ण महाराष्ट्र रूफटॉप (स्मार्ट) सोलर योजना याबाबत शिरूर पंचायत समितीच्या वतीने नागरिकांमध्ये जनजागृती करण्यात आली.या उपक्रमांतर्गत पंचायत समिती परिसरात माहिती किऑस्क उभारून नागरिकांना रूफटॉप सोलरचे फायदे, उपलब्ध शासकीय अनुदान, पात्रता, अर्ज करण्याची पद्धत आणि घराच्या छतावर सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी आवश्यक प्रक्रिया याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.१५ सप्टेंबर ते १७ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत स्वयंपूर्ण महाराष्ट्र रूफटॉप (स्मार्ट) सोलर योजनेच्या जनजागृती साठी विशेष अभियान राबविण्यात येत आहे. या काळात अधिकाधिक नागरिकांनी सौरऊर्जेचा वापर करावा, यासाठी माहिती पोहोचविण्यावर भर देण्यात येत आहे.

घराच्या छतावर सौरऊर्जा प्रकल्प उभारल्यास पारंपरिक विजेवरील अवलंबित्व कमी होऊन वीजबिलात संभाव्य बचत, स्वच्छ ऊर्जेचा वापर आणि पर्यावरण संवर्धनाला हातभार लागू शकतो. त्यामुळे शासनाच्या योजनांचा लाभ घेऊन नागरिकांनी आपल्या घरांवर रूफटॉप सोलर बसविण्याचा विचार करावा, असे आवाहन करण्यात आले.

यावेळी शिरूर पंचायत समितीच्या सभापती स्वाती घावटे, जिल्हा परिषद व पंचायत समिती सदस्य, गटविकास अधिकारी महेश ढोके, महावितरण बारामती मंडळाचे अधीक्षक अभियंता दीपक लहामगे, शिरूर उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता शरद माने, शिक्रापूर उपविभागाचे उपकार्यकारी अभियंता सुमित जाधव, नोडल अधिकारी गणेश गोरे, संदेश पगारिया, थोरात मॅडम तसेच महावितरणचे अधिकारी-कर्मचारी आणि वीज ग्राहक उपस्थित होते.

महावितरणच्या माध्यमातून नागरिकांना सौरऊर्जेचा वापर केल्यास होणारी संभाव्य बचत, पर्यावरणपूरक ऊर्जेचे महत्त्व, रूफटॉप सोलरची कार्यपद्धती, उपलब्ध शासकीय अनुदान आणि योजनेसाठी अर्ज करण्याच्या प्रक्रियेबाबत मार्गदर्शन करण्यात आले."घराघरात सौरऊर्जा पोहोचली तर वीजबचतीसोबतच स्वच्छ आणि शाश्वत ऊर्जेच्या दिशेने महाराष्ट्राची वाटचाल अधिक वेगवान होईल," असा संदेश या जनजागृती अभियानातून देण्यात आला.

वालचंदनगर पोलीस स्टेशनमध्ये महत्त्वाची बैठक संपन्न

शांतता व सुव्यवस्था राखण्याचे पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांचे आवाहन

■ जंक्शन (दै. संध्या)



आगामी नवरात्रोत्सव शांततेत आणि उत्साहात पार पाडण्याच्या उद्देशाने सोमवार दि. ०५ सप्टेंबर २०२६ रोजी सायंकाळी ५ ते ६ वाजेदरम्यान पुणे ग्रामीणच्या इंदापूर तालुक्यातील वालचंदनगर पोलीस स्टेशन येथे एका विशेष बैठकीचे आयोजन करण्यात आले होते. पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडलेल्या या बैठकीस पोलीस पाटील तसेच परिसरातील विविध नवरात्र उत्सव मंडळांचे अध्यक्ष व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. सदर बैठकीमध्ये आगामी नवरात्रोत्सवाच्या अनुषंगाने मंडळांच्या आगमन व विसर्जन मिरवणुका तसेच एकूणच उत्सवाच्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी पोलिसांच्या वतीने मंडळांना स्पष्ट व कडक सूचना देण्यात आल्या आहेत. त्यानुसार, वर्गणीसाठी कोणावरही जबरदस्ती करू नये, असे आवाहन करण्यात आले असून, जबरदस्ती केल्यास संबंधितांवर खंडणीसारखे गंभीर कायदेशीर गुन्हे दाखल करण्यात येणार असल्याचा इशारा देण्यात आला आहे. तसेच ध्वनीप्रदूषणाचा त्रास ज्येष्ठ नागरिक, लहान मुले व गरोदर महिलांना होऊ नये म्हणून डीजेचा वापर न करता मिरवणुकांमध्ये पारंपरिक वाद्यांचा वापर करावा आणि लेझर लाईटच्या वापरावर पूर्ण बंदी असल्याने त्याचा वापर करू नये, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. याशिवाय, सार्वजनिक रस्त्यावर वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अशा पद्धतीने मंडप उभारू नयेत, देवीच्या मूर्तीची विटंबना होणार नाही याची दक्षता घेऊन मंडळांनी २४ तास स्वयंसेवक नियुक्त करून चोख सुरक्षा ठेवावी, आणि आवश्यक ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसवावेत असे सांगण्यात आले. मशीद किंवा इतर धार्मिक स्थळांसमोरून मिरवणूक जाताना गुलाल उधळण्याबाबत व इतर बाबींमध्ये विशेष काळजी घेऊन सामाजिक सलोखा व शांतता कायम ठेवावी, तसेच सर्व मंडळांनी नियमांनुसार आवश्यक परवाने घेणे बंधनकारक असल्याचे स्पष्ट करण्यात आले. मिरवणुकीचा एकदा निश्चित केलेला मार्ग अचानक बदलू नये, अशा सूचनाही पदाधिकाऱ्यांना देण्यात आल्या. तसेच, पोलीस पाटलांनी आपल्या गावातील नवरात्र उत्सव मंडळांना सकाळी व सायंकाळी नियमित भेट देऊन परिस्थितीचा आढावा घ्यावा आणि कोणतीही अनुचित बाब निदर्शनास आल्यास तत्काळ पोलीस स्टेशनला कळवावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत. वालचंदनगर पोलीस स्टेशनच्या वतीने आयोजित या बैठकीमुळे परिसरात कायदा व सुव्यवस्था कायम राखण्यास मदत होणार असून, सर्व नागरिकांनी व मंडळांनी प्रशासनाला सहकार्य करून नवरात्रोत्सव शांततेत जावा, असे आवाहन पोलीस निरीक्षक गोपाळ पवार यांनी केले आहे.

सामाजिक न्याय भवन येथे ज्येष्ठ नागरिक दिन उत्साहात संपन्न

■ पुणे (दै. संध्या)



"ज्येष्ठ नागरिकांचा सन्मान करण्याची संधी मिळणे हे आमचे भाग्य आहे. ज्येष्ठांमधील उत्साह, आनंद आणि सामाजिक कार्याची ओढ वाखाणण्याजोगी आहे. ज्येष्ठ नागरिक आणि तरुण पिढीतील विसंवाद दूर करून दोन्ही पिढ्यांनी एकमेकांना समजून घेत चांगल्या गोष्टींची देवाणघेवाण करावी," असे प्रतिपादन समाजकल्याण विभागाचे सहायक आयुक्त विशाल लोंढे यांनी केले. भारत रत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, विश्रांतवाडी येथे जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. ज्येष्ठ नागरिकांचे समाजातील महत्त्वाचे स्थान लक्षात घेता, त्यांना आवश्यक ते सर्व सहकार्य करण्यासाठी समाजकल्याण विभागाचे कार्यालय सदैव तत्पर राहील, अशी ग्वाहीही लोंढे यांनी दिली. तसेच ज्येष्ठ नागरिकांना उत्तम आरोग्य व दीर्घायुष्य लाभावे, अशा शुभेच्छा त्यांनी दिल्या. प्रादेशिक उपायुक्त, समाजकल्याण पुणे विभाग आणि सहायक आयुक्त, समाजकल्याण पुणे यांच्या संयुक्त विद्यमाने सेवा संकल्प अभियानांतर्गत हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात महामानवांना अभिवादन करून महाराष्ट्र गीताने झाली. त्यानंतर विशाल लोंढे व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते आरोग्य शिबिराचे उद्घाटन करण्यात आले. कार्यक्रमाची प्रस्तावना करताना महात्मा बसवेश्वर बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचे योगेश पाटील यांनी सांगितले की, २४ सप्टेंबर २०२६ रोजीच्या शासन निर्णयानुसार १ ऑक्टोबर हा दिवस राज्यात जागतिक ज्येष्ठ नागरिक दिन म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. त्यानुषंगाने सामाजिक न्याय भवनात या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले असून, दिवसभरातील विविध उपक्रमांची माहिती त्यांनी दिली. समाजकल्याण विभागाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांसाठी विशेष कार्य करणाऱ्या दिलीप पवार, पांडुरंग लाड, डॉ. मिलिंद सरदार, अन्ना शेलार, पोपट कांबळे, शुभांगी वाघमारे, लता शिंदे आणि जोसेफ साखरे यांचा गौरव करण्यात आला.

तसेच ज्येष्ठ नागरिकांसाठी कार्यरत असलेल्या फेस्कॉम पुणे, अस्कॉप पुणे, नागनाथ ज्येष्ठ नागरिक संघ पाटस (दौंड), ज्येष्ठ नागरिक संघ बारामती, मल्लिकार्जुन ज्येष्ठ नागरिक संघ न्हावरे (शिरूर), ज्योतिर्लिंग ज्येष्ठ नागरिक संघ पुरंदर, श्रीसंत तुकाराम ज्येष्ठ नागरिक संघ जुन्नर, ज्येष्ठ नागरिक संघ लोणावळा, ज्येष्ठ नागरिक संघ भोर, वडगाव शेरी ज्येष्ठ नागरिक संघ, तसेच निवारा वृद्धाश्रम, मातोश्री वृद्धाश्रम आणि अंधजन महिला वृद्धाश्रम, पुणे यांचा सन्मान करण्यात आला.

औषधांच्या नावातील साधर्म्य पडले महागात

■ पुणे (दै. संध्या)

औषधांच्या नावातील साधर्म्य रुग्णांसाठी किती धोकादायक ठरू शकते, याचे गंभीर उदाहरण समोर आले आहे. अहमदाबादस्थित कॅडिला फार्मास्युटिकल्स लिमिटेडच्या 'ॲसिलॉक १५०' आणि 'ॲसिलॉक १५० +' या औषधांमध्ये वेगवेगळे औषध घटक असतानाही जवळपास समान ब्रँड नावाचा वापर करण्यात आल्याचे तपासणीत आढळले. या प्रकरणी अन्न व औषध प्रशासनाने (एफडीए) पुणे, ठाणे आणि नागपूर येथील कंपनीच्या तीन गोदामांचे औषध विक्री व वितरण परवाने रद्द केले आहेत. 'ॲसिलॉक १५०'मध्ये रॅनिटिडिन १५० मिलीग्रॅम, तर 'ॲसिलॉक १५० +'मध्ये फॅमोटिडिन २० मिलीग्रॅम हा वेगळा औषध घटक असल्याचे तपासणीत निष्पन्न झाले. दोन्ही औषधे आम्लपित्तासाठी वापरली जात असली, तरी त्यांच्या औषध घटकांमध्ये फरक आहे. त्यामुळे केवळ नावातील '+' या चिन्हामुळे औषध विक्रेता किंवा रुग्णाच्या मनात संभ्रम निर्माण होण्याची शक्यता गंभीर मानली जात आहे. एफडीएच्या तपासणीत आणखी गंभीर बाब समोर आली. काही विक्रेत्यांनी रॅनिटिडिनची मागणी केली असताना त्यांना फॅमोटिडिनचा पुरवठा करण्यात आल्याचे आढळले. औषधांच्या बाबतीत अशा प्रकारचा संभ्रम रुग्णाच्या उपचारांवर परिणाम करू शकतो. त्यामुळे औषधाचे नाव, त्यातील घटक आणि मात्रा यांच्यात स्पष्टता असणे अत्यावश्यक आहे. याप्रकरणी गुजरातच्या अन्न व औषध नियंत्रण प्रशासनाने संबंधित औषधांचे उत्पादन परवाने २ जून रोजी रद्द केले होते. ही बाब महाराष्ट्रातील संबंधित यंत्रणेकडून लपवून ठेवून औषधांची विक्री सुरू ठेवण्यात आल्याचेही तपासणीत समोर आल्याचे सांगण्यात आले आहे.

शिरसाई टेकडीपासून डेअरी उद्योगापर्यंत विद्यार्थ्यांची ज्ञानयात्रा

■ अंथुर्णे (दै. संध्या)



जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, अंथुर्णेच्या (ता. इंदापूर) विद्यार्थ्यांची परिसर भेट उत्साहात व शैक्षणिक वातावरणात पार पडली. या भेटीत विद्यार्थ्यांनी भरणेवाडी येथील शिरसाई माता मंदिर व टेकडी, शेततळे, नेचर डिलाईट डेअरी कळस, बिरोबा मंदिर व वन उद्यान यांना भेटी दिल्या.

शिरसाई टेकडीवर विद्यार्थ्यांनी देवीचे दर्शन घेऊन मंदिराचा इतिहास व परिसराची माहिती जाणून घेतली. शेततळ्याच्या भेटीदरम्यान दत्ता गोसावी सर यांनी जलसंधारणाचे महत्त्व व दुष्काळाच्या काळात शेततळ्याचे फायदे समजावून सांगितले. नेचर डिलाईट डेअरी, कळस येथे दूध संकलन, प्रक्रिया व विविध दुग्धजन्य पदार्थांची निर्मिती विद्यार्थ्यांनी प्रत्यक्ष पाहिली. एच. आर. कदम यांनी प्रकल्पाची माहिती देत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. मा. अर्जुन देसाई, डॉ. जय देसाई व संदीप देसाई यांच्या सहकार्याने विद्यार्थ्यांना उद्योग-व्यवसायाचा प्रत्यक्ष अनुभव मिळाला. विद्यार्थ्यांना सुगंधी दूधही देण्यात आले. बिरोबा मंदिर परिसरात विद्यार्थ्यांनी भोजनाचा आस्वाद घेतला तसेच स्वतः भेळ तयार करून खाण्याचा आनंद घेतला. वन उद्यानात विविध प्राणी-वन्यजीवांचे मॉडेल पाहून विद्यार्थ्यांनी खेळ, गाणी व नृत्याचा आनंद घेतला. "पुस्तकी ज्ञानाला प्रत्यक्ष अनुभवाची जोड" देणारी ही परिसर भेट विद्यार्थ्यांसाठी ज्ञान, आनंद आणि अनुभवाचा सुंदर संगम ठरली. परिसर भेटीच्या यशस्वी आयोजनासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष संदीप साबळे, उपाध्यक्ष अजित गायकवाड, अभिजीत साबळे, महेंद्र गायकवाड व अर्जुन शिंदे यांनी सहकार्य केले. मुख्याध्यापक व सर्व शिक्षकवृंदाने परिसर भेटीचे नियोजन व व्यवस्थापन यशस्वीपणे केले.

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे-४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे - ४११००२ येथे प्रसिद्ध केले. संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०-२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

थोडक्यात पण महत्वाचे




कविता जागतिक झाली आहे, कवींनी स्वतःच्या अक्षरांची उंची वाढवावी

पुणे : दैनिक संध्या

आता कविता ही जागतिक झाली आहे. ती केवळ वैयक्तिक राहिलेली नाही. याचे भान कवींनी ठेवले पाहिजे. आपल्या अक्षरांची उंची वाढवून कविता अधिक व्यापक करण्याचा प्रयत्न केला पाहिजे, असे मत ज्येष्ठ गझलकार म. भा. चव्हाण यांनी व्यक्त केले. वल्लरी मीडिया, पुणे प्रस्तुत वल्लरी प्रकाशनातर्फे प्रज्ञा कल्याणकर संपादित 'मालिनी' या प्रातिनिधिक काव्यसंग्रहाचे प्रकाशन म. भा. चव्हाण यांच्या अध्यक्षतेखाली झाले. भारत इतिहास संशोधन मंडळातील वि.का. राजवाडे सभागृहात कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ज्येष्ठ लेखक-साहित्यिक दिलीप फलटणकर, लेखिका-कवयित्री संगीता पुराणिक, समर्थ फाउंडेशन पुणेचे अध्यक्ष किरण इनामदार, अभिनेत्री गौरी रत्नपारखी, वल्लरी प्रकाशनाच्या सल्लागार मानसी चिटणीस, यशदा अधिकारी व्यंकटेश कल्याणकर आदी उपस्थित होते. 'मालिनी' या काव्यसंग्रहात आकांक्षा बोभाटे, गजानन चोपडे, नुपूर दीक्षित, प्रांजली हारकूड, अलका जाधव, अमित जहागीरदार, हेमंत जोशी, सौमित्र केंजळे, प्रेरणा खुट्टे आणि स्वाती मेहेंदळे यांच्या कवितांचा समावेश आहे. दिलीप फलटणकर म्हणाले, कविता ही फार नाजूक गोष्ट आहे. महाराष्ट्राला कवितेची मोठी परंपरा लाभली आहे. त्यामुळे कवीने या परंपरेचे भान ठेवत कविता तरल ठेवली पाहिजे. यावेळी त्यांनी महाराष्ट्रातील विविध कवींच्या कविता प्रेक्षकांना ऐकवून त्यांच्या काव्यस्मृती जागवल्या. व्यंकटेश कल्याणकर म्हणाले, समाजामध्ये आनंद पसरविण्याचा प्रयत्न कवितांच्या माध्यमातून होत असतो. नवोदित कवींना संधी देऊन हा आनंद समाजापर्यंत पोहोचविण्याचे काम वल्लरी प्रकाशन करत आहे. वाचकांची अभिरूची लक्षात घेऊन लेखकांनी अभिव्यक्त व्हायला हवे. कार्यक्रमाचे प्रज्ञा कल्याणकर यांनी सूत्रसंचालन केले.

किराना परंपरेच्या तेराव्या सत्रात पंडित फिरोज दस्तूर यांच्या कार्यकर्तृत्वाचा वेध



पुणे : दैनिक संध्या

डॉ. प्रभा अत्रे फाऊंडेशन संचालित स्वरमयी गुरुकुलाच्या वतीने आयोजित 'किराना परंपरा' या विशेष कार्यक्रम मालिकेतील तेरावे सत्र रविवार, दि. ११ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता आयोजित करण्यात आले आहे. या सत्रात किराना घराण्याचे ज्येष्ठ गायक पंडित फिरोज दस्तूर यांच्या जीवन आणि संगीतमय कार्याचा वेध घेतला जाणार आहे. किराना परंपरेतील महत्त्वाच्या व्यक्तिमत्त्वांचे कार्य रसिक आणि संगीत अभ्यासकांसमोर उलगडून दाखविणाऱ्या या मालिकेतील मागील बारा सत्रांना रसिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आहे. त्याच धर्तीवर या सत्राचीही रचना करण्यात आली आहे. पंडित फिरोज दस्तूर हे किराना घराण्याचे प्रख्यात शास्त्रीय गायक आणि सवाई गंधर्व यांचे ज्येष्ठ शिष्य होते. भारतरत्न पंडित भीमसेन जोशी यांचे ते गुरुबंधू होते. बालकलाकार म्हणून त्यांनी सुरुवातीच्या काळात हिंदी चित्रपटांतही काम केले. पुढे उस्ताद अब्दुल करीम खाँ यांच्या स्वरप्रधान गायकीचे समर्थ वारसदार म्हणून त्यांनी स्वतंत्र स्थान निर्माण केले. स्वरांची अचूकता आणि मधुर आविष्कार ही त्यांच्या गायकीची वैशिष्ट्ये मानली जातात. या कार्यक्रमाची प्रस्तुती संगीत अभ्यासक डॉ. केशवचैतन्य कुंटे आणि डॉ. अतींद्र सरवडीकर करणार आहेत. व्याख्यान आणि दुर्मिळ ध्वनिफितींच्या माध्यमातून पंडित फिरोज दस्तूर यांच्या गायकीचा तसेच त्यांच्या संगीतविषयक योगदानाचा परिचय करून दिला जाणार आहे. संगीत अभ्यासक, विद्यार्थी आणि रसिकांसाठी कार्यक्रमाचा प्रवेश विनामूल्य असून अधिकाधिक रसिकांनी उपस्थित राहून या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन स्वरमयी गुरुकुलचे कार्यक्रम निर्देशक प्रसाद भडसावळे यांनी केले आहे. स्थळ : स्वरमयी गुरुकुल सभागृह, जे. एम. रोड, संभाजी बागेसमोर, हॉटेल शिवसागर गल्ली, पुणे. वेळ : रविवार, दि. ११ ऑक्टोबर २०२६, सकाळी १० वाजता.

महाराष्ट्राने पेट्रोल बाइककडून ईव्ही बाइककडे वळण्याची कालमर्यादा अधिसूचित केली

पुणे : दैनिक संध्या

महाराष्ट्र परिवहन विभागाने राज्यातील सर्व आरटीओ आणि तात्पुरता (प्रोव्हिजनल) बाइक-टॅक्सी परवाना असलेल्या ॲग्रीगेटर्सना निर्देश जारी केले आहेत. याअंतर्गत बाइक-टॅक्सी ताफ्यांना सध्याच्या पेट्रोल वाहनांवरून १००% इलेक्ट्रिक वाहनांकडे वळण्यासाठी टप्प्याटप्प्याने संक्रमण कालावधी देण्यात आला आहे. केंद्रीय रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्री मा. श्री. नितीन गडकरी यांनी राज्यांना बाइक टॅक्सीला परवानगी देण्याचे आवाहन केले असून, त्यातून सुमारे ८ कोटी लोकांसाठी उपजीविकेच्या संधी निर्माण होऊ शकतात, असे म्हटले आहे. याच पार्श्वभूमीवर हा निर्णय घेण्यात आला आहे. १ ऑक्टोबर रोजीच्या पत्राद्वारे, महाराष्ट्र परिवहन विभागाने 'महाराष्ट्र बाइक टॅक्सी नियम, २०२५' अंतर्गत अर्ज करणाऱ्या किंवा तात्पुरता परवाना मिळालेल्या ॲग्रीगेटर्सना त्यांच्या ताफ्यात १००% इलेक्ट्रिक बाइकचा समावेश करण्यासाठी दोन टप्प्यांत नऊ महिन्यांच्या संक्रमण कालावधीला मंजुरी दिली आहे - सुरुवातीचे सहा महिने आणि त्यानंतर तीन महिन्यांची अतिरिक्त मुदतवाढ. ही टप्प्याटप्प्याने ठरवलेली कालमर्यादा संपूर्ण बाइक-टॅक्सी इकोसिस्टमसाठी महत्त्वाची आहे. ताफ्याशी संबंधित अट ॲग्रीगेटर्सच्या माध्यमातून लागू केली जात असली, तरी या अतिरिक्त संक्रमण कालावधीमुळे सहभागी चालकांनाही इलेक्ट्रिक वाहनांकडे वळण्याच्या तयारीसाठी अधिक वेळ मिळेल. त्यामुळे तात्काळ बदलाचा भार न येता ते नियमन असलेल्या बाइक-टॅक्सी इकोसिस्टममध्ये सहभागी होऊ शकतील. बाइक टॅक्सीच्या रोजगार क्षमतेकडे राष्ट्रीय पातळीवरही अधिक लक्ष वेधले जात असतानाच ही घडामोड झाली आहे. मा. श्री. नितीन गडकरी यांनी अलीकडेच राज्यांना खासगी दुचाकी वाहनांना बाइक टॅक्सी म्हणून चालवण्याची परवानगी देण्याचे आवाहन केले होते. या निर्णयामुळे, विशेषतः उत्पन्नाचा अतिरिक्त स्रोत उपलब्ध करून देत, सुमारे ८ कोटी लोकांसाठी उपजीविकेच्या संधी निर्माण होऊ शकतात, असे त्यांनी म्हटले होते. एका बाइक टॅक्सी असोसिएशनच्या प्रवक्त्याने सांगितले: "महाराष्ट्राच्या बाइक-टॅक्सी आराखड्याच्या अंमलबजावणीत व्यावहारिक आणि दूरदर्शी दृष्टिकोन स्वीकारल्याबद्दल आम्ही मा. मुख्यमंत्री श्री. देवेंद्र फडणवीस आणि मा. परिवहन मंत्री श्री. प्रताप सरनाईक यांच्या नेतृत्वाचे कौतुक करतो. १००% इलेक्ट्रिक ताफ्याकडे वळण्यासाठी टप्प्याटप्प्याने संक्रमण कालावधी देण्याचा निर्णय, राज्याची स्वच्छ वाहतुकीची (क्लीन मोबिलिटी) उद्दिष्टे ठामपणे कायम ठेवत, अंमलबजावणीतील प्रत्यक्ष परिस्थितीचाही विचार करतो." या क्षेत्रातील उपजीविकेच्या संधीही तितक्याच महत्त्वाच्या आहेत. केंद्रीय मंत्री मा. श्री. नितीन गडकरी यांनी अधोरेखित केले आहे की, बाइक टॅक्सीमुळे देशभरात सुमारे ८ कोटी लोकांसाठी रोजगार आणि उपजीविकेच्या संधी निर्माण होऊ शकतात. ही क्षमता राज्यातील शहरांमधील लाखो चालकांसाठी कमाईच्या प्रत्यक्ष संधींमध्ये रूपांतरित करण्याची संधी महाराष्ट्राकडे आहे; त्याचबरोबर प्रवाशांनाही परवडणारा आणि सोयीचा वाहतूक पर्याय मिळेल."

ज्ञानाधारित अर्थव्यवस्थेसाठी संशोधनाला चालना द्या

विद्यार्थ्यांना नवोन्मेषाच्या संधी मिळाल्यासच जगाच्या बाजारपेठेत स्पर्धा शक्य - डॉ. विवेक सावंत



■ पुणे (दै. संध्या)

जगाची नवीन अर्थव्यवस्था ही ज्ञानावर आधारित असून ज्ञान हाच तिचा कच्चा माल आहे. संशोधन, पेटंट आणि नवोन्मेषाच्या माध्यमातून निर्माण होणाऱ्या बौद्धिक संपत्तीवर आधारित रॉयल्टी ही भविष्यातील अर्थव्यवस्थेची महत्त्वाची ताकद ठरणार आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना संशोधनासाठी संधी, अत्याधुनिक ज्ञान आणि नवउत्पादनासाठी आवश्यक वातावरण निर्माण करणे गरजेचे आहे. आपली बुद्धिमान मुले परदेशात जाऊन संशोधन करतात आणि त्यातून मिळणारी बौद्धिक संपत्ती परदेशी कंपन्यांच्या माध्यमातून बाजारात येते. ही परिस्थिती बदलण्यासाठी देशातच नवोन्मेषाच्या संधी निर्माण कराव्या लागतील, असे मत एमकेसीएलचे मुख्य मार्गदर्शक आणि महात्मा गांधी स्मारक निधीचे विश्वस्त डॉ. विवेक सावंत यांनी व्यक्त केले.

महात्मा गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दलाच्या वतीने कोथरूड येथील गांधी भवन येथे आयोजित 'राष्ट्रपिता महात्मा गांधी सप्ताह २०२६' अंतर्गत 'तरुणांसमोरील आव्हाने' या विषयावरील व्याख्यानात ते बोलत होते. यावेळी महात्मा गांधी स्मारक निधीचे अध्यक्ष व भारती विद्यापीठाचे कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, विश्वस्त अन्वर राजन, कार्यक्रमाचे अध्यक्ष लक्ष्मीकांत देशमुख, एम. एस. जाधव, प्रवीण सप्तर्षी, रमेश आढाव यांच्यासह आप्पा अनारसे, तेजस भालेराव, सूरज कुलकर्णी, सचिन चौहान, चंद्रकांत जाधव आदी उपस्थित होते.डॉ. सावंत म्हणाले, "नवीन अर्थव्यवस्थेचा आधार ज्ञान असून एकदा ज्ञानावर गुंतवणूक केली की त्यातून दीर्घकाळ रॉयल्टी निर्माण होऊ शकते. मोबाईल तंत्रज्ञानामध्ये हजारो पेटंटचा वापर होतो. इलेक्ट्रिक वाहनांमध्ये तुलनेने कमी पार्ट असले तरी त्यामागील विविध तंत्रज्ञान आणि पेटंटसाठी मोठ्या प्रमाणावर खर्च होतो. त्यामुळे विद्यार्थ्यांना संशोधनाची संधी दिली नाही, तर देशाला अशा प्रकारची बौद्धिक संपत्ती निर्माण करता येणार नाही." एमकेसीएलच्या माध्यमातून राज्यात सुमारे ६ हजार ३०० केंद्रे कार्यरत असून दरवर्षी सुमारे नऊ लाख विद्यार्थी तंत्रज्ञानाच्या माध्यमातून संगणक शिक्षण घेत असल्याचे त्यांनी सांगितले. "आज वेग, अतिवेग आणि जीवघेणा वेग अशा तीन पातळ्यांवर समाज बदलत आहे. या वेगाशी जुळवून घेताना युवकांची दमछाक होत आहे. पूर्वी स्थैर्य आणि निश्चितता होती; मात्र बदलत्या तंत्रज्ञानामुळे सातत्याने परिवर्तन होत आहे. आव्हान म्हणजे अशक्यता नाही," असे त्यांनी स्पष्ट केले. ग्रामीण आणि शहरी भागातील शैक्षणिक दरी अद्याप मोठी असून ग्रामीण विद्यार्थ्यांसमोर स्पर्धेत टिकून राहण्याचे आव्हान आहे. मूठभर यशस्वी व्यक्तींच्या उदाहरणांवरून यशाचे मापदंड ठरवल्याने युवकांमध्ये जीवघेणी स्पर्धा निर्माण होत आहे. एकसारख्या परीक्षा आणि ठरावीक उत्तरपद्धतीमुळे नवीन विचारांना पुरेशी चालना मिळत नाही. विद्यार्थ्यांना आर्थिक साक्षरता, तंत्रज्ञान साक्षरता आणि कौशल्याधारित शिक्षणाची गरज आहे; मात्र पारंपरिक शिक्षणपद्धतीत त्यावर पुरेसा भर नसल्याचे त्यांनी नमूद केले.

देशाच्या लोकसंख्येच्या तुलनेत संसाधने मर्यादित असल्याने विकासाची प्राथमिकता लोकांच्या सर्वांगीण विकासावर केंद्रित असली पाहिजे. शिक्षणाच्या पायाभूत सुविधा आणि गुणवत्तेत वाढ करण्याची गरज आहे. शिक्षकांवर विविध प्रकारची अतिरिक्त कामे सोपविली जात असल्याने त्याचा परिणाम अध्यापनावर होतो. उच्च शिक्षणातील प्रवेशातही घट होत असल्याने युवकांना शिक्षणानंतरच्या संधींबाबत निर्माण झालेली अनिश्चितता दूर करण्यासाठी दीर्घकालीन धोरण आवश्यक असल्याचे डॉ. सावंत यांनी सांगितले. देशातील संपत्तीचे केंद्रीकरण, युवकांमधील असुरक्षितता, रोजगाराच्या मर्यादित संधी आणि संस्थात्मक व्यवस्थेवरील घटता विश्वास ही आव्हाने गांभीर्याने घेण्याची गरज आहे. डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर युवकांच्या ज्ञानवृद्धीसाठी आणि कौशल्यविकासासाठी होण्याऐवजी भावनिक वातावरण निर्माण करण्यासाठी होऊ नये. युवकांना रोजगार आणि स्वतःच्या क्षमतेचा विकास करण्यासाठी दीर्घकालीन संधी निर्माण करणे आवश्यक आहे. देश संविधानाच्या चौकटीत चालविण्यासोबतच चारित्र्यसंपन्नता आणि सामाजिक जबाबदारीची जपणूक करणेही तितकेच महत्त्वाचे आहे, असे डॉ. सावंत यांनी सांगितले.

देशात सत्ताधारी राज्य करण्यासाठी जातीधर्म आधारित ध्रुवीकरणाचे राजकारण करत आहे. मूलभूत गोष्टीसाठी विद्यार्थी यांना झगडावे लागते त्यामुळे लोकशाही मध्ये आपण खरेच राहतो का असा प्रश्न निर्माण होतो. एखाद्या प्रश्नावर कोणी आवाज उठवला की त्याला एखादे लेबल लावून त्याची बदनामी केली जाते. भारताची खरी ताकद लोकात असून त्याचे प्रतीक त्याठिकाणी जाणवत होते आणि मुली त्याठिकाणी २४ तास स्वतःला सुरक्षित समजत होत्या.

विचार आजही महत्त्वाचे

महात्मा गांधींची तत्त्वे आणि कार्यपद्धती आजही कालबाह्य झालेली नाही. गांधींनी विविध विषयांचा अभ्यास करून मांडलेली तत्त्वे आज कॉर्पोरेट जगतातही व्यवस्थापनाच्या संदर्भात अभ्यासली जातात. केवळ पुस्तकी शिक्षणामुळे रोजगारक्षमतेचा प्रश्न सुटत नाही. वाढता चंगळवाद आणि पर्यावरणीय संकटाच्या पार्श्वभूमीवर गांधींचे पर्यावरणविषयक विचार आजही महत्त्वाचे आहेत, असे त्यांनी नमूद केले.

शारंगधर साठे यांना पं. दत्तात्रय कासलीकर संवादिनी वादन पुरस्कार

■ पुणे (दै. संध्या)



प्रसिद्ध गायक पं. मनोहरराव कासलीकर यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त दत्तात्रय संगीत शैक्षणिक बहुउद्देशीय संस्थेतर्फे चंद्रपूर येथे आयोजित दत्त मनोहर संगीत समारोहात ज्येष्ठ संवादिनी वादक प्रा. शारंगधर साठे यांना पं. दत्तात्रय कासलीकर संवादिनी वादन पुरस्कार प्रदान करण्यात आला. एकल संवादिनी वादन तसेच संगीताच्या प्रचार-प्रसारासाठी केलेल्या कार्याची दखल घेत त्यांना हा पुरस्कार देण्यात आला. नवीन पिढीतील आश्वासक गायक विशाल मोघे यांना पं. मनोहरराव कासलीकर शास्त्रीय गायन पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी लोकमान्य टिळक स्मारक मंदिराचे अध्यक्ष अधिवक्ता रवींद्र भागवत होते. प्रमुख पाहुण्या डॉ. राजलक्ष्मी यांच्या उपस्थितीत अधिवक्ता रवींद्र भागवत आणि डॉ. राजलक्ष्मी यांच्या हस्ते पुरस्कार प्रदान करण्यात आले. संस्थेचे अध्यक्ष विवेक कासलीकर यांच्यासह अनेक कलाकार यावेळी उपस्थित होते.

श्री महालक्ष्मी मंदिरातर्फे नवरात्र उत्सव मंडळांकरिता स्पर्धा

यंदा प्रथमच आयोजन ; विनामूल्य प्रवेश ; एकूण ७५ हजार रुपयांपेक्षा अधिक पारितोषिके

■ पुणे (दै. संध्या)

नवरात्रोत्सवात पुणे शहरात अनेक नवरात्र उत्सव मंडळे धार्मिकतेसोबतच सांस्कृतिक आणि सामाजिकता जपतात. तसेच उत्सवामध्ये विविध प्रकारचे नाविन्यपूर्ण उपक्रम देखील राबविले जातात. अशा पुणे शहरातील नवरात्र उत्सव मंडळांकरिता 'श्री महालक्ष्मी मंदिर सारसबाग-नवरात्रोत्सव स्पर्धा' यंदा प्रथमच आयोजित करण्यात आली आहे, अशी माहिती मंदिर ट्रस्टचे प्रमुख संस्थापक विश्वस्त राजकुमार अग्रवाल तसेच प्रमुख विश्वस्त अमिता अग्रवाल यांनी दिली.

स्पर्धेकरिता प्रवेश विनामूल्य असून पुणे शहर स्तरावरील नवरात्र उत्सव मंडळे



यामध्ये सहभागी होऊ शकतात. उत्सवकाळासह वर्षभरात मंडळातर्फे राबविण्यात येणाऱ्या धार्मिक, सांस्कृतिक आणि सामाजिक उपक्रमांचे परीक्षण केले जाणार आहे. याकरिता परीक्षण मंडळाची नियुक्ती करण्यात आली असून यामध्ये ट्रस्टचे विश्वस्त ॲड. प्रताप परदेशी यांसह ज्येष्ठ शिल्पकार विवेक खटावकर यांसह विविध क्षेत्रातील मान्यवरांचा सहभाग असणार आहे. स्पर्धेत प्रथम येणाऱ्या मंडळास रुपये २१ हजार आणि सन्मानचिन्ह, द्वितीय मंडळास रुपये १५ हजार आणि सन्मानचिन्ह तर तृतीय येणाऱ्या मंडळास रुपये ११ हजार आणि सन्मानचिन्ह प्रदान करण्यात येणार आहे. याशिवाय तीन उत्तेजनार्थ क्रमांक पटकाविणाऱ्या मंडळांना प्रत्येकी ५ हजार आणि सन्मानचिन्ह देण्यात येईल. अशी एकूण ७५ हजार रुपयांपेक्षा अधिक पारितोषिके देण्यात येणार आहेत. मंडळांनी स्पर्धेतील सहभागाकरिता ७७७००७६७६७ या क्रमांकावर संपर्क साधण्याचे आवाहन ट्रस्टतर्फे करण्यात आले आहे.

दुष्काळामुळे मराठवाड्यातून पुण्यात मोठे स्थलांतर होण्याची शक्यता

साखर कारखाने केवळ ६० दिवस सुरू राहिल्यास ऊसतोड कामगारांवर बेरोजगारीचे संकट : देविदास तुळजापूरकर

■ पुणे (दै. संध्या)



यंदा राज्यात भीषण दुष्काळी परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता असून, मराठवाड्यातील अनेक कुटुंबांना रोजगार आणि उदरनिर्वाहासाठी पुण्याकडे स्थलांतर करावे लागू शकते. साखर कारखाने यंदा केवळ ६० दिवस सुरू राहिल्यास ऊसतोड कामगारांना मिळणारे १८० दिवसांचे काम मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. त्यामुळे बेरोजगारी वाढण्याबरोबरच पुणे शहरातील पायाभूत सुविधांवरही मोठा ताण निर्माण होण्याची शक्यता आहे, असे मत ज्येष्ठ बँकिंग तज्ज्ञ देविदास तुळजापूरकर यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र गांधी स्मारक निधी आणि युवक क्रांती दल, महाराष्ट्र यांच्या वतीने गांधी भवन, कोथरूड येथे महात्मा गांधी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले आहे. त्याअंतर्गत 'फिल्म आणि चर्चा' या कार्यक्रमात बँकिंग क्षेत्रातील आर्थिक घडामोडींवर आधारित दिग्दर्शक व लेखक वरुण सुखराज यांच्या 'द ग्रेट इंडियन इल्युजन' या माहितीपटाचे सादरीकरण करण्यात आले. त्यानंतर झालेल्या चर्चेत तुळजापूरकर बोलत होते.

तुळजापूरकर म्हणाले, बँकिंग क्षेत्रावर देखरेख ठेवणाऱ्या रिझर्व्ह बँकेला पीएमसी बँकेतील घडामोडी वेळीच का समजल्या नाहीत, हा प्रश्न महत्त्वाचा आहे. देशाचे बँकिंग क्षेत्र सक्षम असल्याचे सांगितले जात असले तरी जागतिक आर्थिक संकटाची परिस्थिती पाहता त्याचे परिणाम भारताच्या उंबरठ्यावर येण्याची भीती आहे. त्यामुळे नागरिकांनी आर्थिक घडामोडी आणि बँकिंग व्यवस्थेची माहिती घेऊन आर्थिकदृष्ट्या साक्षर होणे आवश्यक आहे.

सरकारची रस्ते आणि रेल्वे यांसारखी पायाभूत सुविधा उभारण्याची जबाबदारी आहे. त्याचप्रमाणे सुरक्षित डिजिटल पायाभूत सुविधा नागरिकांना उपलब्ध करून देणेही आवश्यक आहे. मात्र, विविध शुल्कांच्या माध्यमातून त्याचा आर्थिक भार ग्राहकांवर पडत आहे. सार्वजनिक बँका तोट्यात गेल्यानंतर सरकारकडून त्यांना भांडवल दिले जाते; मात्र त्याचा अप्रत्यक्ष भार नागरिकांवरच पडतो. त्यामुळे जनकेंद्रित बँकिंग धोरणाची गरज आहे. सध्या बँकिंग धोरण कॉर्पोरेट केंद्रित असल्याची टीकाही त्यांनी केली. सोन्यातील गुंतवणूक ही अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने 'डेड इन्व्हेस्टमेंट' असल्याचे सांगत तुळजापूरकर म्हणाले, बँकांमधील ठेवी देशाच्या विकासासाठी अधिक महत्त्वाच्या ठरतात.

घटस्थापनेपूर्वी बांबूच्या परड्यांना मागणी

■ पुणे (दै. संध्या)

घटस्थापना अवघ्या चार दिवसांवर आल्याने येथे बांबूच्या परड्या बनविण्याचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. घटस्थापनेसाठी आवश्यक असलेल्या या परड्या पुण्याच्या शहरी भागात मोठ्या प्रमाणात वापरल्या जात असल्याने तयार झालेला माल मालवाहतूक वाहनांतून पुण्याकडे रवाना होत आहे. येथील बुरूड समाजातील कारागीर बांबूपासून विविध वस्तू तयार करून पूर्वापार सुरू असलेला पारंपरिक व्यवसाय जपत उदरनिर्वाह करतात. बुरूड समाजातील काही कारागीर कुटुंबासह परड्या बनविण्याच्या कामात गुंतले आहेत.

ओबीसींच्या विविध मागण्यांसाठी पुण्यात साखळी उपोषणाला सुरुवात

■ पुणे (दै. संध्या)

ओबीसी समाजाच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी पुण्यात जिल्हाधिकारी कार्यालयाजवळ साखळी उपोषणाला सुरुवात झाली. उपोषणात मंगेश ससाणे, मृणाल ढोले, सुनीता भगत, दिपक जगताप, शोभा शेवकरी, नितीन बोराटे, धनंजय झुरंगे, हनुमंत टिळेकर, सतिश गिरमे स्वप्नील वाघमारे यांसह सकल ओबीसी समाज, पुणे सहभागी झाले आहेत.

ओबीसी समाजाच्या प्रमुख मागण्यांमध्ये जातनिहाय जनगणना, बोगस कुणबी दाखल्यांवर कारवाई, ओबीसी विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती व वसतिगृह सुविधा, शिक्षण व रोजगारातील आरक्षणाचा अनुशेष भरून काढणे, स्वतंत्र व पुरेसा ओबीसी निधी, राजकीय आरक्षणा संदर्भातील प्रश्न तसेच मंडल आयोगाची पूर्ण अंमलबजावणी यांचा समावेश आहे वेळोवेळी प्रशासनाला व सरकारला सांगूनही दखल घेतली नाही, त्यामुळे ११ सप्टेंबरला धरणे आंदोलन करण्यात आले होते. पण प्रशासनाने दखल घेतली नाही. त्यामुळे आता साखळी उपोषण सुरु करण्यात आले.

या साखळी उपोषणाची सुरुवात रणरागिणी गौरीताई अक्षय पिंगळे, सुरेश सोपानराव कालेकर (शिंपी समाज) आणि बंडू उर्फ दीपक विठ्ठलराव कचरे यांच्या सहभागाने झाली. आंदोलनात विविध ओबीसी संघटना व कार्यकर्ते सहभागी झाल्या असून, शासनाने ओबीसी समाजाच्या मागण्यांची तातडीने दखल घेऊन सकारात्मक निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलकांनी केली आहे.



थोडक्यात पण महत्वाचे



बिलियन डेज च्या विशेष किमतींची घोषणा केली

नवी दिल्ली: दैनिक संध्या

एआय प्लस स्मार्टफोन ने आज फ्लिपकार्ट च्या बिग बिलियन डेज 2026 मध्ये नोव्हा आणि प्लस मालिकेसाठी सणासुदीच्या काळातील किमतींची घोषणा केली. ₹8,999* पासून सुरू होणारी हीमालिका स्वच्छ रचना, दीर्घकाळ टिकणारी बॅटरी आणि दैनंदिन वापरासाठी उत्कृष्ट कामगिरीप्रदान करते — भारतात निर्मित आणि नेक्स्टक्वांटम ओएस द्वारे संचालित.नोव्हा आणि प्लस हे लोक प्रत्यक्षात फोन कसा वापरतात, याचा विचार करून तयार करण्यात आले आहेत:दिवसभर चालणारी बॅटरी, स्पष्ट कॅमेरे, सुरळीत डिस्प्ले आणि सर्वांच्या आवाक्यात राहणाऱ्या किमती. प्लस 2 पासून नोव्हा २ अल्ट्रा पर्यंत, तसेच काही नवीन हवे असणाऱ्यांसाठी नोव्हाफ्लिप — प्रत्येक मॉडेल अद्ययावत होण्यासाठी एक सबळ कारण आहे, तडजोड नाही. नोव्हा आणि प्लस मालिका• प्लस २ — ₹8999 · 6000 एमएएच · 50एमपी एआय कॅमेरा• प्लस 2 एफई — ₹8,999* · मीडियाटेक जी81 · 50एमपी• नोव्हा 2 5जी — ₹11999 · 6000 एमएएच · 50मपी एआय · ड्युअल 5जी• नोव्हा2 निओ 5जी — ₹12999 · डायमेन्सिटी 6300 · सोनी आयएमएक्स 582• नोव्हा 2 पावर 5जी — ₹15,999* / ₹16,999* · 7000 एमएएच · डुअल-कलर डिज़ाइन • नोवा 2 प्रो 5जी - ₹16,999* / ₹17,999* · डाइमेंसिटी 7100• नोवा 2 अल्ट्रा 5जी — ₹18,999* · 1.5के एमोलेड · आईपी68 · डाइमेंसिटी 7400 • नोवाफ्लिप 5जी —₹49,999 · फोल्डेबल · डुअल एमोलेड · 50एमपी *बँकऑफरसह. ऑफर साठा संपेपर्यंत वैध आहेत. बिग बिलियन डेज 2026 दरम्यान Flipkart वर मर्यादितकालावधीसाठी उपलब्ध. एआय प्लस आणि नेक्स्टक्वांटम शिफ्ट टेक्नोलॉजीज विषयी- नेक्स्टक्वांटम शिफ्ट टेक्नोलॉजीज ही एक डीप-टेक भारतीय कंपनी असून ती डिजिटल-प्रथम जगासाठी सुरक्षितआणि सार्वभौम डिजिटल प्लॅटफॉर्म तयार करते.

सोनाली बेंद्रे यांनी केला 'सोहळा'चा ट्रेलर लॉन्च

मुंबई : दैनिक संध्या



सोनाली बेंद्रे यांनी 'सोहळा'चा ट्रेलर लॉन्च केला आहे. प्रस्तुतकर्ता म्हणून हा त्यांचा पहिलाच चित्रपट आहे. ट्रेलरमधून प्रेक्षकांना 13 वर्षीय पश्याच्या जगाची पहिली झलक पाहायला मिळते. आपल्या आयुष्यातील सर्वात खास दिवसांपैकी एका दिवसासाठी पश्या तयारी करत आहे. हा चित्रपट 16 ऑक्टोबर 2026 रोजी चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचे नाव महाराष्ट्रातील एका पारंपरिक वयात येण्याच्या विधीवरून घेण्यात आले आहे. या विधीच्या केंद्रस्थानी एक साधी पण भावनिक परंपरा आहे एक तरुण मुलगा पहिल्यांदाच आपल्या वडिलांच्या चपला घालतो. हा क्षण त्याच्या बालपणातून पुढे जात मोठं होण्याच्या दिशेने टाकलेल्या पहिल्या पावलाचे प्रतीक मानला जातो. 13 वर्षांचा पश्या बालपणीच्या स्वप्नांनी आणि उत्साहाने भरलेला आहे. त्याच्यासाठी 'सोहळा' हा तो खास दिवस आहे, ज्याची तो अनेक महिन्यांपासून आतुरतेने वाट पाहत आहे. नवे कपडे, मिठाई, कुटुंबीय, मित्र, उत्सव आणि पहिल्यांदाच वडिलांच्या चपला घालण्याचा आनंद त्याच्यासाठी हा दिवस एखाद्या स्वप्नापेक्षा कमी नाही. ट्रेलर पश्याच्या या उत्साही जगाशी आणि त्याच्या आसपासच्या माणसांशी प्रेक्षकांची ओळख करून देतो. त्याचबरोबर त्याच्या प्रवासाला आकार देणारी नाती, भावना आणि अनेक हळवे क्षणही यात पाहायला मिळतात.

आयसीआयसीआय लाइफ इन्शुरन्सने ब्रँडची नवीन ओळख सादर केली

मुंबई: दैनिक संध्या

'आयसीआयसीआय प्रुडेन्शियल लाइफ इन्शुरन्स कंपनी लिमिटेड' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या 'आयसीआयसीआय लाइफ इन्शुरन्स लिमिटेड'ने आज आपली नवीन ब्रँड ओळख आणि टॅगलाइन — 'हर कल आसान' जाहीर केली. या नवीन ब्रँड ओळख आणि टॅगलाइनबद्दल आयसीआयसीआय लाइफ इन्शुरन्स लिमिटेडचे मार्केटिंग, डिजिटल आणि बँकाशुरन्स विभागाचे प्रमुख श्री. श्रीनिवास बालसुब्रमण्यन म्हणाले, "लाखो भारतीयांच्या जीवनात विश्वासाचे, सामर्थ्याचे आणि आर्थिक सेवांच्या सुलभ उपलब्धतेचे प्रतीक म्हणून आयसीआयसीआय हे नाव एक अढळ स्थान राखून आहे. गेल्या 25 वर्षात, 20 कोटींहून अधिक भारतीयांची स्वप्ने आणि त्यांचे भविष्य सुरक्षित करण्यास मदत करण्याचा बहुमान आम्हाला मिळाला आहे. या प्रवासात आम्ही भारताची अभूतपूर्व प्रगती आणि त्याचबरोबर येथील लोकांच्या आकांक्षांमध्ये झालेला महत्त्वपूर्ण बदल अनुभवला आहे." आजच्या वेगवान युगात जग अधिकाधिक गुंतागुंतीचे आणि अनिश्चित बनले आहे. करिअरमधील बदल, बदलती कौटुंबिक रचना, वाढलेले आयुर्मान आणि आर्थिक प्राधान्यक्रमांमधील बदल यांमुळे दीर्घकालीन नियोजन करणे पूर्वीपेक्षा अधिक आव्हानात्मक झाले आहे. या अनिश्चिततेचा सामना करण्यात जीवन विम्याची भूमिका महत्त्वाची असली तरी आर्थिक भविष्य सुरक्षित करण्याची पारंपरिक प्रक्रिया अनेकदा गुंतागुंतीची वाटत आली आहे. भविष्याची तयारी करताना आयुष्यातील गुंतागुंत वाढण्याऐवजी त्यातून स्पष्टता, आत्मविश्वास आणि मनःशांती मिळायला हवी, असा आमचा ठाम विश्वास आहे. आमची नवीन ब्रँड ओळख ही केवळ नावापुरती मर्यादित नाही. आर्थिक भविष्य सुरक्षित करण्याचा अनुभव अधिक सोपा, पारदर्शक, लवचिक आणि सुलभ बनवण्याच्या आमच्या व्यापक कटिबद्धतेचे ती प्रतिबिंब आहे. 25 वर्षांच्या भक्कम पायावर आधारित, आम्ही ग्राहकांसाठी अधिक उपयुक्तता निर्माण करणे, उद्योगात उत्कृष्टतेचे नवीन निकष प्रस्थापित करणे आणि '2047 पर्यंत सर्वांसाठी विमा' या राष्ट्रीय उद्दिष्टामध्ये सक्रिय योगदान देणे सुरूच ठेवू." आपल्या नवीन ब्रँड वचनाद्वारे, कंपनीचे उद्दिष्ट जीवन विम्याबाबतच्या चर्चेला केवळ संभाव्य संकटांपासून संरक्षण मिळवण्यापुरते मर्यादित न ठेवता, त्यापलीकडे नेण्याचे आहे. भविष्य कसे असावे याबद्दल अधिक माहितीपूर्ण आणि आत्मविश्वासपूर्ण निर्णय सहज तसेच सोयीस्करपणे घेण्यास लोकांना सक्षम करणे, हा यामागचा उद्देश आहे; आणि अशा प्रकारे, आपल्या भागधारकांसाठी 'हर कल आसान' करणे हे कंपनीचे ध्येय आहे.



ज्ञान, संशोधन आणि सामाजिक बांधिलकीचा जागर

■ जुन्नर (दै. संध्या)

विद्यार्थ्यांच्या ज्ञानाला, संशोधनवृत्तीला, सर्जनशीलतेला आणि सामाजिक बांधिलकीला नवी दिशा देणारा फार्मसी सप्ताह जयहिंद कॉलेज ऑफ फार्मसी, वडगाव सहानी येथे विविध शैक्षणिक, सामाजिक व जनजागृतीपर उपक्रमांनी उत्साहात साजरा करण्यात आला. सप्ताहाच्या निमित्ताने विद्यार्थ्यांसाठी विविध नाविन्यपूर्ण उपक्रमांचे आयोजन करण्यात आले असून, विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवित आपल्या कौशल्यांचे प्रभावी प्रदर्शन केले.

फार्मसी सप्ताहाच्या अंतर्गत राज्यस्तरीय हर्बेरियम शिठ स्पर्धेचे आयोजन करण्यात आले. या स्पर्धेत राज्यभरातून २७० हून अधिक विद्यार्थ्यांनी विविध औषधी वनस्पतींची माहिती, त्यांचे शास्त्रीय महत्त्व तसेच औषधी उपयोग प्रभावीपणे सादर केले. विद्यार्थ्यांच्या वैज्ञानिक दृष्टिकोनाला आणि सर्जनशीलतेला चालना देणाऱ्या 'अविष्कार' या उपक्रमात संशोधन, नवकल्पना आणि वैज्ञानिक विचारांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले.

तसेच SIH (Smart India Hackathon) संदर्भातील उपक्रमातून विद्यार्थ्यांना समस्या सोडविणे, नवकल्पना आणि तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग याबाबत मार्गदर्शन मिळाले. पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यासाठी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. यावेळी संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डी. एस. गल्हे तसेच प्राचार्य विद्यार्थ्यांनी व महाविद्यालयीन कर्मचाऱ्यांनी वृक्षारोपण करून पर्यावरण संरक्षणाची शपथ घेतली.

विद्यार्थ्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी "फार्मसी नंतर सरकारी क्षेत्रातील करिअरच्या संधी" या विषयावर पुणे जिल्हा परिषद येथे कार्यरत असलेले औषध निर्माण अधिकारी श्री. विनायक गडगे यांचे व्याख्यान आयोजित करण्यात आले. या व्याख्यानातून औषधनिर्माण क्षेत्रातील सरकारी नोकरीच्या विविध संधी, स्पर्धा परीक्षा, आवश्यक पात्रता आणि करिअर नियोजनाबाबत विद्यार्थ्यांना मार्गदर्शन मिळाले.फार्मसी सप्ताहाची सांगता जुन्नर शहरातून फार्मासिस्ट रॅली आणि पथनाट्याच्या माध्यमातून करण्यात आली. रॅलीद्वारे औषधांचा योग्य वापर, फार्मासिस्टची भूमिका आणि आरोग्यविषयक जनजागृतीचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्यात आला. तसेच विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या पथनाट्याद्वारे आरोग्य, औषधोपचार आणि फार्मासिस्टच्या जबाबदाऱ्यांविषयी प्रभावी जनजागृती करण्यात आली. या संपूर्ण सप्ताहादरम्यान विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त सहभाग लाभला. विविध उपक्रमांमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञान, संशोधनवृत्ती, सर्जनशीलता, सामाजिक जाणीव आणि व्यावसायिक कौशल्यांना चालना मिळाली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेचे अध्यक्ष जितेंद्र गुंजाळ, संचालिका डॉ. शुभांगी गुंजाळ, मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. डी. एस. गल्हे आणि प्राचार्य डॉ. तेजस पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले.

बेरोजगारीला उत्तर देणारी संत कक्कय्या युवा परिवर्तन परिषद खोपोलीत उत्साहात

■ मुंबई : (दै. संध्या)



दत्ता खंदारे, खोपोली - आज पदवी घेऊनही नोकरीसाठी वन-वन भटकणाऱ्या व मानसिक त्रासाला सामोरे जाणाऱ्या कक्कय्या समाजातील युवकांसाठी खोपोलीतील परिषद आशेचा किरण ठरली. व्हिजन २०३० म्हणजे २०३० पर्यंत प्रत्येक युवक नोकरी व व्यवसायात स्थिर झाला पाहिजे हा संकल्प आहे. आजपर्यंत समाजातील युवकांसाठी अशा परिषदेचे आयोजन झाले नव्हते. या परिषदेत शिक्षण, नोकरी, व्यवसाय, शेतीपूरक उद्योग, बँकिंग, पोलीस व प्रशासकीय सेवेचे मार्गदर्शन एकाच व्यासपीठावर मिळाले. विलास शिंदे, सुधीर लाड, सौरभ व्हटकर, विनोद कावळे, लक्ष्मण सावळकर, सागर धडके, प्रसाद पोळ, प्रणव कळंबे यांनी मार्गदर्शन केले. यावेळी माजी आमदार सुभाष साबणे, रविंद्र शिंदे, रमेश कदम, संदीप कळंबे, परशुराम इंगळे, अशोक कटके, अशोक पाटकर, विकी व्हटकर, विनोद सोनवणे, गोविंद खरटमोल, माधुरी गायकवाड, गंगा जोगधनकर, प्रदीप शिंदे, रुपचंद नारायणकर, भावेश खंदारे, हरिश्चंद्र कोकणे, नरसिंग शेरखाने, डॉ. पी. पी. पोळ, सुनिल शेरखाने, राम म्हस्के, अशोक इंगळे, शकुंतला सोनवणे, संभाजी सोनवणे, कांता तपासे, भगवान गन्ने आदी उपस्थित होते.

आईच्या भरणी श्राद्धाला भांडी वाटपाला फाटा वृक्षदान

■ कोरेगावमुळ: (दै. संध्या)



पारंपरिक प्रथांना फाटा देत सामाजिक आणि पर्यावरणपूरक उपक्रमातून आईच्या स्मृती जपण्याचा आदर्श माहिती सेवा समिती महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष तथा वृक्षमित्र चंद्रकांत गोविंद वारघडे यांनी घालून दिला. त्यांच्या मातोश्री कै. श्रीमती कमल गोविंद वारघडे यांच्या भरणी श्राद्धानिमित्त बकोरी येथे पार पडलेल्या कार्यक्रमात भांडी वाटपाऐवजी तब्बल ५०० रुद्राक्ष रोपांचे वाटप करण्यात आले. कै. कमल गोविंद वारघडे यांना पर्यावरणाची विशेष आवड होती. त्यामुळे त्यांच्या स्मृती जपताना प्रत्येक कौटुंबिक कार्यक्रमाला सामाजिक व पर्यावरणपूरक स्वरूप देण्याचा संकल्प चंद्रकांत वारघडे यांनी कायम ठेवला आहे. आईचा वाढदिवस दरवर्षी वृक्षारोपण करून साजरा केला जात असे.

वारघडे यांच्या मुलीच्या विवाह सोहळ्यात मान्यवर, नातेवाईक व पाहुण्यांना तब्बल ३ हजार वृक्षांचे वाटप करण्यात आले होते. तसेच आईच्या दशक्रिया विधीच्या दिवशी १ हजार लक्ष्मी तरू या औषधी वनस्पतींचे वाटप करण्यात आले. त्यानंतर भरणी श्राद्धानिमित्त ५०० रुद्राक्ष रोपे वाटप करून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात आला. या उपक्रमासोबत दिवसभर अन्नदान व वृक्षदान करण्यात आले. रात्री बकोरी येथील संत तुकाराम महाराज भजनी मंडळाच्या वतीने भजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला. धार्मिक विधीबरोबरच सामाजिक, पर्यावरणपूरक आणि सांस्कृतिक उपक्रमांनी संपूर्ण कार्यक्रमाला वेगळे स्वरूप प्राप्त झाले. 'आईच्या स्मृती जपायच्या असतील तर समाजाच्या हिताचे काम करा.

सुरेश सरनोबत यांची भाजप मुंबई वरिष्ठ कार्यकर्ता आघाडीच्या संयोजकपदी नियुक्ती

■ मुंबई : (दै. संध्या)



भारतीय जनता पक्षाचे मुंबई अध्यक्ष अमित साटम यांनी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश सरनोबत यांची भाजपच्या मुंबई वरिष्ठ कार्यकर्ता आघाडीच्या संयोजकपदी नियुक्ती केली आहे. विविध सामाजिक, धार्मिक आणि सहकार क्षेत्रात गेल्या अनेक वर्षांपासून कार्यरत असलेल्या सरनोबत यांच्यावर आता मुंबईतील वरिष्ठ कार्यकर्ते आणि ज्येष्ठ नागरिकांशी संबंधित प्रश्न सोडविण्याची जबाबदारी सोपविण्यात आली आहे.

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे प्रथम वर्ष शिक्षित स्वयंसेवक असलेले सरनोबत हे मुंबई फेस्कॉम तसेच मुंबई ज्येष्ठ नागरिक संघाच्या कार्यकारिणीचे सदस्य आहेत. विक्रोळी येथील ज्येष्ठ नागरिक प्रभात मित्र मंडळाचे ते माजी अध्यक्ष असून, गेल्या २५ वर्षांपासून शुश्रूषा सिटीझन को-ऑप. हॉस्पिटलचे संचालक म्हणूनही ते कार्यरत आहेत.

मुंबईतील सार्वजनिक गणेशोत्सव मंडळांच्या समन्वय समितीत गेल्या ४० वर्षांपासून ते कार्यरत असून, अखिल सार्वजनिक गणेशोत्सव महासंघाचे प्रमुख कार्यवाह म्हणूनही त्यांनी जबाबदारी सांभाळली आहे. कन्नमवार नगर येथील ८० इमारतींच्या सार्वजनिक गणेशोत्सव समितीच्या माध्यमातून स्थापन करण्यात आलेल्या फिजिओथेरपी सेंटरचे ते संस्थापक आहेत. तसेच कन्नमवार नगर सहकारी गृहनिर्माण संस्थेचे अध्यक्ष आणि श्री सिद्धिविनायक को-ऑप. क्रेडिट सोसायटीचे संस्थापक म्हणूनही त्यांनी काम केले आहे.

नवीन जबाबदारीबाबत बोलताना सरनोबत यांनी सांगितले की, ज्येष्ठ नागरिकांना बीईएसटी, रेल्वे, पोलीस, बँका, रुग्णालये आदी ठिकाणी येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी तसेच आरोग्य सेवेशी संबंधित सरकारी योजनांचा लाभ ज्येष्ठ नागरिकांना मिळवून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील.

दरम्यान, अखिल सार्वजनिक गणेशोत्सव महासंघाचे अध्यक्ष जयेंद्र साळगावकर तसेच पदाधिकारी विकास माने, विवेक भाटकर, सुहास आडीवरेकर, रत्नाकर वज्राटकर, प्रविण आवारी, रविंद्र करमळकर आणि आनंद फणसेकर यांनी सरनोबत यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे अभिनंदन करून पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस कळविण्यात येते की, गाव मौजे बगाडवाडी , ता. जुन्नर, जि. पुणे येथील खालील परिशिष्टात वर्णन केलेल्या नवीन शर्तीच्या (इनाम वर्ग ६ ब) मिळकती या अनुक्रमे न. १. युवराज विनायक ढेंगळे, २. दत्तात्रय विनायक ढेंगळे,३. अनाबाई विनायक ढेंगळे (मयत) वारस - १. युवराज विनायक ढेंगळे, २. दत्तात्रय विनायक ढेंगळे सर्व रा. बगाडवाडी , ता. जुन्नर, जि. पुणे यांचे मालकीची असुन, सदर मिळकत ते श्री. गोविंद रामा भवारी रा. बगाडवाडी ता. जुन्नर जि.पुणे यांना रक्कम रुपये /- (मात्र) यांस विक्री करणार असुन, त्याबाबत त्यांची बोलणी चालू आहे. त्यांनी सदर मिळकत पुर्णपणे निर्वेध व निजोखमी असल्याचा भरोसा आमचे अशिलांना दिलेला आहे. तसेच सदर मिळकतीवर कोणाचेही बक्षिस, गहाण, दान, लिज, पोटगी, चोळी बांगडी, खरेदी, साठेखत करार मदार, कुळ वहिवाट, विसार पावती इतर कोणत्याही स्वरूपाचे हक्क हितसंबंध नसल्याचा त्यांनी आमचे अशिलांना भरोसा दिलेला आहे. सदर मिळकतीबाबत कुणाचीही कोणत्याही प्रकारची तक्रार किंवा हरकत असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन १५ दिवसांचे आत मा. जिल्हा अधिकारी कुळकायदा शाखा पुणे, तहसिलदार कार्यालय जुन्नर यांची मूळ कागदपत्रांनिशी खात्री पटवून दयावी. अन्यथा सदर मिळकतीत कोणाचेही हक्क, हितसंबंध नाहीत. व असल्यास त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिलेले आहेत. असे समजून आमचे अशील सदरचा व्यवहार पूर्ण करतील. व नंतर कुणाचीही तक्रार चालणार नाही. याची नोंद घेण्यात घ्यावी. शासन परिपत्रक नं. डब्ल्यूटीएन २०१९/ सीआर/२२९/ एल-४ दि. १० मार्च २००२ मधील मुंबई गावची कनिष्ट वतने नाहीशी करण्याबाबत अधिनियम १९५८ मधील दिलेल्या सुचनेनुसार गावच्या १५ कि.मी. परीसरातील इतर वतनदार प्रश्नाधिन जमीन उक्त नमुद किमतीत खरेदी करणेस इच्छुक असल्यास लेखी स्वरुपात १५ दिवसाचे आत तहसिलदार कार्यालय जुन्नर, मा. जिल्हा अधिकारी कुळ कायदा शाखा पुणे यांना कळवावे.

परिशिष्ट :-मिळकतीचे वर्णन - मौजे बगाडवाडी ता. जुन्नर, जि. पुणे येथील जमीन - खाते नं.१९० वरील जमीन ग.नं.२०/१ क्षेत्र ०० हे.१६.४० आर + पो.ख.०० हे.००.८० आर आकार ०० रु .२४ पैसे, येणेप्रमाणे वर्णनाची मिळकत

कळावे.

जुन्नर.

दिनांक : ०१/१०/२०२६

सही/-
श्री. गोविंद रामा भवारी
रा. बगाडवाडी ता. जुन्नर जि.पुणे

"हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' लवकरच

■ मुंबई (दै. संध्या)

कन्नमवार नगरातील क्रांतीवीर महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाच्या पुनर्बांधणीचे काम सुरू असून, रुग्णालयाची नवीन इमारत २०२८ मध्ये सेवेत येण्याची अपेक्षा आहे. दरम्यान, रुग्णालयाचे बांधकाम सुरू असल्याने परिसरातील नागरिकांना प्राथमिक आरोग्य सुविधा उपलब्ध व्हाव्यात, यासाठी कन्नमवार नगरात 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना' सुरू करण्यात येणार आहे.

महात्मा ज्योतिबा फुले रुग्णालयाची जुनी इमारत जीर्ण आणि धोकादायक झाल्याने २०१८ मध्ये ती पूर्णपणे बंद करण्यात आली होती. आता मुंबई महानगरपालिकेकडून सुमारे ५९३ कोटी रुपये खर्च करून या ठिकाणी ५५० खाटांचे १३ मजली सुपर स्पेशालिटी रुग्णालय उभारण्यात येत आहे. रुग्णालयात कार्डिओलॉजी, गॅस्ट्रोएन्टेरोलॉजीसह अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. यासोबतच २३ मजली नर्सेस क्वार्टर्सचीही उभारणी करण्यात येणार आहे. विक्रोळी, कांजूरमार्ग, पवई आणि भांडुप परिसरातील नागरिकांसाठी हे रुग्णालय महत्त्वाचे आरोग्य केंद्र मानले जाते. पुनर्बांधणीचे काम पूर्ण होईपर्यंत परिसरातील नागरिकांना प्राथमिक उपचारांसाठी जवळची सुविधा मिळावी, यासाठी कन्नमवार नगरात हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. या दवाखान्यात बाह्यरुग्ण विभागाची सेवा, प्राथमिक तपासणी, आवश्यक औषधे तसेच काही रक्त तपासण्या मोफत किंवा सवलतीच्या दरात उपलब्ध करून देण्यात येणार आहेत.मुंबई मनपा महिला व बालकल्याण समितीच्या सदस्या तथा नगरसेविका सुनीता चंद्रशेखर जाधव आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उपविभाग प्रमुख चंद्रशेखर जाधव यांनी फुले रुग्णालयाच्या पुनर्बांधणीच्या कामाची तसेच कन्नमवार नगरात हिंदूहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना सुरू करण्यासाठी निश्चित केलेल्या जागेची पाहणी केली. यावेळी महिला उपविभाग संघटिका वंदना बेंद्रे, विक्रोळी विधानसभा संघटिका लिना सूर्यवंशी, शाखाप्रमुख प्रकाश पुजारे, उपशाखाप्रमुख अमित कांबळे, उपशाखा संघटिका उर्मिला पाटील, प्रभाग ११८च्या निरीक्षक सुशीला रायकर, उपशाखाप्रमुख शरद दोडके, मंगेश बनसोडे आदी उपस्थित होते. कन्नमवार नगरातील झोपडपट्टीधारक, अल्प उत्पन्न गटातील नागरिक आणि परिसरातील सामान्य नागरिकांना घराजवळ प्राथमिक आरोग्य सुविधा मिळण्याच्या दृष्टीने 'आपला दवाखाना' महत्त्वाचा ठरणार असून, हा दवाखाना लवकरच सुरू करण्यात येणार असल्याची माहिती देण्यात आली.



थोडक्यात पण महत्वाचे



लोकशाहीच्या रक्षणासाठी ८ ऑक्टोबरला 'लोकशाही बचाव मार्च'चे आयोजन

पिंपरी : दैनिक संध्या

लोकशाही आणि संविधानाच्या सुरक्षेसह निवडणूक प्रक्रियेतील पारदर्शकतेच्या प्रश्नांकडे लक्ष वेधण्यासाठी पिंपरी-चिंचवड इंडिया आघाडी, सिव्हिल सोसायटी, पुरोगामी व विविध सामाजिक संघटनांच्या वतीने 'लोकशाही बचाव मार्च' काढण्यात येणार आहे. गुरुवारी (दि. ८) सकाळी ११ वाजता आकुर्डी गावातील विठ्ठल मंदिर येथून या मार्चला सुरुवात होऊन तो तहसीलदार कार्यालय, निगडी येथे समाप्त होणार आहे. मतदार याद्यांमधील बदल, पात्र मतदारांच्या नावांबाबत निर्माण होणारे प्रश्न तसेच विशेष पुनर्परीक्षण अभियान (SIR) यामुळे नागरिकांमध्ये संभ्रम व चिंता निर्माण झाल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. निवडणूक प्रक्रिया स्वतंत्र, निष्पक्ष आणि पारदर्शक असावी, अशी भूमिका घेत निवडणूक आयोगाच्या कारभाराबाबत उपस्थित झालेल्या प्रश्नांची स्वतंत्र व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी या मार्चद्वारे करण्यात येणार आहे. आयोजकांच्या माहितीनुसार, पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शहा आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांनी नैतिक जबाबदारी स्वीकारून राजीनामा द्यावा, तसेच मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांना पदावरून दूर करून कायद्यानुसार कारवाई करावी, अशी मागणी करण्यात येणार आहे. तसेच मतदार यादी विशेष पुनर्परीक्षण अभियान (SIR) रद्द करावे, निवडणूक आयोगाचे कामकाज पारदर्शक, निष्पक्ष व स्वतंत्र पद्धतीने पूर्ववत करावे आणि मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या कार्यकाळातील महत्त्वाच्या निर्णयांचे स्वतंत्र पुनर्परीक्षण करावे, या मागण्याही करण्यात येणार आहेत. या मार्चमध्ये इंडिया आघाडीतील घटक पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्ते, सामाजिक कार्यकर्ते, सिव्हिल सोसायटीचे प्रतिनिधी, पुरोगामी संघटनांचे पदाधिकारी तसेच लोकशाहीप्रेमी नागरिकांनी सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे.

एसबीपीसीओएडी महाविद्यालयात पदवीप्रदान सोहळा संपन्न

पिंपरी : दैनिक संध्या

वास्तुशास्त्र म्हणजे संवेदनशीलता, सर्जनशीलता आणि भावना यांचे एकत्रीकरण करून उभारलेल्या इमारतीचे प्रतीक असते. विद्यार्थ्यांनी अपयशाला न घाबरता सामोरे जावे. आपल्या कामाप्रती श्रद्धा, सबुरी आणि साधना या मूल्यांचा जीवनात उपयोग केल्यास यश आणि आनंद अनुभवता येईल असे मार्गदर्शन ज्येष्ठ वास्तुविशारद गिरीश दोशी यांनी केले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या आकुर्डी येथील एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईन येथे वास्तूविशारद पदवी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा पदवी प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आर्किटेक्ट गौरव भांगरे, एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईन च्या प्राचार्या डॉ. स्मिता सूर्यवंशी, परीक्षा अधिकारी अजय हराळे, इंटरनल सीनियर सुपरवायझर रुजूता पाठक, यशस्वी विद्यार्थी, पालक प्रतिनिधी, प्राध्यापक आदी उपस्थित होते. गिरीश दोशी यांनी मागील चार दशकांतील त्यांचा वास्तुशास्त्रीय जीवन प्रवास आणि वेगवेगळ्या ठिकाणी केलेले व्यावसायिक कार्य याचे दुर्मिळ छायाचित्रे दाखवून मार्गदर्शन केले. तसेच एखादी कलाकृती इमारत उभारताना अवकाश, सूर्यप्रकाश, उद्यान आणि डिझाईन यांचा विचार केला पाहिजे. आता आलेल्या नवीन फेरो सिमेंट या प्रकारामुळे वास्तुविशारद क्षेत्राला विविधता प्राप्त झाली आहे असेही सांगितले. आर्किटेक्ट गौरव भांगरे यांनी सांगितले की, उत्तम वास्तुविशारद होण्यासाठी साधना, संयम आणि सातत्य या मूल्यांचा अंगीकार केला पाहिजे. आता पदवी प्राप्त झाल्यानंतर किमान तीन वर्ष तरी एखाद्या वास्तूविशारद यांच्या अधिपत्याखाली काम करावे. त्यांच्या अनुभवातून खूप काही शिकायला मिळेल. गुरु सोबत असेल तर शिक्षण संपल्यावर सुद्धा शिकता येते. काम करताना क्लायंट, गवंडी सर्वांची मानसिकता जाणून घेणे गरजेचे आहे. लक्ष्मण तोरगळे, किसन काळे, इतर प्राध्यापक आणि स्वयंसेवक यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात सहभाग घेतला. स्वागत प्राचार्या डॉ. स्मिता सूर्यवंशी, सूत्रसंचालन प्रा. शिवा शिशोविया व आभार प्रा. दक्षा देशमुख यांनी मानले. पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांनी यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

इंदिरा एकादशीनिमित्त आळंदीत माउलींच्या समाधी मंदिराची आकर्षक पुष्पसजावट

आळंदी : दैनिक संध्या

इंदिरा एकादशीच्या पावन पर्वानिमित्त आळंदी येथील श्री संत ज्ञानेश्वर महाराज संजीवन समाधी मंदिरात आकर्षक आणि नयनरम्य पुष्पसजावट करण्यात आली आहे. विविधरंगी सुवासिक फुले, शोभिवंत फुलांच्या माळा आणि कलात्मक रचनांनी संपूर्ण मंदिर परिसर सजविण्यात आला असून, या देखण्या सजावटीमुळे मंदिराच्या वैभवात अधिकच भर पडली आहे. एकादशीनिमित्त राज्याच्या विविध भागांतून भाविक मोठ्या संख्येने माउलींच्या दर्शनासाठी आळंदीत दाखल झाले आहेत. मंदिरातील मनोहारी पुष्पसजावट आणि भक्तिमय वातावरणामुळे भाविकांमध्ये विशेष उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे. मंदिर परिसरात माउली-ज्ञानोबांच्या जयघोषाने आणि हरिनामाच्या गजराने संपूर्ण आळंदी नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली आहे. समाधी मंदिरातील आकर्षक पुष्पसजावट भाविकांचे विशेष लक्ष वेधून घेत असून, दर्शनासाठी आलेल्या भाविकांकडून तिचे कौतुक केले जात आहे.



पीबीएसच्या विद्यार्थ्यांनी देशाच्या विकासात महत्वपूर्ण योगदान द्यावे

डॉ. गणेश राव : पुणे बिझनेस स्कूलमध्ये प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ संपन्न

■ पिंपरी (दै. संध्या)

कॉर्पोरेट क्षेत्रात सक्षम नेतृत्व घडविण्यासाठी पुणे बिझनेस स्कूलचा दोन वर्षाचा व्यवस्थापन अभ्यासक्रम मार्गदर्शक आहे. याठिकाणी उच्च शिक्षणाबरोबरच नेतृत्व आणि व्यावसायिक सक्षमता, नाविन्य, बदलत्या व्यावसायिक वातावरणाकडे पाहण्याचा दृष्टिकोन विकसित होईल, त्याचा पीबीएस च्या विद्यार्थ्यांनी लाभ घेऊन आपले करिअर घडवावे आणि देशाच्या विकासात महत्वपूर्ण योगदान द्यावे असे मार्गदर्शन पीबीएसचे संचालक व प्राचार्य डॉ. गणेश राव यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टच्या आकुर्डी येथील पुणे बिझनेस स्कूल मध्ये प्रथम वर्ष विद्यार्थ्यांचा स्वागत समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी पीबीएसच्या डीन डॉ. मीनाक्षी त्यागी, मास्टर कार्डचे मध्यपूर्व आफ्रिका आणि युरोप संचालक हेमंत शर्मा, इंडिया डिजिटल ॲंग्रीकल्चर कौन्सिलचे अध्यक्ष दुष्यंत त्यागी, संचेती हेल्थकेअर ॲकॅडमीचे मानव संसाधन प्रमुख अजंता डे, बायर ग्लोबल प्रोक्युरमेंट व्यवस्थापक सीमा मोहंती, केपीआयटी संचालक मृणाल मजुमदार, नाऊ यू सीड इंडिया प्रा. लि. विपणन उपाध्यक्ष संदीप कुलकर्णी, व्हर्लपूल इंडिया उपव्यवस्थापक दिनेश शिंदे, टाटा मोटर्स डीजीएम प्रमुख अर्चना सराफ, झायडस बायोलॉजिक्स शिक्षण आणि विकास प्रमुख विवेक शर्मा, फर्टिओनिक्स सोल्युशन्स एलएलपी संचालक जितेंद्र कोळपे आदी उपस्थित होते.

यावेळी डॉ. मीनाक्षी त्यागी यांनी सांगितले की, पीबीएस मधील प्रवेश म्हणजे उद्योगांसाठी व्यवस्थापकीय क्षमता, नैतिक मूल्ये आणि समाजावर सकारात्मक प्रभाव पाडण्याची वचनबद्धता आणि आत्मविश्वास असणारे सक्षम नेतृत्व घडवणे होय. येथे विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय चर्चासत्र, मार्गदर्शन, औद्योगिक भेटी यांच्या माध्यमातून नावीन्य आणि व्यावसायिक उत्कृष्टतेवर भर असलेल्या एका नवीन शैक्षणिक मार्गाची विद्यार्थ्यांना ओळख करून देण्यात येते.

तसेच विद्यार्थ्यांना कॉर्पोरेट जगताच्या अपेक्षा समजून घेण्याची आणि नेतृत्व, करिअर विकास व बदलत्या व्यावसायिक वातावरणाबद्दल अधिक माहिती दिली जाते असे डॉ. त्यागी यांनी सांगितले.

यावेळी कॉर्पोरेट प्रतिनिधींनी नेतृत्वाची जबाबदारी आणि विविध क्षेत्रांतील उदयोन्मुख संधी या विषयावर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्टचे अध्यक्ष ज्ञानेश्वर लांडगे, उपाध्यक्ष पद्माताई भोसले, सचिव विठ्ठल काळभोर, खजिनदार शांताराम गराडे, विश्वस्त हर्षवर्धन पाटील, उद्योजक नरेंद्र लांडगे, अजिंक्य काळभोर, कार्यकारी संचालक डॉ. गिरीश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली या स्वागत समारंभ चे आयोजन करण्यात आले होते.

७ ऑक्टोबरपासून भव्य राष्ट्रीय पुस्तक मेळा

■ निगडी(दै. संध्या)

वाचन संस्कृतीला चालना देण्यासाठी भारतीय विचार साधना फाऊंडेशन आणि स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने पिंपरी-चिंचवडमध्ये प्रथमच भव्य राष्ट्रीय पुस्तक मेळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. बुधवार (७ ऑक्टोबर) ते शनिवार (१० ऑक्टोबर) या कालावधीत निगडी प्राधिकरणातील सेक्टर २५ येथील स्वातंत्र्यवीर सावरकर मंडळाच्या परिसरात हा मेळा भरणार आहे. या मेळ्यात ५० हून अधिक प्रकाशकांची हजारो पुस्तके उपलब्ध होणार आहेत. इतिहास, संस्कृती, सामाजिक व राष्ट्रीय विषय, विज्ञान, शेती, पर्यावरण, योग, आरोग्य, संतसाहित्य, अर्थकारण, समरसता, थोर व्यक्तींची चरित्रे, कुटुंब प्रबोधन तसेच बालसाहित्य अशा विविध विषयांवरील पुस्तकांचा समावेश आहे. विद्यार्थ्यांसह सर्व वयोगटांतील वाचकांना समृद्ध साहित्याची पर्वणी मिळणार आहे. मेळ्याचे उद्घाटन बुधवारी (७ ऑक्टोबर) सायंकाळी ६.३० वाजता महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते होणार आहे. महाराष्ट्र साहित्य परिषदेचे अध्यक्ष योगेश सोमण प्रमुख उपस्थित राहणार आहेत. यावेळी उपमहापौर, स्थानिक लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित राहतील. मेळ्यादरम्यान गुरुवारी (८ ऑक्टोबर) सायंकाळी ६.३० वाजता 'नाटकवाला' पुस्तकाचे अभिवाचन होणार आहे. शुक्रवारी (९ ऑक्टोबर) सायंकाळी ६.३० वाजता पुस्तक प्रकाशन सोहळा, तर ७ वाजता साहित्यिक संवाद आयोजित केला आहे.

वास्तुशास्त्र म्हणजे सर्जनशीलता आणि भावना यांचे प्रतीक : ज्येष्ठ वास्तुविशारद गिरीश दोशी

■ पिंपरी (दै. संध्या)



वास्तुशास्त्र म्हणजे संवेदनशीलता, सर्जनशीलता आणि भावना यांचे एकत्रीकरण करून उभारलेल्या इमारतीचे प्रतीक असते. विद्यार्थ्यांनी अपयशाला न घाबरता सामोरे जावे. आपल्या कामाप्रती श्रद्धा, सबुरी आणि साधना या मूल्यांचा जीवनात उपयोग केल्यास यश आणि आनंद अनुभवता येईल असे मार्गदर्शन ज्येष्ठ वास्तुविशारद गिरीश दोशी यांनी केले.

पिंपरी चिंचवड एज्युकेशन ट्रस्ट च्या आकुर्डी येथील एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईन येथे वास्तूविशारद पदवी पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांचा पदवी प्रदान सोहळा आयोजित करण्यात आला होता. यावेळी आर्किटेक्ट गौरव भांगरे, एस. बी. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चर अँड डिझाईन च्या प्राचार्या डॉ. स्मिता सूर्यवंशी, परीक्षा अधिकारी अजय हराळे, इंटरनल सीनियर सुपरवायझर रुजूता पाठक, यशस्वी विद्यार्थी, पालक प्रतिनिधी, प्राध्यापक आदी उपस्थित होते. गिरीश दोशी यांनी मागील चार दशकांतील त्यांचा वास्तुशास्त्रीय जीवन प्रवास आणि वेगवेगळ्या ठिकाणी केलेले व्यावसायिक कार्य याचे दुर्मिळ छायाचित्रे दाखवून मार्गदर्शन केले. तसेच एखादी कलाकृती इमारत उभारताना अवकाश, सूर्यप्रकाश, उद्यान आणि डिझाईन यांचा विचार केला पाहिजे.

डॉ तेलंग हॉटेल मॅनेजमेंट कॉलेजमध्ये पर्यटन दिन साजरा

■ पिंपरी (दै. संध्या)



कॅम्प एज्युकेशन सोसायटीच्या डॉ. अरविंद ब. तेलंग इन्स्टिट्यूट ऑफ हॉटेल मॅनेजमेंटमध्ये 'जागतिक पर्यटन दिन' साजरा करण्यात आला. यंदाच्या कार्यक्रमाची संकल्पना "पर्यटनाची पुनर्रचना करण्यासाठी डिजिटल अजेंडा आणि कृत्रिम बुद्धिमत्ता" या विषयावर आधारित होती. कार्यक्रमास अन्विशा हॉलिडेज संचालक विशाल येवले, कॉलेजचे प्राचार्य डॉ. अजयकुमार एम. राय आदी उपस्थित होते. यावेळी प्राचार्य डॉ. राय म्हणाले कि, यावर्षी डिजिटल तंत्रज्ञान आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या माध्यमातून पर्यटन क्षेत्रात होत असलेल्या बदलांचे महत्त्व अधोरेखित करण्यात आले. पर्यटन क्षेत्र अधिक आधुनिक, नाविन्यपूर्ण आणि तंत्रज्ञानाभिमुख करण्यामध्ये डिजिटल तंत्रज्ञान व AI ची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. पर्यटनस्थळांवर आधारित प्रश्नमंजुषा स्पर्धा, सर्वोत्तम पारंपरिक पोशाख स्पर्धा आणि सर्वोत्तम पर्यटन रील निर्मिती स्पर्धेचा समावेश होता. या स्पर्धांना विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी विशाल येवले यांनी विद्यार्थ्यांना व्यक्तिमत्त्व विकास, कौशल्यविकास आणि करिअरच्या विविध संधींबाबत मार्गदर्शन केले. "सतत काहीतरी नवीन शिकत राहा, वाचनाची सवय जोपासा आणि मिळवलेले ज्ञान प्रत्यक्ष कृतीत आणा," असा संदेश त्यांनी विद्यार्थ्यांना दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. वैष्णवी हार्डे यांनी केले. यावेळी प्राचार्य डॉ. अजयकुमार एम. राय यांनी संस्थेचे कार्याध्यक्ष वालचंद संचेती आणि मानद सचिव बी. व्ही. जावळेकर यांचे संस्थेच्या उपक्रमांना वेळोवेळी मिळणारे सहकार्य व बहुमोल मार्गदर्शन याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी संस्थेतील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी विशेष परिश्रम घेतले. शेवटी प्रा. शेखर खैरनार यांनी उपस्थितांचे आभार मानले.

पिंपरीत 'सेवा के रंग, राष्ट्र के संग' उपक्रम उत्साहात

आमदार गोरखे यांच्या मार्गदर्शनाखाली रंगला कलात्मक आणि राष्ट्रभक्तीपर सोहळा

■ पिंपरी (दै. संध्या)



पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून 'विकसित भारत' हा दूरदर्शी विचार देशात साकारत आहे. या विचाराला आणि देशातील लोककल्याणकारी विकासकामांना कलात्मक जोड देण्यात आली. यादरम्यान, पिंपरी विधानसभा मतदारसंघातील साई गार्डन, संभाजीनगर येथे 'सेवा के रंग, राष्ट्र के संग' हा विशेष उपक्रम 03 ऑक्टोबर 2026 रोजी अत्यंत उत्साहात पार पडला. आमदार श्री. अमित गोरखे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या कार्यक्रमात महिला कार्यकर्त्या आणि नागरिकांनी प्रचंड उत्साह दाखवला. या कार्यक्रमात पंतप्रधान श्री. नरेंद्र मोदी यांच्या संकल्पनेतून साकारत असलेल्या "विकसित भारत" या संकल्पनेचा आणि या अंतर्गत झालेल्या विकासकामांचा आढावा रांगोळीच्या माध्यमातून मांडण्यात आला.

रंगीबेरंगी आणि आकर्षक रांगोळीच्या माध्यमातून देशाच्या प्रगतीचे, विकासाचे आणि जनकल्याणकारी योजनांचे चित्र यावेळी साकारण्यात आले. या उपक्रमातून सेवा, समर्पण आणि राष्ट्रभक्तीचा संदेश जनमानसात पोहोचवण्यात आला. याप्रसंगी पिंपरी विधानसभेचे लोकप्रिय आमदार श्री. अमित गोरखे यांच्या प्रमुख उपस्थितीसह प्रभागातील ज्येष्ठ नगरसेविका श्रीमती अनुराधाताई गोरखे, सौ. सुप्रियाताई चांदगुडे, नगरसेवक श्री. मंदार देशपांडे, माजी नगरसेविका सौ. वैशालीताई गोगावले-खाडिया, यांच्यासह अनेक मान्यवर पदाधिकारी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

विश्वविक्रमी सोहळ्यात भाजपच्या सेवाकार्याचा जागर; पक्ष संघटनेच्या पुढाकारातून सामाजिक उपक्रम!

आमदार श्री. अमित गोरखे यांच्या मार्गदर्शनाखाली रंगला कलात्मक आणि राष्ट्रभक्तीपर सोहळा

■ पिंपरी (दै. संध्या)

धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या 'स्टॅच्यू ऑफ हिंदुभूषण'ला विश्वविक्रमी ढोल-ताशा मानवंदना देण्यासाठी आयोजित सोहळ्यात आमदार महेश लांडगे यांच्या पुढाकारातून सामाजिक बांधिलकी जपणारे विविध उपक्रम राबविण्यात आले. भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून नशामुक्त भारताची सामूहिक प्रतिज्ञा, रक्तदान शिबिर, आरोग्य शिबिर, गोसेवा अभियानाची जनजागृती आणि भारतमातेचे रांगोळी रेखाटन करण्यात आले. या उपक्रमांना नागरिक आणि शिव-शंभूप्रेमींचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

हिंदुभूषण स्मारक ट्रस्टचे अध्यक्ष तथा आमदार महेश लांडगे यांच्या संकल्पनेतून रविवारी, दि. ४ ऑक्टोबर रोजी आयोजित सोहळ्यात हजारो वादक आणि नागरिक सहभागी झाले. शिव-शंभूंच्या शौर्याला मानवंदना देतानाच त्यांच्या विचारांची प्रेरणा समाजहिताच्या कृतीतून पुढे नेण्यावर भर देण्यात आला. सांस्कृतिक परंपरा जपण्यासोबत नागरिकांचे आरोग्य, युवा पिढीची व्यसनमुक्ती आणि सेवाभावाची जागृती यांना या उपक्रमांतून प्राधान्य देण्यात आले, अशी माहिती सरचिटणीस विकास डोळस आणि संजय पटनी यांनी दिली.

भाजपाच्या सेवा संकल्प अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या सेवाभावाच्या प्रेरणेतून, महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या नेतृत्वाखाली आणि भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांच्या संघटनात्मक मार्गदर्शनाच्या भावनेतून समाजसेवेचे उपक्रम पुढे नेण्याचा संदेश या सोहळ्यात देण्यात आला.

'नशामुक्त भारत'च्या सामूहिक प्रतिज्ञेत उपस्थितांनी सहभाग घेतला. स्वतः व्यसनांपासून दूर राहण्यासोबत कुटुंब, मित्रपरिवार आणि समाजात नशामुक्तीविषयी जागृती करण्याचा संकल्प करण्यात आला. युवा पिढीचे निरोगी भविष्य घडविण्यासाठी समाजातील प्रत्येक घटकाने योगदान देण्याचे आवाहन यावेळी करण्यात आले.

रक्तदान शिबिराला प्रतिसाद देत रक्तदात्यांनी गरजू रुग्णांसाठी मदतीचा हात पुढे केला. आरोग्य शिबिराच्या माध्यमातून नागरिकांमध्ये आरोग्यविषयक जागृती करण्यात आली. या उपक्रमांसाठी डॉक्टर, आरोग्य कर्मचारी आणि स्वयंसेवकांनी योगदान दिले. आमदार लांडगे यांच्या पुढाकारातून सांस्कृतिक सोहळ्यासोबत लोकसेवेचे उपक्रम राबविल्यामुळे नागरिकांना सहभागी होण्याची संधी मिळाली, असे सरचिटणीस पटनी यांनी नमूद केले.

गोसेवा आणि गोमाता सन्मान अभियानाचा संदेश उपस्थितांपर्यंत पोहोचविण्यात आला. सेवा आणि संवेदनशीलतेच्या भावनेतून अभियानात सहभागी होण्याचे आवाहन करण्यात आले. कलाकारांनी रेखाटलेली भारतमातेची मनमोहक रांगोळी विशेष आकर्षण ठरली. संपूर्ण 'वंदे मातरम्'च्या सामूहिक गायनातून मातृभूमीला स्वरांची मानवंदना अर्पण करण्यात आली. ढोल-ताशांचा एकसंध ठेका, १११ शंखांचा सामूहिक शंखनाद आणि शिव-शंभूंच्या जयघोषासोबत समाजसेवेचा संदेशही नागरिकांपर्यंत पोहोचला. या उपक्रमांच्या यशस्वितेसाठी भाजप पदाधिकारी, कार्यकर्ते, स्वयंसेवक, वादक, पथकप्रमुख आणि नागरिकांनी सहकार्य केल्याचे पटनी यांनी सांगितले.



थोडक्यात पण महत्वाचे



बांधकाम मजुरांच्या यादीत सावळा गोंधळ? खऱ्या कामगारांवर अन्यायाची कुऱ्हाड

दौंड : दैनिक संध्या

दौंड तालुक्यातील बांधकाम मजूर कामगारांच्या नोंदणी व लाभाच्या प्रक्रियेवरून सध्या प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. खऱ्या अर्थाने बांधकाम क्षेत्रात काम करणारे मजूर डावलले जात असून, राजकीय नेत्यांच्या कार्यकर्त्यांना व मोठ्या बागायतदार यांना बांधकाम मजूर म्हणून प्रवेश दिला जात असल्याचा आरोप सर्वसामान्य नागरिकांतून केला जात आहे. बांधकाम मजुरांसाठी शासनाच्या विविध योजनांचा लाभ मिळावा, यासाठी पात्र कामगारांची नोंदणी केली जाते. मात्र, या प्रक्रियेत पात्रतेची योग्य पडताळणी न होता राजकीय हस्तक्षेपातून काही व्यक्तींना प्राधान्य दिले जात असल्याची चर्चा दौड तालुक्यात सुरू आहे. विशेष म्हणजे, प्रत्यक्ष बांधकामाच्या ठिकाणी रोजंदारीवर काम करणारे मजूर, गवंडी, सेंट्रिंग कामगार, बिगारी व इतर कामगार लाभापासून वंचित राहत असताना राजकीय कार्यकर्त्यांचा श्रीमंत घरातील बांधकाम मजूर म्हणून समावेश कसा झाला? असा सवाल उपस्थित केला जात आहे. वर्षानुवर्षे बांधकाम क्षेत्रात कष्ट करणाऱ्या कामगारांना शासनाच्या योजनांचा लाभ मिळणे अपेक्षित असताना, त्यांच्या जागी राजकीय जवळीक असलेल्या व्यक्तींना संधी मिळत असल्यास ही बाब गंभीर आहे. त्यामुळे संबंधित नोंदणीची निष्पक्ष चौकशी करून प्रत्यक्ष कामगारांची पडताळणी करावी, अशी मागणी होत आहे. बांधकाम मजूर नोंदणी प्रक्रियेत कोणत्याही प्रकारचा राजकीय दबाव किंवा हस्तक्षेप नसावा. पात्रता असलेल्या प्रत्येक कामगाराला समान संधी मिळावी आणि अपात्र व्यक्तींची नोंदणी झाल्यास ती रद्द करण्यात यावी, अशी मागणी आता जोर धरू लागली आहे. दौंड तालुक्यातील बांधकाम मजुरांच्या नोंदणीची सखोल चौकशी करून खऱ्या लाभार्थ्यांना न्याय मिळणार का? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

चाकण येथे गुरुवारी शंभरावे मराठी साहित्य संमेलन

चाकण : दैनिक संध्या

महाराष्ट्र साहित्य परिषद, शाखा चाकण यांच्या वतीने अखिल भारतीय शंभराव्या मराठी साहित्य संमेलनाच्या निमित्ताने चाकण येथे भव्य साहित्य, संगीत, कला व अभिनय संमेलन आयोजित करण्यात आले आहे. या कार्यक्रमातच राधिका राजकुमार कुलकर्णी लिखित गोड गोजिरी बालगीते या बालकाव्य संग्रहाचे प्रकाशन करण्यात येणार आहे. चाकण येथील गुडलकच्या भव्य सभागृहात हा साहित्यिक आणि सांस्कृतिक सोहळा गुरुवारी (दि.८) सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळात आयोजित करण्यात आला आहे. साहित्य, काव्य, संगीत, गायन, वादन, अभिनय आणि प्रबोधनात्मक कला यांचा सुरेख संगम या संमेलनातून रसिकांना अनुभवता येणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुख डॉ. संदीप सांगळे हे या संमेलनाचे अध्यक्षस्थान भूषविणार आहेत. स्वागताध्यक्ष म्हणून संदेश काळे यांची उपस्थिती लाभणार असून, उदघाटन उद्योजक रविशेठ धाडगे व भरत बिरदवडे यांच्या हस्ते आणि महाराष्ट्र साहित्य परिषदेचे जिल्हाप्रमुख राजन लाखे यांच्या उपस्थितीत होणार आहे, अशी माहिती महाराष्ट्र साहित्य परिषदेचे चाकण शाखाध्यक्ष ज्ञानेश्वर शिळवणे व उपाध्यक्ष एड. प्रीतम शिंदे यांनी दिली. कार्यक्रमाची सुरुवात सकाळी दहा वाजता स्वागत, अल्पोपहार व चहापानाने होणार आहे. त्यानंतर उदघाटन होणार आहे. पुढील सत्रात साहित्यिक आणि सांस्कृतिक कार्यक्रमांची रेलचेल असणार आहे. या संमेलनाचे विशेष आकर्षण म्हणजे महाराष्ट्राच्या विविध भागांतून ५१ हून अधिक निमंत्रित कवी सहभागी होऊन आपल्या कविता सादर करणार आहेत. त्यामुळे राज्यस्तरीय कवी संमेलनाला विशेष रंगत येणार असून, काव्य रसिकांना विविध विषयांवरील कविता ऐकण्याची संधी मिळणार आहे. याशिवाय संगीतकार ज्ञानेश्वर शिंदे आणि गायिका निलम शिंदे यांच्या गायन व वादनाचा कार्यक्रम होणार आहे. तसेच दीपक मांडेकर व 'वडवानल कल्चरल ग्रुप' निर्मित 'या भोंदूंनी तुला गंडवलं' हे प्रबोधनात्मक पथनाट्य सादर करण्यात येणार आहे.

शिर्डी येथे गुरुवारी चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अधिवेशन

चाकण : दैनिक संध्या

राष्ट्रीय चर्मकार महासंघ व महाराष्ट्र राज्य चर्मकार संघाच्या वतीने शिर्डी येथे गुरुवारी (दि.८) चर्मकार महासंघाचे राष्ट्रीय अधिवेशन आयोजित करण्यात आले आहे. साई पालखी निवारा, निघोज, निमगाव, शिर्डी येथे हे अधिवेशन व मेळावा होणार आहे. महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, माजी समाज कल्याण मंत्री बबनराव घोलप, जलसंपदा विभागाचे मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाघचौरे, डॉ. उमेश कणकवलीकर व उद्योजक डॉ. मेहबूब सैय्यद आदी मान्यवरांची या राष्ट्रीय अधिवेशनाला विशेष उपस्थिती लाभणार आहे. डॉ. मेहबूब सैय्यद हे चाकण येथील टीएसपीएल ग्रुपचे अध्यक्ष असून, वर्ल्ड बुक ऑफ रेकॉर्ड्सचे मार्गदर्शक असल्याने त्यांना विशेष निमंत्रित करण्यात आले आहे. संत रोहिदास चर्मयोगी विकास महामंडळाचे माजी अध्यक्ष व राज्य मंत्री दर्जा प्राप्त डॉ. ज्ञानेश्वर कांबळे यांनी सांगितले की," राष्ट्रीय अधिवेशनाच्या माध्यमातून चर्मकार समाजाच्या विविध प्रश्नांवर चर्चा, समाजातील युवकांसाठी प्रशिक्षण, मार्गदर्शन, रोजगाराच्या संधी तसेच सामाजिक आणि आर्थिक विकासाच्या विविध विषयांवर विचार मंथन होणार आहे."

चुकीच्या व्यक्तीची गोळी झाडून हत्या

शिरूर : दैनिक संध्या

कारेगाव (ता.शिरूर)येथील साईनगर परिसरातील पाण्याच्या प्लॅन्टमध्ये काम करणाऱ्या हामजा उस्मान शेख (वय ३९) यांच्या गोळीबारातील हत्येचा रांजणगाव पोलिस व स्थानिक गुन्हे शाखेने छडा लावला आहे. जागेच्या वादातून विकास नवले यांच्या हत्येची सुपारी देण्यात आली होती; मात्र मारेकऱ्यांनी विकास नवले समजून त्यांचा कामगार हामजा शेख यांच्या डोक्यात गोळी झाडून हत्या केल्याचे पोलिस तपासात समोर आले आहे. या प्रकरणी पोलिसांनी सार्थक संदेश कोहकडे (२४, कारेगाव), तुषार अजय तोडकर (२६, पेठ, आंबेगाव), संतोष मधुकर मांजरे (३७, मांजरेवस्ती, खेड), विठ्ठल नवनाथ पिकळे (२७, कोरेगाव, खेड) आणि योगेश विलास इडोळे (२८, शुक्रवार पेठ, वाशीम) या पाच जणांना अटक केली आहे. आरोपी सध्या पोलिस कोठडीत आहेत. तर पवन सुरेश हुंडारे आणि पृथ्वी ऊर्फ भैय्या दत्तू जाधव या दोघांचा शोध सुरू आहे. रांजणगाव पोलिस ठाण्यात गु.र.नं. ४६३/२०२६, भारतीय न्याय संहिता कलम १०३(१) व शस्त्र अधिनियम कलम ३(२५) अन्वये हा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिस तपासानुसार, सार्थक कोहकडे याचा शेजारी राहणाऱ्या विकास नवले यांच्याशी जागेवरून वाद होता. या वादातून सार्थकने विकास नवले यांचा काटा काढण्यासाठी तुषार तोडकर याला सुपारी दिल्याचे तपासात निष्पन्न झाले.



जल्लोषवर पुन्हा टी.सी.चीच मोहोर; सलग तिसऱ्यांदा विजेतेपद

■ बारामती (दै. संध्या)

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे विद्यार्थी विकास मंडळ व ॲग्रीकल्चर डेव्हलपमेंट ट्रस्टचे, शारदाबाई पवार महिला महाविद्यालय, शारदानगर यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित विभागीय 'जल्लोष-२०२६' युवा महोत्सवात अनेक कला प्रकारांमध्ये उल्लेखनीय कामगिरी केलेल्या अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या तुळजाराम चतुरचंद महाविद्यालयाने सलग तिसऱ्यांदा विजेतेपद पटकावत ऐतिहासिक कामगिरी नोंदवली. महाविद्यालयाने तब्बल २८ पैकी २४ कलाप्रकारांमध्ये विजेतेपद मिळवत १६६ गुणांची ऐतिहासिक विक्रमी नोंद केली.

महोत्सवात महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी संगीत, नृत्य, नाट्य, साहित्य व ललित कला या पाचही प्रमुख विभागांत दमदार कामगिरी करत आपल्या कलागुणांची छाप उमटवली. विविध कलाप्रकारांतील सातत्यपूर्ण यशामुळे महाविद्यालयाने सलग तिसऱ्यांदा 'जल्लोष'च्या विजेतेपदावर आपले नाव कोरले.

या यशाचे वैशिष्ट्य म्हणजे २८ पैकी २४ कलाप्रकारांत मिळविलेले विजेतेपद आणि १६६ गुणांची विक्रमी आघाडी. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण सरावाला, कलाविषयक गुणवत्ता आणि प्रयत्नांना या यशामुळे मोठी पावती मिळाली आहे.

पारितोषिक वितरण समारंभास विद्यार्थी विकास मंडळाच्या संचालक डॉ.सविता कुलकर्णी, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा.संदिप पालवे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश जगताप तसेच प्राचार्य राजकुमार बा. देशमुख यांची प्रमुख उपस्थिती होती. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.अविनाश जगताप यांच्या मार्गदर्शनाखाली सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा.भीमराव तोरणे, प्रा.सोमनाथ कदम आणि प्रा.राजेंद्र कंडरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करत या स्पर्धेसाठी विशेष परिश्रम घेतले. या अभूतपूर्व यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष जवाहर शाह (वाघोलीकर), सचिव मिलिंद शाह (वाघोलीकर), संस्थेचे सर्व पदाधिकारी व सदस्य, प्राचार्य डॉ. अविनाश जगताप, सर्व उपप्राचार्य, प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी तसेच विद्यार्थी-विद्यार्थिनी यांनी सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. भीमराव तोरणे, प्रा. सोमनाथ कदम, प्रा. राजेंद्र कंडरे आणि सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले.

नगरसेवक लोहकरे यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव

■ चाकण (दै. संध्या)



माझ्या प्रभागातील प्रत्येक नागरिक हेच माझे कुटुंब आहे. त्यांनी माझ्यावर दाखवलेला अथांग विश्वास आणि दिलेले प्रेम हीच माझी खरी कमाई आहे. त्यांनी सोपवलेल्या या जबाबदारीचे मी प्रामाणिकपणे सोनं करेन प्रभागाच्या विकासात आणि नागरिकांच्या सुखदुःखात मी कधीही कमी पडणार नाही, अशा शब्दांत चाकण नगरपरिषदेचे नगरसेवक अनिल इंदाराम लोहकरे यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.

निमित्त होते लोहकरे यांच्या वाढदिवसाचे व भव्य स्नेहमिलन आणि शुभेच्छा सोहळ्याचे. चाकण येथे हा सोहळा अत्यंत उत्साहात, आपुलकीच्या आणि आपुलकीने भारलेल्या वातावरणात पार पडला. सकाळपासूनच नगरसेवक अनिल लोहकरे यांना शुभेच्छा देण्यासाठी नागरिकांची, कार्यकर्त्यांची आणि मान्यवरांची रीघ लागली होती. राजकीय मतभेद बाजूला ठेवून चाकण शहरातील विविध क्षेत्रांतील दिग्गजांनी एकत्र येत अनिल लोहकरे यांच्या स्नेही आणि तत्पर स्वभावाचे प्रचंड कौतुक केले.

चाकण नगरपरिषदेच्या नगराध्यक्षा मनीषा गोरे, उपनगराध्यक्षा जयश्री नायकवाडी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे सदस्य नितीन गोरे, नगरसेविका सुवर्णा राक्षे, शिवसेना शिंदे गटाचे चाकण शहर उपप्रमुख प्रकाश साहेबराव राजनकर, महिला व बालकल्याण समितीच्या सभापती रुपाली कांडगे, नगरसेवक मंगेश कांडगे आदींच्या हस्ते लोहकरे यांचा गौरव करण्यात आला.

नगरसेवक अनिल लोहकरे यांनी सांगितले की, " माझ्या प्रभागाचा कायापालट हेच माझे ध्येय आहे. जनतेने माझ्या पाठीशी उभे राहून जी ताकद दिली. ती मला अहोरात्र काम करण्याची ऊर्जा देते.

रस्ते, पाणी, स्वच्छता आणि मूलभूत सुविधांचे प्रश्न तडीस नेऊन प्रभागाला मॉडेल बनवणे हेच माझे स्वप्न आहे." गटनेते नितीन गोरे यांनी यावेळी नगरसेवक अनिल लोहकरे यांच्या कामाचा धडाका, अभ्यासू वृत्ती आणि सर्वसामान्यांच्या हाकेला धावून जाण्याच्या स्वभावाचे भरभरून कौतुक केले."

टीएसपीएल ग्रुपच्या ३७ व्या कार्यालयाचा दिमाखात शुभारंभ

■ चाकण (दै. संध्या)



टॅलेंटकॉर्प सोल्युशन्स प्रायव्हेट लिमिटेड अर्थात टीएसपीएल ग्रुपच्या ३७ व्या कार्यालयाचा भव्य शुभारंभ शिंदेवाडी, कात्रज, पुणे येथे उत्साहपूर्ण वातावरणात संपन्न झाला.

भोर विधानसभा मतदार संघाचे आमदार शंकर मांडेकर, पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे संचालक रमेश कोंडे, टीएसपीएल ग्रुपचे संस्थापक डॉ. मेहबूब सैय्यद, लिडकॉमचे माजी अध्यक्ष डॉ. ज्ञानेश्वर कांबळे, उद्योजक सोमनाथ आव्हाड, सॅलोनी गुप्ता, पराग मेंगले आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. डॉ. सैय्यद यांनी सांगितले की," टीएसपीएल ग्रुप ही संस्था कौशल्य विकास, अप्रेंटिसशिप, मनुष्यबळ व्यवस्थापन आणि रोजगार निर्मिती क्षेत्रात कार्यरत असलेली अग्रगण्य संस्था आहे. देशभरातील युवकांना रोजगाराच्या विविध संधी उपलब्ध करून देण्यासोबतच उद्योगांना कुशल मनुष्यबळ उपलब्ध करून देण्यासाठी संस्था सातत्याने कार्यरत असते. नवीन कार्यालयाच्या माध्यमातून कात्रज आणि पुणे परिसरातील युवकांना रोजगार, कौशल्य विकास, अप्रेंटिसशिप तसेच करिअरच्या विविध संधी अधिक प्रभावीपणे उपलब्ध करून देण्याचा टीएसपीएल ग्रुपचा मानस आहे. या नव्या कार्यालयामुळे पुणे विभागातील टीएसपीएल ग्रुपच्या कार्याचा विस्तार होणार असून, युवक आणि उद्योग यांच्यातील रोजगाराची दरी कमी करण्यास तसेच स्थानिक स्तरावर रोजगाराच्या अधिक संधी निर्माण करण्यास मदत होणार आहे.

जुन्नरच्या रेस्क्यू टीमचा विशेष गौरव

■ नारायणगाव(दै. संध्या)



वन्यजीव सप्ताहाचे औचित्य साधून पुणे वनविभाग, वनपरीक्षेत्र मावळ, वन्यजीव रक्षक मावळ संस्था आणि रोटरी क्लब मावळ यांच्या संयुक्त विद्यमाने एका विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात जुन्नर येथील 'वन्यजीव निसर्ग संवर्धन रेस्क्यू टीम' या संस्थेला त्यांनी वन्यजीव संरक्षण आणि जनजागृती क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्यासाठी विशेष सन्मानचिन्ह देऊन गौरविण्यात आले.

ही संस्था वन्यजीवांच्या संरक्षणासाठी सातत्याने कार्यरत आहे. अडचणीत सापडलेल्या वन्यजीवांना सुरक्षितपणे रेस्क्यू करणे, सर्पांविषयी लोकांमध्ये असलेली भीती दूर करून जनजागृती करणे, तसेच मानव व वन्यजीव संघर्ष कमी करण्यासाठी नागरिकांमध्ये जागृती निर्माण करण्याचे मोलाचे काम या संस्थेमार्फत केले जाते. तसेच शाळा महाविद्यालयांमध्ये मार्गदर्शन, वन्यजीव संरक्षणाबाबत लोकांना माहिती देणे, तसेच जंगलातील आग, वन्यजीवांचे संरक्षण आणि पर्यावरण संवर्धन याबाबत संस्था सातत्याने काम करत आहे. त्यामुळे परिसरातील अनेक नागरिकांना वन्यजीवांविषयी सकारात्मक दृष्टिकोन निर्माण होण्यास मदत झाली आहे. त्यांच्या याच कार्याची दखल घेऊन हा पुरस्कार प्रदान करण्यात आला.

शिवनेरीवर स्वच्छ भारत स्वस्थ भारत अभियान कार्यक्रम

■ नारायणगाव(दै. संध्या)




राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीनिमित्त शिवनेरी किल्ल्यावर भव्य स्वच्छता अभियानाचे आयोजन करण्यात आले. "स्वच्छता हीच सेवा" या भावनेतून आयोजित करण्यात आलेल्या या अभियानात विविध ७ शाळा व ६ महाविद्यालयांतील एकूण ७६० एनसीसी कॅडेट्स सहभाग होता आणि ए.एन.ओ नी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. ऐतिहासिक शिवनेरी किल्ल्याचा परिसर स्वच्छ ठेवण्याबरोबरच युवकांमध्ये स्वच्छता, सामाजिक जबाबदारी, शिस्त आणि राष्ट्रप्रेमाची भावना निर्माण करण्याचा संदेश या अभियानातून देण्यात आला.

या कार्यक्रमास महाराष्ट्राचे ॲडिशनल डायरेक्टर जनरल (ए.डी.जी) मेजर विवेक त्यागी, पुणे ग्रुप कमांडर ब्रिगेडिअर एस. पी. रौतेला यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच ३६ महाराष्ट्र बटालियन, पुणेचे कमांडिंग ऑफिसर निषाद मंगरूळकर यांचीही उपस्थिती होती.शाळा-महाविद्यालयांतील एनसीसी कॅडेट्स आणि एएनओंनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून स्वच्छता अभियान व नुकड नाटक सादरीकरण प्रत्यक्ष सहभाग घेतला. यावेळी महाराष्ट्र डायरेक्टर जनरल माननीय विवेक त्यागी यांनी उपस्थित कॅडेट्सशी संवाद साधताना स्वच्छतेचे महत्त्व, सामाजिक जबाबदारी आणि सार्वजनिक ठिकाणांचे जतन, तसेच कृत्रिम बुद्धिमत्ता एआय याविषयी मार्गदर्शन केले. ऐतिहासिक वास्तू आणि सार्वजनिक परिसर स्वच्छ ठेवणे ही केवळ प्रशासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाची जबाबदारी असल्याचे त्यांनी सांगितले. यासोबतच एनसीसी कॅडेट्सना एनसीसीच्या माध्यमातून उपलब्ध होणाऱ्या विविध शैक्षणिक, प्रशिक्षणात्मक आणि करिअरच्या संधींबाबतही मार्गदर्शन करण्यात आले. एनसीसी प्रशिक्षणामुळे विद्यार्थ्यांमध्ये शिस्त, नेतृत्वगुण, आत्मविश्वास, संघभावना आणि जबाबदारीची जाणीव विकसित होते.

गणेशोत्सवानंतर मांसाहाराची मागणी वाढली, खवय्यांची मोठी गर्दी

■ नारायणगाव (दै. संध्या)



गणेशोत्सव संपल्यानंतर दुसऱ्या आठवड्यातही बाजारपेठेत मासे, मटण आणि चिकन खरेदीसाठी खवय्यांची मोठी गर्दी पाहायला मिळत आहे. चालू आठवड्यात मांसाहारी पदार्थांची मागणी कमालीची वाढली असून, आगामी काळात नवरात्रोत्सव सुरू होणार असल्याने त्यापूर्वीच मांसाहार करण्याकडे नागरिकांचा कल वाढला आहे. वाढत्या मागणीमुळे चिकन आणि मासळीच्या दरात लक्षणीय वाढ झाली आहे, तर मटणाचे दर मात्र स्थिर असल्याचे चित्र दिसत आहे.

गेल्या काही दिवसांपासून राज्यातील विविध भागांत पावसाने ओढ दिली असून कडक ऊन पडत आहे. या बदलत्या हवामानाचा आणि तीव्र उष्णतेचा थेट परिणाम पोल्ट्री व्यवसायावर झाला असून पक्ष्यांच्या मृत्यूचे प्रमाण वाढले आहे. परिणामी, नेहमीच्या तुलनेत बाजारात कोंबड्यांची आवक सुमारे २० टक्क्यांनी घटली आहे. आवक कमी आणि नवरात्रापूर्वी खाणाऱ्यांची संख्या जास्त असल्यामुळे चिकनच्या दरात किलोमागे ३० रुपयांची वाढ झाली आहे.

चिकनसोबतच अंड्यांच्या दरातही वाढ नोंदवली गेली आहे. गणेशोत्सवानंतर मागणी वाढल्यामुळे गावरान अंड्यांचे भाव प्रति शेकडा ५० रुपयांनी वधारले आहेत. तर दुसरीकडे, इंग्लिश अंड्यांचे दरही प्रति नग ५ रुपयांनी वाढले आहेत.

मागणी प्रचंड असल्यामुळे मासळीचे दर २० टक्क्यांनी वाढले आहेत. विशेषतः सुरमई आणि पापलेटच्या दरात मोठी वाढ झाली असून हलवा मासाही महागला आहे. इतर प्रकारच्या मासळीचे दर मात्र गेल्या आठवड्याच्या तुलनेत स्थिर आहेत.

बाजारातील मासळीचे ताजे दर (प्रति किलो): • पापलेट: कापरी (१८०० - २२०० रु.), मोठे (१८०० - २००० रु.), लहान (९०० - १००० रु.) • सुरमई: ४०० - ९०० रु. • हलवा: ६०० - ७०० रु. • रावस: ८०० - ९०० रु. • घोळ: ८०० - ९०० रु. • करली: ३०० - ४०० रु. • भिंग: ३०० - ४०० रु. • वाम: पिवळी (९०० - १००० रु.), काळी (४०० - ४०० रु.) • ओले बोंबील: १०० - १८० रु. • कोळंबी: लहान (१६० - २०० रु.), मध्यम (३०० - ४०० रु.), मोठी (५०० - ६०० रु.) • जम्बो प्रॉन्स: १५०० रु. • किंग प्रॉन्स: ८०० - ९०० रु. • लॉबस्टर: २००० - २४०० रु. नदीच्या मासळीमध्ये रहु १४० ते १८० रुपये, कतला १६० ते २२० रुपये आणि मरळ ३०० ते ४०० रुपये किलो दराने विकली जात आहे. एकीकडे चिकन आणि मासे महाग होत असताना मटणाचे दर मात्र नियंत्रित आहेत.

मटणाची मागणी आणि पुरवठा यामध्ये चांगला समतोल असल्याने गेल्या काही आठवड्यांपासून मटणाचे भाव स्थिर आहेत. सध्या बाजारात बोकडाचे मटण ८४० रुपये, तर जिवंत कोंबडी १७० रुपये आणि बोनलेस चिकन ३५० रुपये किलो दराने उपलब्ध आहे. पुढील आठवड्यापासून नवरात्र सुरू होत असल्याने या आठवड्याच्या अखेरपर्यंत ही गर्दी अशीच कायम राहण्याची शक्यता व्यापाऱ्यांनी वर्तवली आहे.

थोडक्यात पण महत्वाचे



दसऱ्यानिमित्त स्मार्टफोन्स, टॅब्लेट्स आणि ऑडिओ पोर्टफोलिओवर आकर्षक ऑफर्स

पुणे : दैनिक संध्या

वनप्लस इंडियाने स्मार्टफोन्स, टॅब्लेट्स आणि ऑडिओ उत्पादनांवर आकर्षक ऑफर्ससह आपल्या फेस्टिव्ह सेलची घोषणा केली आहे. 8 ऑक्टोबर, 2026 (रात्री 12 वाजल्यापासून) ग्राहकांना संपूर्ण वनप्लस पोर्टफोलिओवर फेस्टिव्ह किंमत कपात, इंस्टंट बँक डिस्काउंट, नो कॉस्ट ईएमआय आणि विशेष लाभांचा आनंद घेता येणार आहे. त्यामुळे दसरा हा आपल्या आवडत्या वनप्लस डिव्हाइसेसचे अपग्रेडेशन करण्यासाठी एक उत्तम संधी ठरणार आहे. ग्राहकांना वनप्लस 15 सिरीज, वनप्लस 13s, नॉर्ड 6 सिरीज आणि N सिरीज वर आकर्षक फेस्टिव्ह ऑफर्सचा लाभ घेता येणार आहे. या मालिकेतील स्मार्टफोन्सची प्रभावी किंमत 14,999 रुपये पासून सुरू होत असून फ्लॅगशिप वनप्लस 15 ची प्रभावी किंमत 81,999 रुपये इतकी आहे. या ऑफर्समध्ये निवडक मॉडेल्सवर फेस्टिव्ह किंमत कपात, इंस्टंट बँक डिस्काउंट आणि नो कॉस्ट ईएमआयचा समावेश आहे. वनप्लस पॅड 4 खरेदी करणारे ग्राहक 4,500 रुपये पर्यंतचा इंस्टंट बँक डिस्काउंट आणि कॉम्प्लिमेंटरी वनप्लस स्टायलो प्रो चा लाभ घेऊ शकतात. तर वनप्लस पॅड Go2 सोबत मोफत Go2 स्टायलो दिला जात आहे. याशिवाय, वनप्लस पॅड लाईट हा 22,999 रुपये या विशेष फेस्टिव्ह किंमतीत उपलब्ध आहे. वनप्लसच्या ऑडिओ पोर्टफोलिओमधील विविध उत्पादनांवर आकर्षक फेस्टिव्ह बचतीच्या ऑफर्स उपलब्ध आहेत. फ्लॅगशिप वनप्लस बड्स प्रो 3 हा 8,999 रुपये या प्रभावी किंमतीत उपलब्ध आहे. ग्राहकांना बड्स 4 आणि नॉर्ड बड्स सिरीज वरील ऑफर्सचाही लाभ घेता येणार आहे. तसेच, जेड मिस्ट रंगातील नवीन नॉर्ड बड्स 3r हे इयरबड्स 1,599 रुपये या प्रारंभिक प्रभावी किंमतीत उपलब्ध करण्यात आले आहेत.

एकतर्फी निर्णयांच्या आरोपांवर सर्वोच्च न्यायालयाकडून मुख्य निवडणूक आयुक्तांसह आयोगाला नोटीस

नवी दिल्ली : दैनिक संध्या

निवडणूक आयोगातील महत्त्वाचे निर्णय इतर निवडणूक आयुक्तांची संमती किंवा सहभाग न घेता एकतर्फी पद्धतीने घेतले जात असल्याचा आरोप करणाऱ्या याचिकेची सर्वोच्च न्यायालयाने गंभीर दखल घेतली आहे. या प्रकरणी न्यायालयाने मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार तसेच निवडणूक आयोगातील अन्य वरिष्ठ अधिकाऱ्यांकडून उत्तर मागविले आहे. सरन्यायाधीश सूर्यकांत यांच्या अध्यक्षतेखालील आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची व न्यायमूर्ती व्ही. मोहना यांच्या खंडपीठाने भारत निवडणूक आयोग, मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार तसेच निवडणूक आयुक्त सुखबीर सिंह संधू आणि विवेक जोशी यांना उत्तर देण्याचे निर्देश दिले. आयोगाच्या महासंचालक (आयटी) सीमा खन्ना आणि वरिष्ठ उपनिवडणूक आयुक्त मनीष गर्ग यांच्याकडूनही न्यायालयाने स्पष्टीकरण मागविले आहे. बहुसदस्यीय निवडणूक आयोगाच्या कामकाजात निर्धारित प्रक्रिया न पाळता आयोगाच्या नावाने निर्णय घेण्यात आल्याचा दावा याचिकेत करण्यात आला आहे. ऑक्टोबर २०२५ ते ऑगस्ट २०२६ या कालावधीत निवडणूक आयुक्त संधू आणि जोशी यांनी आयोगाच्या नावाने घेतलेल्या काही निर्णयांवर आक्षेप नोंदविल्याचा उल्लेख याचिकेत आहे. मतदार यादीशी संबंधित प्रक्रिया, बैठकीचे अजेंडे आणि इतिवृत्तांच्या प्रसारणातील कथित विलंब तसेच अन्य निवडणूक आयुक्तांना माहिती न देता किंवा त्यांची मंजुरी न घेता न्यायालयीन प्रकरणे दाखल करण्याच्या मुद्द्यांवरही याचिकेत प्रश्न उपस्थित करण्यात आले आहेत. याचिकाकर्त्याच्या वतीने मुख्य निवडणूक आयुक्तांना निलंबित करण्यास किंवा त्यांच्या काही अधिकारांवर अंतरिम काळात निर्बंध आणण्याची मागणी करण्यात आली. मात्र, त्यावर तत्काळ अंतरिम आदेश देण्यास न्यायालयाने नकार दिला. या टप्प्यावर ठोस आणि अधिकृत माहिती आवश्यक असल्याचे सरन्यायाधीशांनी स्पष्ट केले. "आमच्यासमोर काही अधिकृत माहिती असणे आवश्यक आहे. दहा दिवस प्रतीक्षा करूया," असे सरन्यायाधीशांनी नमूद केले. माध्यमांतील वृत्तांच्या आधारेच न्यायालयाने निर्णय घेऊ नये, असेही खंडपीठाने स्पष्ट केले. वृत्त पूर्णपणे अचूक, अंशतः अचूक किंवा चुकीचे असू शकते, असे न्यायालयाने नमूद केले. याचिकेत मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरिक्षणाला (Special Intensive Revision) आव्हान देण्यात आले असून, या प्रक्रियेशी संबंधित निर्णय आणि कारवाईच्या कायदेशीर वैधतेवरही प्रश्न उपस्थित करण्यात आला आहे. कायदेशीर अधिकाराशिवाय कोणतीही कारवाई झाल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आल्यास योग्य आदेश द्यावेत, अशी मागणी करण्यात आली आहे.

एमपीएससीच्या अध्यक्षांवर कारवाईची तयारी; चौकशी समितीसाठी फडणवीसांची राज्यपालांकडे शिफारस

मुंबई : दैनिक संध्या

महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (MPSC) कामकाजावरून पुण्यात सुरू असलेल्या विद्यार्थ्यांच्या आंदोलनाची मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दखल घेतली असून, आयोगाचे माजी व विद्यमान अध्यक्ष तसेच सदस्य यांच्याविरोधात संविधानाच्या कलम ३१७ अंतर्गत कारवाईच्या अनुषंगाने चौकशी समिती स्थापन करण्याची शिफारस त्यांनी राज्यपाल जिष्णूदेव वर्मा यांच्याकडे केली आहे. उच्च न्यायालयाच्या निवृत्त न्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करून तीन महिन्यांत अहवाल मागवावा आणि त्यातील निष्कर्षांच्या आधारे पुढील कार्यवाही करावी, अशी विनंती मुख्यमंत्र्यांनी केली आहे. मुख्यमंत्री फडणवीस आणि स्पर्धा परीक्षांची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या शिष्टमंडळामध्ये झालेल्या चर्चेदरम्यान आयोगाच्या अध्यक्षांना पदावरून हटविण्यापूर्वी नियमानुसार चौकशीची प्रक्रिया आवश्यक असल्याचे स्पष्ट करण्यात आले होते. त्यानुसार अध्यक्ष आणि सदस्यांविरोधातील आरोपांची चौकशी करण्यासाठी समिती स्थापन करण्याची शिफारस करण्यात आली आहे. दरम्यान, एमपीएससीमार्फत घेण्यात आलेल्या अन्न व औषध प्रशासन विभागातील औषध निरीक्षक पदाच्या परीक्षेचा पेपर फुटल्याचे तपासात निष्पन्न झाले आहे. या प्रकरणात तीन विद्यार्थ्यांना पेपरचा लाभ झाल्याचे समोर आले असून, संबंधित विद्यार्थ्यांसह इतर आरोपींना अटक करण्यात आली आहे. आयोगामार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेचा पेपर फुटल्याने पुण्यात स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी आक्रमक झाले असून, आयोगाचे अध्यक्ष विवेक भीमनवार यांच्या राजीनाम्याची मागणी करण्यात येत आहे. आमदार रोहित पवार यांच्या नेतृत्वाखाली पुण्यात विद्यार्थ्यांचे आंदोलन सुरू असून, शहरात तीन ठिकाणी आंदोलने सुरू असल्याचे सांगण्यात आले आहे. राज्य सेवा मुख्य परीक्षेचा प्रश्नपत्रिका पॅटर्न बहुपर्यायी ठेवायचा की वर्णनात्मक, यावरूनही विद्यार्थ्यांमध्ये विविध भूमिका आहेत. दरम्यान, मुख्यमंत्री फडणवीस, एमपीएससीच्या स्पर्धा परीक्षांची तयारी करणारे विद्यार्थी आणि क्लासचालक यांची बैठक झाली होती. या बैठकीत आयोगाचे सचिव महेंद्र हरपाळकर यांना पदावरून हटविण्याचे आश्वासन विद्यार्थ्यांना देण्यात आले होते. त्यानुसार हरपाळकर यांना एमपीएससीच्या सचिवपदावरून कार्यमुक्त करण्यात आले आहे. विवेक भीमनवार यांची एमपीएससीच्या अध्यक्षपदी डिसेंबर २०२५ मध्ये नियुक्ती करण्यात आली होती. मात्र, त्यांनी मार्च २०२६ मध्ये प्रत्यक्ष कार्यभार स्वीकारला. पेपरफुटीच्या प्रकरणानंतर विद्यार्थ्यांनी त्यांच्या राजीनाम्याची मागणी लावून धरली आहे.

एअरटेल बिझनेसने आयक्यू गेटवे लॉन्च केले

सुरक्षित एंटरप्राइज मेसेजिंगसाठी टेलको-ग्रेड नेटवर्क इंटेलिजन्ससह भारताचे पहिले बिझनेस कम्युनिकेशन्स प्लॅटफॉर्म

■ नवी दिल्ली (दै. संध्या)

एअरटेल बिझनेस, भारतातील सुरक्षित आणि विश्वासार्ह कनेक्टिव्हिटी, टेक्नोलॉजी आणि कम्युनिकेशन्स सोल्यूशन्सचा अग्रगण्य पुरवठादार, यांनी आज एअरटेल आयक्यू गेटवे लॉन्च केले, जे भारताचे पहिलेच टेलको-ग्रेड नेटवर्क इंटेलिजन्स प्लॅटफॉर्म आहे, जे वेगवेगळ्या कस्टमर कम्युनिकेशन चॅनेल्सना एकाच सुरक्षित कंट्रोल प्लेनवर आणते.

एंटरप्राइजेसना आता एअरटेल आयक्यू गेटवे निवडल्यास वेगवेगळ्या विक्रेत्यांना स्वतंत्रपणे व्यवस्थापित करण्याची गरज पडणार नाही, हे एक डीपीडीपी-कंप्लायंट प्लॅटफॉर्म आहे जे एसएमएस, व्हॉट्सॲप, आरसीएस, व्हॉइस कम्युनिकेशन्स आणि नंबर व्हेरिफिकेशन (सायलेंट ऑथेंटिकेशन) एकाच ठिकाणी एकत्र करते. यामुळे एंटरप्राइजेसना त्यांचे बिझनेस कम्युनिकेशन्स मोठ्या प्रमाणावर सहजपणे व्यवस्थापित करता येईल, तर ग्राहकांचा विश्वास संरक्षित राहील आणि प्रत्येक ग्राहक संवादासाठी सुरक्षितता मूलभूत होईल.

एअरटेल बिझनेसची ही ऑफर आज अत्यंत महत्त्वाची आहे, जेव्हा व्यवसायांना त्यांच्या ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी अनेक सर्व्हिस प्रोव्हायडर्स आणि टूल्समध्ये विखुरलेले कस्टमर कम्युनिकेशन स्टॅक्स व्यवस्थापित करावे लागतात, आणि संदेशांच्या प्रत्यक्ष डिलिव्हरीबद्दल मर्यादित दृश्यमानता असते. संदेश अनेकदा अपयशी ठरले तरीही डिलिव्हर झाल्याचे नोंदवले जातात, तर बॉट्सद्वारे आंतरराष्ट्रीय ओटीपी पंपिंगमुळे बिले वाढतात. शिवाय, पूर्व-मंजूर संदेश टेम्पलेट्स व्यवस्थापित करणे हाताने करावे लागते आणि त्यामुळे अनेकदा चुका होतात. एंटरप्राइजेससाठी, विशेषतः बीएफएसआय, सरकार, ई-कॉमर्स आणि लॉजिस्टिक्स यांसारख्या क्षेत्रांमध्ये, यामुळे केवळ ग्राहकांचा विश्वास धोक्यात येत नाही जेव्हा ग्राहक फसवणुकीचे बळी ठरतात, तर त्यांची ब्रँड प्रतिष्ठाही खराब होते.

एअरटेल आयक्यू गेटवे सर्व बिझनेस कम्युनिकेशन्ससाठी एकाच कंट्रोल सेंटरद्वारे हे सोडवते. हे एअरटेलच्या फ्रॉड प्रोटेक्शनला नेटिव्ह मेसेज टेम्पलेट सिस्टम (डीएलटी) च्या स्वयंचलित इंटिग्रेशन्स, बॅक-अप सर्व्हिस प्रोव्हायडर्सवर स्वयंचलित स्विचिंग, आणि एसएमएस, व्हॉट्सॲप, आरसीएस आणि व्हॉइसवर बुद्धिमान राउटिंगसह एकत्र आणते.

एंटरप्राइज वापरासाठी एअरटेलच्या बिल्ट-इन नेटवर्क इंटेलिजन्स आणि ट्रस्ट लेयर्सचा वापर करून, जसे की फ्रॉड प्रोटेक्शनसाठी आयक्यू व्हेरिफाय आणि सिम-आधारित लॉगिनसाठी सायलेंट ऑथेंटिकेशन, तसेच फसवणूक खाती तयार करणे आणि ताब्यात घेणे आणि कृत्रिम ट्रॅफिक स्पाइक्स ओळखण्यासारख्या क्षमतांसह, एअरटेल आयक्यू गेटवे एंटरप्राइजेसना फसवणुकीच्या नुकसानीपासून आणि उद्योगव्यापी एसएमएस पंपिंगमुळे होणाऱ्या बिलिंग स्पाइक्सपासून संरक्षण देतो. निवडक बँका, वित्तीय संस्था आणि इतर संबंधित उद्योग सहयोगांमध्ये यशस्वी चाचणी उपयोजनांनंतर आज देशभरात लॉन्च झालेले, हे प्लॅटफॉर्म अंतिम ग्राहकांसाठी फसवणूक प्रतिबंधातील एअरटेलचे सिद्ध कौशल्य एंटरप्राइजेसपर्यंत विस्तारित करते, ज्यामुळे त्यांना सुरक्षित संवादांद्वारे मोठ्या प्रमाणावर ग्राहक विश्वास निर्माण करता येतो. एअरटेल बिझनेसचे सीईओ शरत सिन्हा म्हणाले, "भारत जसा सुरक्षित, सर्वसमावेशक डिजिटल अर्थव्यवस्थेकडे वेगाने पुढे जात आहे, तसा विश्वास प्रत्येक डिजिटल संवादाचा पाया बनला पाहिजे. सिक्युअर-बाय-डिझाइन कस्टमर एंगेजमेंट हा आजचा तो आधारस्तंभ आहे ज्यावर एंटरप्राइजेस आत्मविश्वासाने वाढू शकतात. एअरटेलमध्ये, आम्ही आमच्या मोबाइल आणि डिजिटल सेवांमध्ये लाखो ग्राहकांचे संरक्षण करण्यासाठी नेटवर्क-ग्रेड फ्रॉड प्रिव्हेंशनची ताकद आधीच सिद्ध केली आहे. आयक्यू गेटवेसह, आम्ही हे सिद्ध कौशल्य एंटरप्राइजेसपर्यंत विस्तारित करत आहोत, ज्यामुळे त्यांना ब्रँड विश्वास निर्माण करता येईल आणि प्रत्येक ग्राहक संभाषण सुरक्षित, प्रमाणित आणि लवचिक राहील. नेटवर्क लेयरवर विश्वास एम्बेड करून, आम्ही आमच्या एंटरप्राइज ग्राहकांना, विशेषतः बँका, सरकारी विभाग आणि लॉजिस्टिक्स कंपन्यांना, सायबर क्राइम नुकसान कमी करण्यात आणि प्रत्येक ग्राहक संवादाची विश्वासार्हता वाढवण्यात सक्षम करत आहोत. हे भारतासाठी सुरक्षित डिजिटल भविष्याकडे एक निर्णायक पाऊल आहे, जिथे नागरिक आणि व्यवसाय समान आत्मविश्वासाने व्यवहार आणि सहभाग घेऊ शकतील." लवचिक उपयोजन: हे विद्यमान कम्युनिकेशन वर्कफ्लो आणि विक्रेता इकोसिस्टमसह एकत्रित केले जाऊ शकते. ग्राहकांच्या प्राधान्यानुसार आणि सुरक्षा आवश्यकतांनुसार, हे एंटरप्राइजच्या परिसरात स्थापित केले जाऊ शकते किंवा एअरटेलच्या क्लाउडवर सास म्हणून होस्ट केले जाऊ शकते. एंड टू एंड कंट्रोलसह युनिफाइड प्लॅटफॉर्म: एंटरप्राइजेस रिअल टाइम ॲनालिटिक्स आणि पारदर्शक डिलिव्हरी रिपोर्टिंगसह एकाच डॅशबोर्डवर त्यांचे सर्व कस्टमर कम्युनिकेशन्स व्यवस्थापित करू शकतातआर्थिक नुकसानीपासून संरक्षण: उद्योगात प्रचलित असलेल्या फसवणूक एसएमएस पंपिंगमुळे होणाऱ्या फसवणूक नुकसानी आणि बिलिंग स्पाइक्सपासून संरक्षणनेटवर्क ग्रेड इंटेलिजेंट वैशिष्ट्ये: एअरटेलचे इंडस्ट्री-लीडिंग फ्रॉड प्रोटेक्शन नेटिव्ह डीएलटी इंटिग्रेशन, स्वयंचलित विक्रेता फेलओव्हर आणि बिल्ट-इन ट्रस्ट व सुरक्षिततेसाठी बुद्धिमान मल्टी-चॅनेल राउटिंगसह एकत्र केले आहे एअरटेल आयक्यू व्हेरिफाय (नेटवर्क-फर्स्ट फ्रॉड स्कोअरिंग) नेटवर्क, डिव्हाइस आणि वापर सिग्नल्सचे मूल्यांकन करते जेणेकरून फसवणूक खाती ऑनबोर्ड होण्यापासून रोखता येतील, आणि खरे ग्राहक फसवणुकीचे बळी होण्यापासून संरक्षित राहतीलसायलेंट ऑथेंटिकेशन (नेटवर्क-फर्स्ट लॉगिन/सिम बाइंडिंग) लॉगिन आणि सिम-बाइंडिंग फ्लोसाठी ओटीपी एसएमएसची जागा घेते, हे सत्यापित करून की प्रविष्ट केलेला नंबर डिव्हाइसमधील सक्रिय सिमशी जुळतो, ज्यामुळे सिम-स्वॅप आणि सोशल-इंजिनिअरिंग जोखीम कमी होते.

बाल विज्ञान मेळावा उत्साहात संपन्न

विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोनाचे बीजारोपण



■ नारायणगाव: (दै. संध्या)

महात्मा गांधी जयंतीचे औचित्य साधून जुन्नर तालुक्यातील श्री क्षेत्र आदर्श गाव बस्ती येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत विद्यार्थी विकास मंच आयोजित तृतीय बाल विज्ञान मेळावा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. अशी माहिती शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती मुळे यांनी दिली.

यावर्षी 'निसर्ग शक्ती' ही संकल्पना राबविण्यात आली होती.या मेळाव्यासाठी सावरगाव जिल्हा परिषद प्राथमिक शाळेतील 58 विद्यार्थीही सहभागी झाले होते.

विद्यार्थ्यांना खेळणी बनवायला शिकवण्यासाठी मुंबई व पुणे येथून 8 इंजिनिअर्सची टीम आली होती. वायूशक्ती, जलशक्ती,चुंबकशक्ती या संकल्पनांवर आधारित विविध प्रयोग प्रत्यक्षात करून दाखवण्यात आले. मुलांनी स्वतः बलून कार, रोबोटिक आर्म, फ्लोटिंग मॅग्रेट यासारखी नाविन्यपूर्ण विविध वैज्ञानिक खेळणी तयार केली.

शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण होऊन भविष्यातील शास्त्रज्ञ घडावेत, हाच या उपक्रमामागचा मुख्य उद्देश असल्याचे आयोजक संजय गोरडे सर यांनी सांगितले. विज्ञान मेळाव्यास प्रशिक्षक म्हणून मनीषजी पटेल,अशोक पटेल,दीपेश पटेल,रवींद्र शिंगणापूरकर, मंगेश कुलकर्णी, सुधीर नाईक, सुरज संकपाळ व संजय गोरडे सर हे उपस्थित होते. यावेळी अंगणवाडी बस्तीच्या चिमुकल्यांसाठी खाऊ व लाकडी खेळण्यांचे वाटप करण्यात आले.कार्यशाळेत सहभागी प्रत्येक विद्यार्थ्याला पाण्याची बॉटल,खाऊ व लेखन साहित्य किट भेट देण्यात आले. तर शिक्षकांसाठी सरप्राईज गिफ्ट म्हणून पर्सचे वाटप करण्यात आले.या कार्यक्रमाच्या यशस्वीतेबाबत विद्यार्थी वर्षा साळुंखे,कार्तिक गोरडे,श्रावणी कोळसे,अपूर्वा वैजापुरे यांनी आपले मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमास बस्ती गावचे सरपंच प्रकाश गिदे,शालेय व्यवस्थापन समिती अध्यक्ष अमोल शेलार, मनोज बोऱ्हाडे, संदीप शेलार, बाळकृष्ण गोरडे, सुखदेव लोखंडे,गणेश शेलार, दिनेश शेलार,निवृत्ती कोळसे, अमोल शेलार,शांताराम वाणी, चंद्रकांत भगत,गोरक्ष घुले,जयेश कचन, छाया गोरडे, अरुणा गोरडे, सुनीता गोरडे, सुवर्णा शेलार, प्रियंका औटी, पुनम बो-हाडे, दिपाली कोल्हे, मंगल रोकडे, शिवांजली गोरडे तसेच सावरगाव शाळेच्या मुख्याध्यापिका अनिता भुजबळ, शिक्षिका स्वाती भोर आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.गुंजाळवाडी केंद्राच्या केंद्रप्रमुख शोभा डोंगरे व सावरगाव चिंचोली केंद्राच्या केंद्रप्रमुख आरती मेहेर यांनीही कार्यक्रमास उपस्थिती लावली.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक बस्ती शाळेच्या मुख्याध्यापिका स्वाती मुळे यांनी केले.सूत्रसंचालन शिक्षिका आम्रपाली वैजापूरे यांनी केले.

इंडियन स्कूल ऑफ बिझनेसची २५ वर्षे पूर्ण

■ मोहाली : (दै. संध्या)

फायनान्शियल टाइम्स ग्लोबल एमबीए रँकिंग्स 2026 मध्ये भारतात प्रथम आणि जगात 12व्या क्रमांकावर असलेल्या इंडियन स्कूल ऑफ बिझनेस (ISB)ने आपला 25 वा वर्धापनदिन साजरा केला. यानिमित्त ISB@25 या दीर्घकालीन उपक्रमांची घोषणा करण्यात आली. या उपक्रमाचा उद्देश मॅनेजमेंट शिक्षण अधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे तसेच भारतातील संशोधन आणि शिक्षणाची क्षमता मजबूत करणे हा आहे. ISB25 स्कॉलर्स प्रोग्राम अंतर्गत ISB दरवर्षी 250 शिष्यवृत्ती देणार आहे. या शिष्यवृत्ती ISBच्या प्रमुख पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्राम इन मॅनेजमेंट (पीजीपी) आणि पीजीपी इन मॅनेजमेंट फॉर यंग लीडर्स (पीजीपी YL) या अभ्यासक्रमांसाठी दिल्या जातील. ही शिष्यवृत्ती गुणवत्ता आणि आर्थिक गरज यांच्या आधारावर दिली जाईल. यामध्ये विद्यार्थ्यांना शिक्षण शुल्कात 100%, 50%, 30% आणि 25% पर्यंत सवलत मिळणार आहे. देशातील विविध क्षेत्रांतील हुशार विद्यार्थ्यांना ISBमध्ये शिक्षणाची संधी मिळावी, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे. वेगवेगळ्या आर्थिक, भौगोलिक आणि व्यावसायिक पार्श्वभूमीतील हुशार विद्यार्थ्यांना जागतिक दर्जाचे मॅनेजमेंट शिक्षण मिळावे, यासाठी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. यासोबतच ISB इंडिया रिसर्च कॉमन्स हे राष्ट्रीय स्तरावरील संशोधन व्यासपीठ सुरू करणार आहे. यामधून देशभरातील संशोधकांना निवडक डेटासेट, संशोधन साधने, संशोधन पद्धतीशी संबंधित संसाधने आणि एआय आधारित संशोधन सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. यासोबतच नवीन नॅशनल फॅकल्टी डेव्हलपमेंट कार्यक्रम सुरू केला जाणार आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून ISB देशभरातील मॅनेजमेंट शिक्षण संस्थांसोबत आपली शिक्षण पद्धती, वर्गातील शिकवण्याच्या पद्धती आणि तंत्रज्ञानाच्या मदतीने शिक्षण देण्याचे मार्ग शेअर करणार आहे. गेल्या 25 वर्षांत ISBने विकसित केलेल्या ज्ञान आणि क्षमतांचा फायदा देशातील व्यापक शैक्षणिक क्षेत्राला मिळू शकणार आहे. इंडियन स्कूल ऑफ बिझनेसचे डीन प्राध्यापक मदन पिल्लुतला म्हणाले, "ISB@25 हा केवळ आमचा 25 वर्षांचा प्रवास साजरा करण्याचा प्रसंग नाही, तर भविष्यासाठीची आमची बांधिलकी निश्चित करण्याची संधी आहे. उत्कृष्ट शिक्षण अधिकाधिक विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवणे, ज्ञान अधिक लोकांसोबत शेअर करणे आणि देशभरातील संस्था व संशोधकांसाठी संशोधन अधिक उपयुक्त बनवणे, हे आमचे उद्दिष्ट आहे." या नवीन उपक्रमांच्या माध्यमातून ISBने गेल्या काही वर्षांत विद्यार्थ्यांच्या आणि उद्योग क्षेत्राच्या बदलत्या गरजा लक्षात घेऊन सुरू केलेल्या विविध उपक्रमांना पुढे नेले आहे. 2025 मध्ये ISBने पोस्ट ग्रॅज्युएट प्रोग्राम इन मॅनेजमेंट फॉर यंग लीडर्स (पीजीपी YL) हा नवीन अभ्यासक्रम सुरू केला. या अभ्यासक्रमाच्या पहिल्या बॅचमध्ये 130 विद्यार्थ्यांना प्रवेश देण्यात आला.

'इश्का इश्का' घेऊन येतेय प्रेमाची गडद आणि थरारक दुनिया

■ मुंबई(दै. संध्या)

एक्सक्लुझिव्ह ओरिजिनल्ससाठी भारतातील सर्वात मोठी स्ट्रीमिंग सेवा असलेल्या प्राइम व्हीडिओ'च्या वतीने आज आगामी एमएक्स ओरिजिनल इश्का इश्काच्या ट्रेलर प्रसिद्ध करण्यात आला. हा प्रेम, वेड आणि नियंत्रण यांच्यातील अस्पष्ट रेषांचा शोध घेणारा एक तीव्र रोमँटिक थ्रिलर आहे. राजेश बच्चन लिखित आणि अमित कुमार झा दिग्दर्शित या मालिकेत हेली शाह, सत्यजीत दुबे आणि अनुष्का कौशिक यांच्या प्रमुख भूमिका आहेत. मूव्हिंग इमेजेस स्टुडिओ प्रायव्हेट लिमिटेडची निर्मिती असून ही सिरिज कबीर या उदयोन्मुख लेखकाभोवती फिरते. ही व्यक्तिरेखा प्रेमाच्या दोन अतिशय भिन्न प्रकारांमध्ये अडकली आहे. त्याला शांती देणारा एकप्रकार आणि एक गोंधळाला उत्तेजन देणारी स्थिती!

ट्रेलरमध्ये आरोही (हेली शाहने साकारलेली भूमिका), कबीर (सत्यजीत दुबेने साकारलेली भूमिका) आणि सुहानी (अनुष्का कौशिकने साकारलेली भूमिका) या वाढत्या गुंतागुंतीच्या भावनिक संघर्षात अडकलेल्या तीन जीवनाची ओळख करून दिली आहे. आरोहीसाठी, प्रेम म्हणजे कबीर पूर्णपणे तिचा असणे, अंतर, शंका किंवा निवडीसाठी फारच कमी वाव. दरम्यान, कबीरला सुहानीत असं काही निदर्शनास येते ज्याचा शोध तो बऱ्याच काळापासून घेत होताः स्थिरता, विश्वास आणि भावनिक स्पष्टता. आरोहीचे पुनरागमन त्याला परत त्या तीव्रतेकडे खेचण्याची धमकी देते ज्याने त्याचे नाते आणि लेखक म्हणून असलेल्या ओळखीला नेहमीच चालना दिली आहे. या दोन स्त्रिया कबीरच्या आयुष्यातील दोन विरोधी शक्तींचे प्रतिनिधित्व करतात. कबीर स्वतःला गोंधळ आणि शांतता, ताबा तसेच स्वातंत्र्याला प्रेरणा देणारे प्रेम अन् त्याविरुद्ध त्याचा बचाव करणारे प्रेम या दरम्यान अडकलेला पाहतो. द डेअर नियम करताना, भावना एका मानसिक खेळात परावर्तित होताना, इश्का इश्का एक अस्वस्थ करणारा प्रश्न विचारतेः प्रेम मर्यादा ओलांडून एक अस्वस्थ वेड बनते?



या मालिकेबद्दल बोलताना, प्राइम व्हिडिओ इंडियाचे एव्हीओडी कंटेंटचे डायरेक्टर आणि हेड अमोघ दुसाद म्हणाले, "इश्का इश्का' प्रेम आणि भावनेभोवती फिरते. वेड, नियंत्रण आणि सोडून देण्याच्या भीतीशी गुंफलेली स्थिती नेमकी काय असते याचा शोध घेते. या मालिकेच्या मुळाशी एक रंजक भावनिक वेग आहे. ज्यात सतत गोंधळ आणि शांतता, तीव्रता आणि स्थिरतेमध्ये पात्रे ओढली जातात. अमित कुमार झा यांची दूरदृष्टी आणि हेली शाह, सत्यजीत दुबे आणि अनुष्का कौशिक यांच्या दमदार अभिनयाने आम्ही ही उत्कट आणि अनपेक्षित कथा प्रेक्षकांसमोर आणण्यासाठी उत्सुक आहोत."


आरोहीच्या भूमिकेबद्दल बोलताना हेली शाह म्हणाली, "आरोही कबीरवर अत्यंत तीव्रतेने प्रेम करते. परंतु तिच्यासाठी प्रेम आणि ताबा ही जवळजवळ एकच गोष्ट आहे. ती झपाटून प्रेम करते म्हणूनच नव्हे तर तिचा अर्धवट भावनेवर विश्वास नसतो; या गोष्टीने मी या भूमिकेकडे आकर्षित झाले. ती बुद्धिमान, धोरणात्मक आणि खोलवर भावनिक आहे. ज्यामुळे व्यक्तिरेखा अनपेक्षित बनते. हे पात्र असुरक्षित आहे. परंतु तिची एक बाजू देखील आहे जी धोकादायक असू शकते. त्या दोन्ही बाजू सांभाळू शकणाऱ्या व्यक्तिची भूमिका साकारणे माझ्यासाठी आव्हानात्मक आणि रंजक होते."

कबीरबद्दल बोलताना सत्यजीत दुबे म्हणाला, "कबीर हा एक संवेदनशील व्यक्ती आहे. तो स्वतःला अशा परिस्थितीत अडकवतो ज्यातून सुटणे अधिकाधिक कठीण होत जाते. सुहानी त्याच्या जीवनात शांतता आणि भावनिक स्पष्टता आणत असताना, आरोहीच्या तीव्र उपस्थितीमुळे खरोखर पुढे जाणे कठीण होत जाते. कबीर बाहेर पडण्याचा मार्ग शोधण्यासह स्वतःसाठी एक वेगळे जीवन निर्माण करण्याचा प्रयत्न करत असताना, तो परत अशा परिस्थितीत ओढला जात राहतो ज्याची त्याने कल्पनाही केली नव्हती. ज्यातून बाहेर पडण्याचा कोणताही सोपा मार्ग दिसत नाही, अशा परिस्थितीतून मार्ग शोधण्याबद्दलचा त्याचा प्रवास आहे." सुहानीची भूमिका साकारण्याचा आपला अनुभव सांगताना अनुष्का कौशिक पुढे म्हणाली, "सुहानीचे पाय जमिनीवर आहेत. भावनिकदृष्ट्या जागरूक आहे आणि तिला नात्यातून काय हवे आहे याची स्पष्ट समज आहे. प्रेमात विश्वासासकट मोकळेपणा असला पाहिजे. यामुळेच मला या भूमिकेला आकार देता आला. त्याच वेळी, या व्यक्तिरेखेत शांत शक्ती आहे जी कथा पुढे सरकत असताना अधिक स्पष्ट होते.



दैनिक संध्या
निःपक्ष समीक्षणाचे... निर्भीड दैनिक
बुधवार, दि. ७ ऑक्टोबर २०२६

www.dainikesandhya.com www.youtube.com/@sandhyalivenews



आयटीआयमध्ये पेटकेअरसाठी विशेष अभ्यासक्रम सुरू होणार

देशातील पहिले पेटकेअर शिक्षण व प्रशिक्षण संस्थाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते उद्घाटन

■ मुंबई (दै. संध्या)

'पेटकेअर एज्युकेशन अँड ट्रेनिंग इकोसिस्टिम' (पीईटीई) हा पेटकेअर आणि प्राणी कल्याणाच्या क्षेत्रात उचललेले एक महत्त्वपूर्ण पाऊल आहे. पाळीव प्राणी हे आज आपल्या कुटुंबाचा अविभाज्य भाग झाले आहेत. एखाद्या समाजाची संवेदनशीलता त्या समाजातील प्राण्यांशी तो कसा वागतो, यावरूनही दिसून येते. पीईटीईच्या माध्यमातून आपल्या पाळीव प्राण्यांना जागतिक दर्जाची सेवा आणि काळजी मिळण्यासाठी आवश्यक कुशल मनुष्यबळ तयार होण्यास मदत होईल. या नव्या प्रवासासाठी मी पीईटीई टीमचे अभिनंदन करतो आणि या उपक्रमासाठी शक्य ती सर्व मदत करण्यास कटिबद्ध आहे, असे प्रतिपादन कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाचे मंत्री मंगलप्रभात लोढा यांनी केले.

पुण्यातील जे. एम. रोड येथे सोमवारी या पेटकेअर शिक्षण व प्रशिक्षण संस्थेचा शुभारंभ मंत्री मंगलप्रभात लोढा यांच्या हस्ते करण्यात आला. पेटकेअर क्षेत्रातील भावी व्यावसायिकांसाठी मुंबईतील औद्योगिक प्रशिक्षण संस्था (आयटीआय) येथे प्रायोगिक स्वरूपाचा विशेष प्रशिक्षण उपक्रम सुरू करण्याचा प्रस्ताव मंत्री लोढा



यांनी मांडला. पीईटीईच्या माध्यमातून पाळीव प्राण्यांची काळजी, आरोग्य, सुरक्षितता आणि कल्याण यांना केंद्रस्थानी ठेवून आधुनिक, शास्त्रीय आणि नैतिक पद्धतींचे प्रशिक्षण दिले जाणार आहे. पेटकेअर क्षेत्रात करिअर करू इच्छिणारे युवक-युवती, विद्यमान पेट प्रोफेशनल्स तसेच पेट पॅरेंट्स यांच्यासाठी विविध शासकीय मान्यताप्राप्त प्रमाणपत्र अभ्यासक्रम उपलब्ध करून देण्यात येणार आहेत. पेट हँडलिंग, डॉग वॉकिंग, पेट सिटिंग, पेट ग्रुमिंग, बोर्डिंग सुविधा व्यवस्थापन आदी प्रशिक्षण दिले जाणार आहे. तसेच प्रात्यक्षिक प्रशिक्षणावर जास्त भर दिला असून यात अद्यावत सुविधांमध्ये प्रत्यक्ष अनुभवावर आधारित प्रशिक्षण दिले जाईल. पेट पेरेंट्ससाठी पाळीव प्राण्यांचे सर्वांगीण आरोग्य, संगोपण व कल्याण यावर आधारित ऑनलाईल अभ्यासक्रमाद्वारे शिकवले जाणार आहे.

यावेळी पीईटीईचे संचालक पार्थ जोशी म्हणाले की, पेटकेअर क्षेत्राचा झपाट्याने विस्तार होत असताना प्रशिक्षित, संवेदनशील आणि प्रमाणित व्यावसायिकांची गरज मोठ्या प्रमाणात वाढली आहे. तसेच सखोल वैज्ञानिक अभ्यास आणि उद्योगक्षेत्राच्या गरजांचा विचार करून पीईटीईचा अभ्यासक्रम विकसित करण्यात आला आहे. प्रत्यक्ष प्रशिक्षणावर भर देत भावी प्राणीसेवकांना सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न आहे, असे पीईटीईचे संस्थापक भाग्येश रानडे यांनी सांगितले. तसेच महाराष्ट्र राज्य कौशल्य, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण मंडळ मान्यताप्राप्त अभ्यासक्रमांच्या प्रक्रियेचा आढावा घेण्यात आला. पेटकेअर क्षेत्रातील वाढती मागणी लक्षात घेऊन पीईटीईकडून पेट ग्रूमिंग, डॉग वॉकिंग, पेट सिटिंग, बोर्डिंग आणि इतर संबंधित क्षेत्रांतील कुशल मनुष्यबळाची कमतरता दूर करण्यासाठी प्रयत्न केले जाणार आहेत.

आगामी पाच वर्षांत पीईटीईचा विस्तार देशभर करण्याचे संस्थेचे उद्दिष्ट असून, पाळीव प्राण्यांचे जीवनमान तसेच त्यांची काळजी घेणाऱ्या व्यक्तींच्या कौशल्यात आणि व्यावसायिक क्षमतेत सकारात्मक बदल घडवून आणण्याचा संस्थेचा मानस आहे.

प्रा. नारायण टाक यांच्या 'प्रवासायन'चे जेजुरीत प्रकाशन

■ जेजुरी (दै. संध्या)

आपल्याकडची सुरुवातीची प्रवासवर्णने तीर्थयात्रेची वर्णने म्हणून आली. परंतु इंग्रजी साहित्याच्या परिचयाने मराठीत प्रवासवर्णनाची सुरुवात झाली. प्रा. नारायण टाक यांच्या 'प्रवासायन' या प्रवासवर्णनात्मक ललित लेखानातून त्यांनी पाहिलेल्या स्थळांचा इतिहास, संस्कृती, निसर्ग आणि कलांचे दर्शन घडते. प्रवासवर्णन हे केवळ भौगोलिक न होता लेखकाच्या व्यापक नजरेतून ते यायला हवे. प्रवासवर्णनात एक प्रकारची उत्सुकता असावी लागते. ती या पुस्तक लेखनात आहे. 'प्रवासायन' मधील लेखन अंतर्मुख करायला लावणारे आहे. सर्वव्यापक अशी निरीक्षणे यातून प्रतिबिंबित होत आहेत. डॉ.टाक यांच्या 'प्रवासायन' ने मराठी प्रवासवर्णनात एक मोलाची भर घातल्याचे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत डॉ. सदानंद मोरे यांनी केले. आचार्य अत्रे विकास प्रतिष्ठान, पुरंदरचे शरदचंद्रजी पवार महाविद्यालय, जेजुरी व जागृती प्रतिष्ठान, पुरंदर यांच्या संयुक्त विद्यमाने विश्वकर्मा प्रकाशन, पुणे यांच्या



सहकार्याने प्रा. डॉ. नारायण टाक यांच्या 'प्रवासायन' या पुस्तकाचा प्रकाशन समारंभ आयोजित करण्यात आला होता. या प्रसंगी व्यासपीठावर प्रा. डॉ. सदानंद मोरे,लेखक सु. ल. खुटवड, प्राचार्य डॉ. धनाजी नागरे, डॉ. नारायण टाक, जेजुरीचे नगराध्यक्ष जयदीप बारभाई, सचिन पेशवे व इतर मान्यवर उपस्थित होते. 'प्रवासायन' मागील लेखनाची भूमिका प्रा. डॉ. नारायण टाक यांनी आपल्या मनोगतातून मांडली. सु. ल. खुटवड यांनी या पुस्तकातून प्रवास, लेखक आणि चित्रकार या तिन्हीचे प्रतिबिंब आढळते, असे सांगून पुस्तकाची भाषा साधी, सोपी व प्रवाहित असल्याचे सांगितले वाचताना वाचकाला गुंतवून ठेवण्याचे सामर्थ्य लेखकाच्या लेखनशैलीत असल्याचे स्पष्ट केले.

थोडक्यात पण महत्वाचे



युवासेना विधानसभा समन्वयकपदी महेंद्र उघडे; नियुक्तीपत्र प्रदान

राजगुरूनगर : दैनिक संध्या

वैजनाथ उघडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. युवासेना मध्यवर्ती कार्यालयाकडून त्यांना नुकतेच नियुक्तीपत्र देण्यात आले. शिवसेना मुख्य नेते तथा महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार, खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली आणि युवासेना पदाधिकार्यांच्या विनंतीनुसार उघडे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. युवासेना सचिव किरण साळी, युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक आणि युवासेना मुख्य सचिव राहुल लोंडे यांच्या स्वाक्षरीने नियुक्तीपत्र देण्यात आले आहे.



महात्मा गांधी जयंतीनिमित्त जिजामाता वरिष्ठ महाविद्यालयात जयंती साजरी

कोरेगावमुळ : दैनिक संध्या

जिजामाता वरिष्ठ महाविद्यालय, जातेगाव येथे राष्ट्रपिता महात्मा गांधी जयंती राष्ट्रीय सेवा योजना व सांस्कृतिक विभागाच्या माध्यमातून कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. महात्मा गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवाजी बोऱ्हाडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 'युवकांनी महात्मा गांधीजींचे सत्य, अहिंसा, स्वच्छता, साधेपणा आणि सामाजिक बांधिलकीचे विचार आपल्या आचरणात अंगीकारावेत. विद्यार्थ्यांनी शिक्षणाबरोबरच समाजाच्या विकासासाठी सकारात्मक योगदान देणे आवश्यक आहे'. गांधीजींच्या विचारातून विद्यार्थ्यांनी प्रेरणा घेऊन जबाबदार नागरिक म्हणून समाजात कार्य करावे असे आवाहन त्यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कार्यक्रमाधिकारी डॉ. विजय गायकवाड यांनी केले. त्यांनी महात्मा गांधीजींच्या जीवनकार्याची आणि देशाच्या स्वातंत्र्यलढ्यातील त्यांच्या योगदानाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. तसेच गांधीजींच्या विचारांचे आजच्या युवकांच्या जीवनातील महत्त्व स्पष्ट केले. कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन प्रा. केशव उबाळे यांनी केले. त्यांनी कार्यक्रमास उपस्थित राहिलेल्या सर्व प्राध्यापक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांचे आभार मानले. या कार्यक्रमास प्रा. प्रथमेश कुलाळ, प्रा. रोहिणी जऱ्हाड, प्रा. रुपाली रासकर, प्रा. सीमा बांगर प्रा. सोनाली आव्हाळे, प्रा. पूजा काळे, प्रा. आरिफ सय्यद, प्रा. अश्विनी खंडाळे, प्रा. योगेश पडवळ, प्रा. वैष्णवी भुजबळ , चैत्राली उमाप, प्राची भुजबळ , योगिता बडगुजर उपस्थित होते.

बळीराजावरील अस्मानी संकट दूर होऊ दे; मंत्री भरतशेठ गोगावले यांची आर्त साद

आळंदी : दैनिक संध्या

महाराष्ट्रातील बळीराजावर आलेले अस्मानी संकट लवकर दूर होऊन राज्य पुन्हा धनधान्याने सुजलाम्-सुफलाम् व्हावे, अशी प्रार्थना राज्याचे रोजगार हमी, फलोत्पादन खार मंत्री भरतशेठ गोगावले यांनी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या चरणी केली. पुणे दौऱ्यावर असताना मंत्री गोगावले यांनी श्री क्षेत्र आळंदी येथे संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या संजीवन समाधीचे मनोभावे दर्शन घेतले. माऊलींच्या समाधीचे दर्शन घेतल्यानंतर मनाला अथांग शांतता आणि आत्मिक समाधान लाभल्याची भावना त्यांनी व्यक्त केली. यावेळी आळंदी देवस्थानचे प्रमुख विश्वस्त भावार्थ देखणे, विश्वस्त चैतन्य महाराज लोढे, व्यवस्थापक ज्ञानेश्वर (माऊली) वीर, ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव अजित वडगावकर, शिवसेना उपजिल्हाप्रमुख प्रकाश वाडेकर, शहरप्रमुख राहूल चव्हाण देवस्थानचे पदाधिकारी, मानकरी आणि सहकारी उपस्थित होते.

महापौर मंजुषा नागपुरे यांच्यावतीने 'आँगन का मिलन' उपक्रम

अंगणवाडी सेविकांच्या सेवाभावाचा सन्मान; बालकांना पुस्तके व खाऊचे वाटप

■ पुणे (दै. संध्या)

देशाचे संवेदनशील आणि लोकप्रिय पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या जन्मदिनानिमित्त आयोजित 'सेवा अभियान' अंतर्गत 'आँगन का मिलन' या विशेष उपक्रमाचे आयोजन शरदचंद्रजी पवार ई-लर्निंग स्कूल, वडगाव बुद्रुक, सिंहगड रोड येथे करण्यात आले. पुणे शहराच्या महापौर सौ. मंजुषा दीपक नागपुरे यांच्या पुढाकाराने आणि अध्यक्षतेखाली आयोजित या उपक्रमात अंगणवाडी सेविकांचा सन्मान करण्यात आला. महापौरपदाची जबाबदारी स्वीकारल्यानंतर समाजातील विविध घटकांशी थेट संवाद साधत त्यांच्या प्रश्नांकडे संवेदनशीलतेने पाहण्याची आणि त्यांच्या योगदानाचा सन्मान करण्याची भूमिका सौ. मंजुषा नागपुरे यांनी सातत्याने घेतली आहे. याच



लोकाभिमुख दृष्टिकोनातून अंगणवाडी सेविकांच्या कार्याची दखल घेत 'आँगन का मिलन' या उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. बालकांच्या संगोपनापासून त्यांच्या आरोग्य, पोषण, शिक्षण आणि सर्वांगीण विकासापर्यंत अंगणवाडी सेविका अत्यंत महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. समाजाच्या भवितव्याची पायाभरणी करणाऱ्या या सेविकांच्या कार्याला प्रोत्साहन मिळावे आणि त्यांच्या सेवाभावाला योग्य सन्मान मिळावा, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश असल्याचे महापौर मंजुषा नागपुरे यांनी सांगितले.

"पुणे शहराच्या विकासाचा विचार करताना केवळ पायाभूत सुविधा नव्हे, तर शहरातील प्रत्येक घटकाचा सामाजिक आणि मानवी विकास महत्त्वाचा आहे. बालकांच्या जडणघडणीत आणि त्यांच्या उज्ज्वल भविष्यासाठी अंगणवाडी सेविकांचे योगदान अनमोल आहे. त्यांच्या कार्याचा सन्मान करणे ही आपल्या सर्वांची सामाजिक जबाबदारी आहे," असे महापौर मंजुषा नागपुरे यांनी यावेळी सांगितले.

महापौरांच्या नेतृत्वाखाली आयोजित या उपक्रमात अंगणवाडी सेविकांचा सन्मान करण्यात आला. तसेच उपस्थित लहान बालकांना पुस्तके व खाऊचे वाटप करण्यात आले. बालकांमध्ये वाचनाची आवड निर्माण व्हावी, ज्ञानाची गोडी लागावी आणि त्यांच्या सर्वांगीण विकासाला चालना मिळावी, या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. कार्यक्रमास केंद्रीय राज्यमंत्री (सहकार व हवाई वाहतूक) मा. श्री. मुरलीधरजी अण्णा मोहोळ आणि राज्यमंत्री मा. माधुरीताई मिसाळ यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष मा. ॲड. वर्षाताई डहाळे, पुणे शहर महिला मोर्चाच्या अध्यक्षा सौ. मनीषाताई लडकत, महिला मोर्चा पुणे शहर प्रभारी व मा. नगरसेविका सौ. ब्रिंदा गणत्रा यांच्यासह स्थानिक नगरसेविका ज्योती गोसावी, कोमल नवले, जयश्री भूमकर, नगरसेवक श्रीकांत जगताप, हरिदास चरवड, व सर्व महिला पदाधिकारी, नागरिक व कार्यकर्ते यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुणे शहराच्या महापौर म्हणून सौ. मंजुषा नागपुरे यांच्या नेतृत्वातून 'सेवा, संवेदना आणि सहभाग' या त्रिसूत्रीला प्राधान्य दिले जात असून, समाजातील विविध घटकांना विकासाच्या प्रवाहात सहभागी करून घेण्याचा प्रयत्न केला जात आहे. 'आँगन का मिलन' हा उपक्रम याच लोकाभिमुख आणि सेवाभावी नेतृत्वाची प्रचिती देणारा ठरला. अंगणवाडी सेविकांच्या कार्याचा सन्मान आणि बालकांच्या चेहऱ्यावर फुललेले हास्य यामुळे 'आँगन का मिलन' हा केवळ एक कार्यक्रम न राहता सामाजिक बांधिलकी आणि संवेदनशील नेतृत्वाचा संदेश देणारा उपक्रम ठरला.

लोणी काळभोरमधील आरोग्य शिबिराचा १००० नागरिकांनी घेतला लाभ

■ लोणी काळभोर (दै. संध्या)

देशाचे पंतप्रधान मा. नरेंद्रजी मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'सेवा संकल्प अभियान' अंतर्गत हवेली-सोलापूर रोड भारतीय जनता पार्टी मंडलातील १७ गावांमध्ये मोफत आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करण्यात येत आहे. त्यात असंख्य नागरिक लाभ घेत आहेत.

हवेली पंचायत समितीचे सदस्य व गटनेते सुदर्शन चौधरी यांच्या विशेष प्रयत्नातून आणि जिल्हाध्यक्ष प्रदीप कंद यांच्या मार्गदर्शनाखाली सुरू असलेल्या या अभियानांतर्गत लोणी काळभोर येथे आयोजित आरोग्य शिबिराला नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत लाभ घेतला.या शिबिराचे उद्घाटन जिल्हाध्यक्ष पुणे भाजपा व पीडीसीसी बँकेचे संचालक प्रदीप कंद यांच्या हस्ते संपन्न झाले. यावेळी सुदर्शन चौधरी — सदस्य व गटनेते, हवेली पंचायत समिती तथा संचालक, मार्केट कमिटी, भरत दत्तात्रय काळभोर माजी सरपंच, लोणी काळभोर, युगंधर मोहन काळभोर माजी सभापती, हवेली पंचायत समिती, सौ. पूनम सागर चौधरी सचिव, भाजपा महाराष्ट्र प्रदेश महिला मोर्चा, भारत कुंजीर माजी उपसरपंच, थेऊर, सुभाष काळभोर माजी चेअरमन, साधना बँक, बाळासाहेब बाबुराव काळभोर माजी पंचायत समिती सदस्य, प्रवीण काळभोर माजी सदस्य, जिल्हा नियोजन समिती, गणेश चौधरी अध्यक्ष, हवेली तालुका भाजपा, अमित काळभोर, सौ. प्रियांका चौधरी उपाध्यक्ष, महिला



मोर्चा, पुणे जिल्हा, सौ. पूनम काळभोर व अँड. श्वेता काळभोर आदी मान्यवर उपस्थित होते.यावेळी नागरिकांच्या विविध आरोग्य तपासण्यां करण्यात आल्या. समर्थ फाउंडेशन व प्राथमिक आरोग्य केंद्र, लोणी काळभोर यांच्या संयुक्त विद्यमाने समाजभूषण गणपतराव काळभोर विद्यालय येथे हे शिबिर आयोजित करण्यात आले. शिबिरामध्ये रक्तदाब व रक्तातील साखर तपासणी, CBC व हिमोग्लोबिनसह रक्त तपासणी, डोळ्यांची तपासणी, छातीचा क्ष-किरण, दंत तपासणी, माता व बालक आरोग्य तपासणी, महिलांसाठी मॅमोग्राफीद्वारे स्तनाच्या कर्करोगाची प्राथमिक तपासणी, आवश्यक औषधांचे मोफत वितरण, आयुष्मान भारत सुवर्ण कार्ड व आभा आरोग्य कार्ड आदी विविध सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या. लोणी काळभोर प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी विजय माठे यांच्या निरीक्षणाखाली वैद्यकीय सेवा पार पडली. कार्यक्रमाच्या नियोजनासाठी विभाग प्रमुख एस. एम. गवळी, प्राचार्या सौ. पौर्णिमा शेवाळे इंग्लिश मीडियम स्कूल, प्राचार्य विजयकुमार घोडके सीनियर कॉलेज आणि केंद्रप्रमुख एस. काजी जिल्हा परिषद यांचे विशेष सहकार्य लाभले. कार्यक्रमासाठी नामदार चंद्रकांत पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली सेवा समर्थ फाउंडेशनच्या माध्यमातून मोबाईल मेडिकल व्हॅनची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. यासाठी चंद्रकांत पाटील व राजेश पांडे यांचे सहकार्य लाभले. यावेळी प्रदीप कंद यांनी प्रतिबंधात्मक आरोग्य तपासणीचे महत्त्व अधोरेखित केले.

पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत 'वसुंधरा पायी दिंडी'चे प्रस्थान

जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या वतीने आयोजन; १६ दिवसांत करणार ३५० किलोमीटरचा प्रवास

■ पुणे (दै. संध्या)

जगद्गुरू श्रीमद रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांच्या प्रेरणेने पर्यावरण संवर्धनाचा महामंत्र आणि अध्यात्माचा पवित्र संदेश घेऊन 'वसुंधरा पायी दिंडी'ने श्रीक्षेत्र नाणीजधामच्या दिशेने प्रस्थान ठेवले. अतिशय भक्तिमय व उत्साहपूर्ण वातावरणात सिद्ध पादुकांच्या पावन सान्निध्यात हजारो धामयात्री पर्यावरण जागृतीच्या या मोहिमेत सहभागी झाले. मुख्य पीठ नाणीजधाम पश्चिम महाराष्ट्र पुणेच्या वतीने या पायी दिंडीचे आयोजन केले आहे. पीठाचे प्रमुख संजय गाडेकर, वसुंधरा पायी दिंडी प्रशासनाचे अध्यक्ष व प्रवक्ता प्रवीण ठाकूर, सहपीठप्रमुख कमलाकर हजारे यांनी विधिवत पादुकांचे पूजन केल्यानंतर ही पालखी व दिंडी मार्गस्थ झाली. यावेळी दिंडीप्रमुख विजय आंग्रे व व्यवस्थापक विनायक नाईक उपस्थित होते.

प्रवीण ठाकूर म्हणाले, "महाराष्ट्रातील नागपूर, नाशिक, पुणे, परभणी, मुंबई येथून पाच, तर तेलंगणा व गोव्यातून दोन अशा एकूण सात ठिकाणहून या दिंडी निघाल्या आहेत. पुण्यातून निघालेल्या या दिंडीमध्ये



जवळपास ६५० भक्तगण सहभागी झाले आहेत. पुणे ते नाणीजधाम असा ३५० किलोमीटरचा प्रवास ते १६ दिवसांत करणार आहेत. यादरम्यान दिवसभरात चार ठिकाणी वृक्षारोपण केले जाणार आहे. या सर्व दिंड्या २१ ऑक्टोबर रोजी नाणीजधाम येथे एकत्र येणार आहेत. २१ ऑक्टोबर रोजी जगद्गुरु रामानंदाचार्य नरेंद्राचार्यजी यांचा जन्मोत्सव असून, या नाणीजधाम येथील आश्रमात भजन, किर्तन, महाप्रसाद अशा अध्यात्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे."

संजय गाडेकर म्हणाले, 'वसुंधरा पायी दिंडी"चे हे चौथे वर्ष आहे. ही दिंडी सामान्य दिंडीप्रमाणे नाही. या दिंडीच्या माध्यमातून पर्यावरण संवर्धनाचा संदेश देण्यात येतो. जागतिक तापमानवाढ रोखण्यासह झाडे लावण्याचा संदेश देणारे पोशाख, हातात फलक घेऊन सिद्ध पादुकांच्या सान्निध्यात ही वसुंधरा दिंडी निघाली आहे. गेल्या काही वर्षात तापमान वाढ, अवेळी पाऊस, अतिवृष्टी, नदी-नाल्यांची स्वच्छता यांसारख्या समस्यांना आपल्याला सामोरे जावे लागत आहे. त्याबाबत जनजागृती करणे हा या दिंडीचा मुख्य उद्देश आहे. वारीत सहभागी भक्तगण दररोज साधारण २५ किलोमीटरचा टप्पा चालतील."

वारकऱ्यांची जेवणाची-पाण्याची, राहण्याची, वैद्यकीय व्यवस्था चोख करण्यात आली आहे. आज कर्वेनगरमध्ये वारीचा पहिला मुक्काम असेल. ही दिंडी राजाराम पूल, सिंहगड रस्ता, स्वारगेट, हडपसरमार्गे सासवड येथून पुढे मार्गस्थ होईल, असे कमलाकर हजारे यांनी सांगितले. जगद्गुरू नरेंद्राचार्य महाराज संस्थानच्या वतीने रत्नागिरी येथे इंग्रजी माध्यमाची शाळा, वेदपाठशाळा पूर्णपणे मोफत चालवली जाते. तसेच रक्तदान शिबिरे, रुग्णवाहिका सुविधा यांसारख्या आरोग्याच्या विविध सुविधा दिल्या जातात. याशिवायही राज्यभरात समाजपयोगी विविध उपक्रम वर्षभर राबवले जातात, असेही त्यांनी नमूद केले.